
# मेहता मराठी ग्रंथजगत


एप्रिल, २०१८ • पृष्ठे १०० • किंमत : ₹ १५
• वर्ष अठरावे • अंक चौथा



## आला वसंत ऋतू आला...




### आवर्जून वाचावे









अल्पावधीतच साहित्यक्षेत्रात मानाचं स्थान मिळवलेल्या गेटवे लिटफेस्टच्या २०१८च्या आवृत्तीत अनुवादावर विशेष चर्चा झाली. मुंबई येथे एनसीपीएच्या सभागृहात हा महोत्सव पार पडला. अनुवादावरील चर्चासत्रात मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता यांच्यासह प्रकाशक व्ही. के कार्तिका, जे. देविका, निती सिंग आणि मिनी कृष्णन यांनी सहभाग नोंदवला. 'अनुवादावरील नवं तंत्रज्ञान आणि प्रवाह' या विषयावर यावेळी व्यापक चर्चा झाली. सुनील मेहता यांनी यावेळी मराठीतील अनुवादाच्या परंपरेचा आढावा घेतला. प्रकाशन व्यवसायातील नव्या तंत्रज्ञानाचा अनुवादाला होत असलेला फायदाही त्यांनी स्पष्ट केला.

# मेहता मराठी ग्रंथजगत

। एप्रिल २०१८ । वर्ष अठरावे । अंक चौथा ।

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**



संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२

E-mail : info@mehtapublishinghouse.com



संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन सहाय्य
अंजली पटवर्धन

अंकाची किंमत १५ रु.

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १४ |
| **उपक्रम** | २० |
| **पुस्तक परिचय** | |
| **समुद्राकाठचे एक वर्ष** | ३० |
| **अवनी एक नवी** | ४२ |
| **मातीचे मम अवघे जीवन** | ५४ |
| **शब्द शब्द जपून ठेव...** | ६८ |
| **स्मरण** | ७४ |
| **श्रद्धांजली** | ८४ |
| **अभिप्राय** | ८६ |
| **बालनगरी** | ९४ |



'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

# संपादकीय

## ‘त्यांच्या’ साहित्याचा बहर

चैत्र महिना म्हणजे वसंताचं आगमन, चैत्र महिना म्हणजे मोगऱ्याचा सुवास, चैत्र महिना म्हणजे चैत्रगौरीची आरास, चैत्र महिना म्हणजे आंब्यांची चाहूल...तर अशा या प्रसन्न वातावरणात आम्हाला व्यंकटेश माडगूळकर, रणजित देसाई आणि द. मा. मिरासदार यांच्या साहित्याचा बहर तीव्रतेने खुणवायला लागतो; कारण निसर्गाच्या अशा प्रसन्न पार्श्वभूमीवर इंग्रजी एप्रिल महिन्यामध्ये या तीनही साहित्यिकांचा जन्मदिवस असतो. हे तीनही साहित्यिक वेगळ्या वाटेवरचे आहेत; पण त्यांनी निर्माण केलेली विपुल आणि विविध प्रकारची (फॉर्मच्या दृष्टीने) साहित्यसंपदा, त्यांची सदैव जागी असलेली संवेद्यता आणि त्या संवेद्यतेला शब्दरूप देण्याचा त्यांचा ध्यास ही त्यांच्यातील साम्यस्थळे नवीन पिढीला मार्गदर्शक ठरणारी आहेत.

रणजित देसाईंचं नाव उच्चारताच ‘स्वामी’ आणि ‘श्रीमानयोगी’ या दोन ऐतिहासिक कादंबऱ्यांची अपरिहार्यतेने आठवण येते. माधवराव पेशवे आणि शिवाजी महाराज या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांच्या व्यक्तिमनाचा कानोसा घ्यावा असं रणजित देसाईंना वाटलं. ‘जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण’ या उक्तीप्रमाणे या दोनही व्यक्तींच्या कठीण यातना त्यांनी अधोरेखित केल्या आणि म्हणूनच वाचकांनी या साहित्यकृतींचं मनापासून स्वागत केलं. ‘राधेय’मधून कर्णाची वेदना त्यांनी शब्दबद्ध केली. माधवराव पेशवे, शिवाजी महाराज आणि कर्ण या तीनही व्यक्तिरेखांचा ‘माणूस’ म्हणून त्यांना विचार करावासा वाटला; कारण त्यांचं संवेदनशील मन आणि मग त्याचं हे संवेदनशील मन त्यांच्या ‘अभोगी’, ‘समिधा’ इ. कादंबऱ्यांतून, ‘मोरपंखी सावल्या’, ‘कमोदिनी’ इ. कथासंग्रहांतून, ‘कांचनमृग’, ‘हे बंध रेशमाचे’ इ. नाटकांतून आणि ‘स्नेहधारा’, ‘संचित’ सारख्या ललित लेखनातून व्यक्त होत

राहिलं. बारा कादंबऱ्या, चौदा कथासंग्रह, चौदा नाटकं आणि दोन ललित लेखसंग्रह अशी साहित्यसंपदा त्यांच्या मनातून कागदावर अवतीर्ण झाली.

व्यंकटेश माडगूळकर म्हणजे 'माणदेशी माणसं' हे समीकरण वाचकांच्या मनाशी आजही दृढ आहे. माडगूळकरांच्या या 'स्केचेस'मुळे मराठी साहित्यात लेखक म्हणून त्यांना मान्यता मिळाली आणि त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिलंच नाही. त्यांच्या संवेद्य मनात वावरणाऱ्या माणसांना आणि निसर्गाला त्यांनी शब्दरूप दिलं. 'छोटा जवान', 'सत्तांतर' इ. कादंबऱ्या, 'बेलवण', 'डोहातील सावल्या' इ. कथासंग्रह, 'प्रवास एका लेखकाचा' हे आत्मचरित्र, 'पुढचं पाऊल' हे व्यक्तिचित्रण, 'जनावनातली रेखाटणे' हे रेखाटन, 'पांढरी मेंढरे हिरवी कुरणे' हे प्रवासवर्णन आणि 'नागझिरा' हे माहितीपर पुस्तक, अशा विपुल साहित्यसंपदेतून माडगूळकरांच्या माणूस आणि निसर्ग वाचणाऱ्या तरल मनाचं दर्शन होत राहतं. सात कादंबऱ्या, सव्वीस कथासंग्रहांसह पाच अन्य पुस्तके अशी साहित्यसंपदा निर्माण करण्यासाठी भावात्म मनाला एकाग्रतेची आणि बैठकीची जोड द्यावी लागते, तेव्हाच हे साध्य होत असतं.

एखादं खेडं, तिथल्या माणसांचा इरसालपणा किंवा त्या माणसांमधील विसंगतीतून होणारी विनोदनिर्मिती या वैशिष्ट्याने वाचकांना सतत हसवत ठेवणारी द. मा. मिरासदारांची कथा हा मराठी कथाविश्वाचा समृद्ध ठेवा. विनोदी लेखन करणाऱ्या लेखकाचं मन भावनाशील असतं का, असाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो; पण विनोदी लेखन करणारा लेखकही माणूसच असतो. फक्त माणसं वाचण्याचा त्याचा चष्मा वेगळा असतो. माणसामधल्या या विसंगतींना म्हणा किंवा स्वभाववैशिष्ट्यांना म्हणा विनोदाची झालर लावून शब्दबद्ध करणं तर आणखी अवघड आहे; पण हे अवघड काम मिरासदारांनी आयुष्यभर मन लावून केलं. जीवनाकडे असंही बघता येतं, हे त्यांच्या कथांमधून त्यांनी अधोरेखित केलं. 'विरंगुळा', 'माझ्या बापाची पेंड' या कथासंग्रहांसह वीस कथासंग्रह, 'नावेतील तीन प्रवासी' ही रूपांतरित कादंबरी, 'अंगतपंगत' हा ललित लेखसंग्रह, 'मी लाडाची मैना तुमची' हे वगनाट्य, 'गाणारा मुलूख' ही विनोदी बालनाटिका, 'सुट्टी आणि इतर एकांकिका' हा एकांकिका संग्रह त्यांच्या नावावर आहे.

तर या तीनही साहित्यिकांची ही गुणवत्तापूर्ण साहित्यसंपदा म्हणजे

त्यांच्या संवेदनशील मनासह त्यांनी अखंड केलेली साधना आहे. हे साहित्यिकही माणूसच होते. त्यांच्याही जीवनात दु:ख होती, समस्या होत्या; पण त्यांना बाजूला सारून त्यांनी लेखनाचं व्रत घेतलं आणि ते आयुष्यभर आचरलं. म्हणून त्यांच्या साहित्याचा बहर वाचक आजही अनुभवत आहेत. प्रतिभेला परिश्रमांची जोड द्यावी लागते. ती जोड या साहित्यिकांनी दिली आणि मराठी साहित्यात आपलं स्वतंत्र स्थान निर्माण केलं.

साहित्यकृतीचं बीज मनात पडणं आणि नंतर त्या बीजाला आकार देणं महत्त्वाचं असतं. समीक्षक त्या साहित्यकृतीचं काय करतील आणि वाचक तिचं स्वागत करतील की नाही, हा नंतरचा प्रश्न असतो; पण मनाची मशागत केली तरच ते संवेद्य राहतं आणि मग एखादा अनुभव, एखादी अनुभूती बीजरूपाने त्या मनावर ठसते. तेव्हा लेखन हा व्यवसाय न होता ते जर व्रत झालं, तर मानवी जीवनाला भिडणाऱ्या, माणसाच्या मनाला साद घालणाऱ्या साहित्यकृती निर्माण होत राहतील.

जाता जाता या तीनही साहित्यिकांच्या तरल मनाचं आणि त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेचं ओझरतं दर्शन आपण घेऊयात.

‘अभोगी’ ही संगीताची पार्श्वभूमी लाभलेली रणजित देसाईंची कादंबरी. केशर या भाविणीच्या मुलीला कैलास नावाचा तरुण डॉक्टर गोव्याहून लोणावळ्याला घेऊन येतो. केशरची भाविणीच्या जीवनातून सुटका करण्याचा त्याचा उद्देश असतो. महेश हा केशरचा बालमित्र. त्याच्यावर ती मनापासून प्रेम करत असते. महेश एक नामवंत गायक होतो; पण तो टीबीने गंभीर आजारी पडतो. केशर आणि डॉ. कैलास मनोभावे त्याची सेवा करून त्याला मरणाच्या दारातून परत आणतात; पण महेशच्या मनात कैलास आणि केशरच्या नात्याविषयी शंका निर्माण होते. कैलासला ते सहन होत नाही आणि तो महेशला सुनावतो,‘‘चूप बसा. मला बोलू द्या. तुमची मिजास, तुमचं गाणं, तुमचा लौकिक यांमुळे आमच्यासारखे रसिक वेडे होतात, आता मुंबईला जाल. इतक्या वर्षांनी तुमचं गाणं होत आहे. त्यामुळे तुमची मैफल ऐकायला उत्सुक असलेले रसिक गर्दी करतील. तुम्हाला फुलासारखे जपतील. तुमचे दौरे अखंड सुरू होतील. एक मैफल संपवून दुसरी मैफल गाठण्यासाठी तुमची धावपळ चाललेली असेल. तुमचा चिडखोरपणा, तुमची मिजास – सारं सहन करून तुम्हाला पोहोचवायला स्टेशनवर गर्दी

होईल. अश्रुपूर्ण नजरेनं निरोप घेतील. आणि गाडी सुरू होईल. तुम्ही पानाचा डबा काढून पान जुळवू लागाल. सारं विसरून पुढच्या मैफलीचे विचार सुरू होतील. हाच थाट दुसऱ्या ठिकाणी घडत राहील. महेशकुमार, मी तुम्हाला विचारतो. तुमच्यावर भारावून प्रेम करणारे, भक्तिभावानं तुम्हाला जपणारे किती रसिक तुमच्या आठवणीत आहेत? तुम्ही फक्त गवई आहात. माणुसकीची जाण तुमच्यात नाही.'' कैलास आणि केशर या दोन व्यक्तिरेखांच्या माध्यमातून माणुसकीचं निखळ दर्शन रणजित देसाईंनी घडवलं आहे.

व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील कोंडिबा गायकवाड या कथेतील हा अंश : पाय न वाजविता जाऊन रानात पडलेला एक भलामोठा धोंडा घेऊन कोंडिबा आला. संतूच्या उशाशी येऊन उभा राहिला आणि ओठावर दात रोवून त्यानं भलामोठा श्वास घेतला आणि डोक्याच्यावर नेऊन तो धोंडा संतूच्या डोक्यात घातला. संतू जागच्या जागी ठार झाला.

–मग कोंडिबा घरी गेला नाही की काही नाही. तडक तालुक्याच्या कचेरीत गेला आणि अम्मलदाराला म्हणाला, ''मी संत्याच्या डोक्यात धोंडा घालून परान घेतला. काय मला फासावर चढवायचं असेल ते चढवा.''

त्याला पुढं चौकशीसाठी जिल्ह्याला न्यायचा होता. त्या दिवशी मी मुद्दाम मोटारीपाशी गेलो. त्याची बायकोपोरंही आली होती. चार हत्यारबंदी शिपायांनी त्याला मोटारपाशी आणला. हातात हातकड्या होत्या. दंडाला काढण्या होत्या. अंगावरचे कपडे मळले होते आणि दाढीही वाढवली होती. वाघाला दरवेशी नेतो, तसे शिपाई त्याला चालवीत होते.

मी दिसल्यावर कोंडिबा हसला. हातकड्या घातलेले हात वर करून म्हणाला, ''राम राम! जाऊन येतो!''

त्याला त्या स्थितीत पाहून बायकोपोरं रडू लागली. त्यांना वाटलं, 'हा आता कशाचा माघारी येतोय? तो चालला, परत न यायच्या वाटेनं चालला.'

''कारभारीऽऽ'' असा हंबरडा फोडून त्याच्या बायकोनं डोळ्यांना पदर लावला. पोरंही ओरडू लागली. एकच कालवा झाला.

कोंडिबानं आपली खोंडागत गर्दन फिरवली आणि बायकोला डाफरलं, ''गप, रडायला का झालं? अवंदा पीक चांगलं हाय. मळ्यात जुंदळ्याचं

डांबार लागलंय. खंडी-दीड खंडी दाणं येत्याल!''

आता या कोंडिबाच्या काळजाला काय म्हणावं?

माडगूळकरांनी ही माणसं जशी होती तशीच रेखाटली आणि चित्रदर्शी शैलीत ती रंगवली.

आणि द. मा. मिरासदारांची कथा रंगवण्यात मिरासदारी. 'हसणावळ' या कथासंग्रहातील 'कुणाचा कोण? अर्थात भोकरवाडीतील नाटक' या कथेत नाटक करायचं ठरतं आणि मग पात्र निवडीचं काम कसं रंगतं, ते खास मिरासदारांच्या शैलीत...

''सहदेव हाये, नकुळ हाये, द्रौपदी है--''

गणामास्तराला एकदम आठवण झाली. तो घाईघाईने म्हणाला,

''आरे हो, स्त्री-पार्टी कोन?''

''दोनच तर स्त्रीपार्टी नाटकात हायेत.''

''व्हय, पण ते काम कोन करील?''

''चेंगट करील. काय हरकत हाये?''

आपण द्रौपदीचे काम करायचे या कल्पनेने नाना चेंगटाला उगीचच गुदगुल्या झाल्या. आपण रुसून बसलो ते बरेच झाले. मनासारखे महत्त्वाचे काम तरी मिळाले. आता एकच अडचण आहे. आपल्या मिशा. त्या कायम राहिल्या म्हणजे झालं.

''द्रौपदीचं काम आपन करू; पण मिशा न्हाई काढणार हां आपुन. आधीच सांगून ठिवतो.''

''द्रौपदीचं काम तू करून कसं चालंल?'' रामा खरात उपरोधानं म्हणाला, ''लोक काय म्हनतील? ह्या द्रौपदीसाठी कुस्ती केली व्हय एवडी? हात् तुजी गं भीमा हात्! तू द्रौपदीचं काम करू नगंस चेंगटू. दाशीचं कर.''

''हां, म्हंजे मग मिश्या ठिवल्यास तरी चालंल.''

''तोंडावरनं सारखा पदर घेतला म्हंजे झालं.''

चेंगट पुन्हा रुसला,

''आमाला नगोच. द्रौपदी नगो, दाशी नगो. काईच नगो आपल्याला.''

गणामास्तरानं थोडा वेळ विचार केला. मग तो बाबूला म्हणाला,

''करू दे की द्रौपदीचं काम. काय बिगडलं? न्हाई तरी ते काम कोन करनार?''

बाबूनंच अजून काही विचार केला नव्हता. त्याच्या डोळ्यांसमोर दुसरे नाव नव्हते. त्यानंही डोकं खाजवलं.

‘‘बाईला बाईच आणली तर?’’

‘‘कोन आननार?’’

‘‘आनशी करंल का काम? तिला इचारायचं?’’

‘‘आनशी आन् द्रौपदी?’’ रामा खरात हसला.

‘‘काय हारकत?’’

चेंगट शांतपणे म्हणाला,

‘‘तू इचार तर खरं. म्हंजे ती बी मार खातीय आन् आमीबी मार खातोय. तुला म्हाईत न्हाई का, तिचा नवरा कसला खवीस हाये ते. आन् सासू तर आग हाये आग निव्वळ.’’

तर या तीनही साहित्यिकांच्या साहित्याच्या बहरातील एखादं हिरवं पान आपण अनुभवलं. हा बहर तुमच्या-आमच्या जीवनाला असाच संपन्न करत राहो! या तीनही साहित्यिकांच्या कामगिरीला मन:पूर्वक सलाम!



## फॉर्म ४ – वृत्तपत्राच्या मालकी हक्कासंबंधीचे निवेदन

१) नियतकालिकाचे नाव : मेहता मराठी ग्रंथजगत

२) प्रकाशन स्थळ : १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)

३) प्रकाशन काल : मासिक

४) मुद्रकाचे नाव : सुनील अनिल मेहता
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)

५) प्रकाशकाचे नाव : सुनील अनिल मेहता
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)

६) संपादक : सुनील मेहता
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)

७) मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१ए, सोमवार पेठ, महाराजा लॉजमागे, पुणे ४११ ०११ (महाराष्ट्र)

८) वृत्तपत्राची मालकी हक्क/
स्वामित्व इ. चे नाव : सुनील अनिल मेहता
कार्यालयाचा पत्ता : १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)

मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो की, वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व सत्य आहे.

दि. ९.४.२०१८

सुनील अनिल मेहता
प्रकाशक

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी**
**आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**
त्रैवार्षिक वर्गणी ३५० रुपये
पंचवार्षिक वर्गणी ५०० रुपये

---

**डिजिटल अंकाची वर्गणी**
त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी
जाणून घेण्यासाठी

**सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती**

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books I Toys I Stationery I Music I Movies I Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पायर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.
संपर्क. ९८९०३९७१९८ / ९९६०३०९८०८

अधिक माहितीसाठी संपर्क
www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने


नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**इथे मिळतील ई-बुक्स...**

**www.amazon.in**

**play.google.com**

**eBooks**



**Online पुस्तके खरेदी करा** **www.mehtapublishinghouse.com**

# साहित्यवार्ता

## सुधा मूर्तींच्या तीन पुस्तकांचे कोल्हापुरात प्रकाशन
## मराठी माणूस दर्जेदार साहित्याचा भुकेला : मूर्ती

''मराठी माणूस दर्जेदार साहित्याचा भुकेला असल्याने माझ्या मराठीतील अनुवादित पुस्तकांचा खप इतर भाषांतील पुस्तकांच्या खपापेक्षा जास्त आहे,'' अशा शब्दांत सुप्रसिद्ध लेखिका सुधा मूर्ती यांनी मराठी वाचकांचे कौतुक केले. मिथक कथेच्या माध्यमातून नव्या पिढीसाठी लिहिणार, असे आश्वासनही मूर्ती यांनी त्यांच्या तीन पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात दिले.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे सुधा मूर्ती यांच्या 'सर्पाचा सूड', 'तीन हजार टाके', आणि 'गरुडजन्माची कथा' या पुस्तकांचे प्रकाशन नुकतेच येथील केशवराव भोसले नाट्यगृहात झालेल्या समारंभात करण्यात आले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता आणि सुनील मेहता, अनुवादक लीना सोहोनी आणि डॉ. सुनीलकुमार लवटे यावेळी उपस्थित होते.

मूर्ती यांनी आपल्या भाषणात मराठी आणि कर्नाटक भाषकांच्या आपलेपणाचे किस्से सांगत आपण केलेल्या सामाजिक कामांविषयी भूमिका



मांडली. त्या म्हणाल्या, ''पुस्तक समारंभात मी सांगते, की इंग्रजी खालोखाल माझ्या इतर भाषांतील कोणत्याही पुस्तकांपेक्षा मराठीत माझी सर्वाधिक पुस्तके खपली. त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. मी मूळ मराठी नसले तरी महाराष्ट्राने मला नेहमीच आपले मानले. माझी मुले मला 'नॉन रेसिडन्स महाराष्ट्रीयन'च मानतात. कोल्हापूरशी माझे नाते तर खूप जुने आहे. राज्याराज्यांत 'रामायण' आणि 'महाभारत' यांच्याशी संबंधित अनेक कथा आजच्या पिढीला सांगितल्या पाहिजेत,'' असे सांगून त्या म्हणाल्या, ''माझ्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळे मी समाजकार्य सुरू केले. दहा लोकांना साधारण जीवन जगण्यासाठी मी मदत केली तर माझे आयुष्य सार्थकी लागेल, असे माझे वडील म्हणत. देवदासी आणि वेश्या यांच्यासाठी काम करणे सर्वांत कठीण होते. केवळ पैसे आणि साधने असणे यापेक्षा सामान्य माणसांना मदत करण्याचे सुख अवर्णनीय आहे. मी १८ वर्षे देवदासी आणि वेश्यांसाठी काम केले. त्या तीन हजार जणींना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत केली, हेच माझे समाधान आहे. माणूस कशासाठी जगतो, हे मला तेव्हा कळले. या तीन हजार जणींनी मला 'तीन हजार टाके' घातलेली गोधडी भेट दिली, तेव्हा माझ्या डोळ्यांत आलेल्या अश्रूंनी हेच समाधान मिळवून दिले. त्यांच्या सारख्यांसाठी काम करण्याचे बळ मिळो,'' अशा शब्दांत मूर्ती यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

अनुवादक लीना सोहोनी यांनी आपल्या मनोगतात, ''माझ्या अनुवादाच्या कामावर माझे प्रेम आहे. मी ४८ पुस्तकांचे अनुवाद केले; पण मला 'यशोदा' असा सन्मान देत, माझा सत्कार केवळ सुधा मूर्ती यांनीच केला. वाचक आणि लेखिका यांच्यातील पुलाचे काम अनुवादक करीत असतात,'' असे प्रतिपादन केले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी आपल्या ओघवत्या भाषणात सुधा मूर्ती यांच्या कामाचा आणि लेखनाचा परिचय करून दिला. ''सुधाताई वस्तुनिष्ठ लिहितात. रामायण आणि महाभारतातील अनेक मिथक कथा त्यांनी आजच्या संदर्भात लिहिल्या आहेत,'' असं ते म्हणाले.

तत्पूर्वी, उपस्थित श्रोत्यांनी उभे राहून सुधा मूर्ती यांच्याबद्दल आदर व्यक्त केला. या समारंभात अनिल मेहता यांच्या हस्ते सुधा मूर्ती, लीना सोहोनी आणि डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा सत्कार करण्यात आला; तर

मूर्ती यांच्या हस्ते ‘निर्मिती’चे अनंत खासबारदार आणि शिरीष खांडेकर यांचा पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला.

### अन् स्टीफनची कहाणी उलगडली मराठीत

विलक्षण बुद्धिमत्ता आणि अलौकिक प्रतिभा लाभलेल्या, वयाच्या २१व्या वर्षी ओढवलेल्या दुर्धर रोगावर मात करत मानवी कल्याणासाठी आयुष्य झिजवणाऱ्या स्टीफन हॉकिंग यांचे जीवन प्रेरणादायी होते. त्यांचे ‘ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाइम’ पुस्तक कोलकात्याच्या जुन्या बाजारात हाती लागले. त्याचा मराठी अनुवाद करण्याचा निर्णय प्रकाशक अनिल मेहता यांनी घेतला; मात्र भाषांतराचे काम मनासारखे न झाल्यामुळे ते पुस्तक मराठीत येऊ शकले नाही; पण स्टीफन हॉकिंग आणि त्यांच्या साहित्याच्या कमालीच्या आकर्षणातून प्रकाशक मेहता यांनी स्टीफन यांच्या पहिल्या पत्नी जेन हॉकिंग यांनी लिहिलेल्या ‘ट्रॅव्हलिंग टू इन्फिनिटी : माय लाइफ विथ स्टीफन’ हे पुस्तक इंग्रजी व मराठीमध्ये आणून जेन आणि स्टीफनची जीवनकहाणी उलगडली.

या पुस्तकातून स्टीफनची असाधारण प्रज्ञा, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्याने पादाक्रांत केलेली यशोशिखरे आणि त्याला जेनने दिलेला आंतरिक शक्तीचा बळकट आधार, याचं यथार्थ दर्शन घडतं.

त्यांच्या २५ वर्षांच्या वैवाहिक जीवनाची घटस्फोटात झालेली परिणती, स्टीफन यांनी त्यांच्या सेवेतील एका नर्ससाठी जेनला दिलेली सोडचिठ्ठी, कालांतराने जेन यांनी जुन्या मित्राशी केलेला विवाह असा जेनचा जीवनप्रवास उलगडतो. सुदर्शन आठवले यांनी या पुस्तकाचा मराठीत अनुवाद केला आहे.




प्रकाशक अनिल मेहता यांच्या या पुस्तकाविषयी वेगळ्या भावना आहेत. ‘स्टीफन हॉकिंग यांचे गाजलेले ‘ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाइम’ हे पुस्तक कोलकात्याच्या जुन्या बाजारातून त्यांनी विकत घेतले. जगभरात गाजलेले हे पुस्तक मराठीत आणण्याचे त्यांनी ठरवले. विज्ञानावर

**३ री आवृत्ती**

# आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध

**डॉ. जयसिंगराव पवार**





**किंमत : १००/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

डॉ. जयसिंगराव पवार यांनी अनेक इतिहास परिषदांच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांचा हा लेखसंग्रह.

यामध्ये महाराष्ट्रातील गेल्या शेसव्वाशे वर्षांतील इतिहास-संशोधन परंपरेचा शोध तर घेतला गेला आहेच, शिवाय ही परंपरा अधिक गतिमान कशी होईल, त्यासाठी इतिहासप्रेमींनी व अभ्यासकांनी काय करायला हवे, याचे दिग्दर्शन केले आहे.

इतिहासाचे स्वरूप व व्याप्ती कशी असते? सामाजिक इतिहासाचे महत्त्व काय? स्थानीय इतिहासाचे राष्ट्रीय इतिहासात स्थान काय? ऐतिहासिक वस्तू व वास्तू यांच्या अक्षम्य उपेक्षेची कारणमीमांसा काय? आपला ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी आपण काय करावयास हवे? इतिहासाचे शिक्षक इतिहासप्रेमी यांची यां संदर्भातील नेमकी कोणती जबाबदारी आहे?

अशा अनेक प्रश्नांची चर्चा डॉ. पवार या लेखांतून करतात. त्यातून महाराष्ट्रातील इतिहासप्रेमी इतिहास संशोधनाकडे आकृष्ट होतील अशी आशा आहे.




आधारित हे पुस्तक, त्याचे मराठीत भाषांतर करून घेतले; पण अनुवाद पसंत पडला नाही. परिणामी, 'ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाइम'च्या मराठी अनुवादाचा विषय थांबला; मात्र स्टीफन हॉकिंग आणि त्यांच्या साहित्याविषयीचे आकर्षण काही कमी झाले नाही. त्या आकर्षणापोटी पुढे स्टीफन हॉकिंग यांच्या संर्दभातील दोन पुस्तके मेहता यांनी वाचकांना उपलब्ध केली. मेहता म्हणाले, ''२०११मध्ये स्टीफन हॉकिंग यांच्या पत्नी जेन यांनी लिहिलेले 'ट्रॅव्हलिंग टू इन्फिनिटी...' पुस्तक वाचनात आले. पुस्तक वाचताच ते भारतीय भाषेत प्रकाशित करण्याचे ठरविले. इंग्रजी भाषेचे हक्क मिळवून ते इंग्रजी व मराठीमध्ये प्रकाशित केले.''

## शंकर सारडा यांना जीवनगौरव पुरस्कार




अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे ज्येष्ठ समीक्षक आणि 'मेहता मराठी ग्रंथजगत'चे कार्यकारी संपादक शंकर सारडा यांना लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. जग जसं झपाट्याने बदलत आहे तसं बालमानसिकता आणि कालसापेक्षता याचा विचार करून लेखन झालं पाहिजे. इंटरनेटच्या महाजालामुळे लहान वयातच मुलं प्रगल्भ होत आहेत. तंत्रज्ञानामुळे काय बदल होत आहेत, हे आजच्या बालसाहित्यात उमटत नसल्याची खंत व्यक्त करीत ९१व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी मुलांच्या बदलत्या मानसिक आणि शारीरिक वाढीशी सुसंगत साहित्य निर्माण झालं पाहिजे, याकडे लक्ष वेधलं.

या प्रसंगी निर्मला सारडा, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. न. म. जोशी, संस्थेच्या

अध्यक्ष डॉ. संगीता बर्वे आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. संगीता बर्वे यांनी प्रास्ताविक केले. संस्थेची रूपरेषा सहकार्यवाह सुनील महाजन यांनी सांगितली. डॉ वर्षा तोडमल यांनी सूत्रसंचालन केले.

## ‘ग्लोबल पुलोत्सव’



पु. ल. देशपांडे म्हणजे महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व. आपल्या आयुष्यातले ताण त्यांच्या पुस्तकांनी दूर केले. सगळ्यांना मनमुराद हसवणाऱ्या ‘पुलं’च्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ८ नोव्हेंबर २०१८ ते ८ नोव्हेंबर २०१९ हे पूर्ण वर्ष ‘ग्लोबलपुलोत्सव’ साजरा करण्यात येणार आहे. भारतातील वीस  प्रमुख शहरांत तर भारताबाहेर पाच खंडांमधल्या तीस शहरांत अशा ५० ठिकाणी हा महोत्सव रंगणार आहे. पु .ल परिवार, आशय सांस्कृतिक, पुण्यभूषण प्रतिष्ठान या संस्थांच्या वतीने या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलंय. ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांच्या हस्ते नुकतंच पुण्यात या महोत्सवाच्या लोगोचं प्रकाशन करण्यात आलं. या ग्लोबल पुलोत्सवात सुमारे ५०० कलाकार, साहित्यिक सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्रात पुणे, मुंबई, ठाणे, सांगली, मिरज, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, अमरावती, यवतमाळ, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्राबाहेर बेळगाव, इंदोर, बडोदा, बंगळूरू, हैदराबाद, दिल्ली, युरोपमध्ये लंडन, नेदरलँड्स, म्युनिच.

आशियामध्ये दुबई, सिंगापूर, मॉरिशस, बँकॉक, मलेशिया, कतार, अबुधाबी, अमेरिकेत सॅन फ्रान्सिस्को, सॅन होजे, ऑस्टिन, वॉशिंग्टन, अॅटलांटा, बोस्टन, कॅलिफोर्निया, राले, न्यूयॉर्क, सिअॅटल, ह्यूस्टन, शिकागो, लॉस एंजलिस, फ्लोरिडा, कॅनडामध्ये मॉन्ट्रियल, टोरॅन्टो, वानोव्हर, अफ्रिकेत नैरोबी, टांझानिया, जोहान्सबर्ग, ऑस्ट्रेलियात सिडनी, मेलबर्न आणि ऑकलन्ड या ठिकाणी हा महोत्सव होणार आहे.

❖

उपक्रम

# दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडीत वाचीत जावे।।

श्री समर्थ रामदास स्वामी

**वाचकांसाठी सुवर्णसंधी**
**करा मैत्री पुस्तकांशी**
**'मेहता पब्लिशिंग हाऊस'चा**
**नवीन उपक्रम**
**१५ एप्रिल २०१८ ते १५ मे २०१८**
**दरम्यानचा दिनविशेष**

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा.

authors@mehtapublishinghouse.com

# दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर
# ५० टक्क्यांपर्यंत सूट

**१५ एप्रिल - रविंद्र बागडे यांचा जन्मदिन**

**रविंद्र बागडे लिखित दोन** पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत -** ३२०/-

*१५ एप्रिल ते १७ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत १७९/-**

**१८ एप्रिल - मीरा सिरसमकर यांचा जन्मदिन**

**मीरा सिरसमकर लिखित चार** पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ५१०/-**

*१८ एप्रिल ते २० एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत ३०९/-**

**१९ एप्रिल - पारू नाईक यांचा जन्मदिन**

**पारू नाईक लिखित दोन** पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ३३०/-**

*१९ एप्रिल ते २० एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत १६९/-**

**२१ एप्रिल - ज्ञानदा नाईक यांचा जन्मदिन**

'तजेलदार कॅनव्हास' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - १६०/-**

*२१ एप्रिल ते २२ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत ९९/-**

**२१ एप्रिल - ॲलिस्टर मॅक्लीन यांचा जन्मदिन**

**ॲलिस्टर मॅक्लीन** यांच्या **११ अनुवादित** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २९९०/-**

*२१ एप्रिल ते २३ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत १५२०/-**

## २१ एप्रिल - जागतिक निर्मिती आणि इनोव्हेशन दिन

'द मॅजिक ऑफ थिंक बिग, द माइंड जिम, सूत्रे प्रभाव पाडण्याची, गेटिंग थिंक डन, प्रयत्ने धरू यशपंथ!, तिळा तिळा दार उघड, लघुउद्योजकांचा मार्गदर्शक, वादळातील दीपस्तंभ, अर्थाच्या शोधात, तजेलदार कॅनव्हास' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २३३०/-**

*२१ एप्रिल ते २३ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत १४८०/-**

## २२ एप्रिल - वसुंधरा दिन

'आपली सृष्टी' या १० पुस्तकांचा संच, वसुंधरा, पर्यावरण प्रदूषण, अवनी एक नवी, वेध पर्यावरणाचा' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २२१०/-**

*२२ एप्रिल ते २४ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत १२३५/-**

## २२ एप्रिल - चेतन भगत यांचा जन्मदिन

**चेतन भगत** यांच्या **३ अनुवादित** पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ७००/-**

*२२ एप्रिल ते २५ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत ५०१/-**

## २२ एप्रिल - डॉ. बाळ फोंडके यांचा जन्मदिन

**डॉ. बाळ फोंडके लिखित १०** पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - २१७५/-**

*२२ एप्रिल ते २५ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत १३७८/-**

## २२ एप्रिल - उदय भिडे यांचा जन्मदिन

अमिना, विश्वसत्ता, शॅडो मॅन, पिरॅमिड पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १३८०/-**

*२२ एप्रिल ते २५ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत ८६०/-**

### २३ एप्रिल - यशोधरा काटकर यांचा जन्मदिन

'बंजाऱ्याचे घर, थर्ड पर्सन' या पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३९०/-**

*२३ एप्रिल ते २५ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत १९५/-**

### २३ एप्रिल - वर्ल्ड बुक ॲण्ड कॉपीराइट दिन

सर्व पुस्तकांवर **४०टक्के** सूट. *'स्वामी' हे पुस्तक सोडून.*

*किमान ३०००/- रुपयांची खरेदी आवश्यक. प्रत्येक पुस्तकाची एकच प्रत.*

*२३ एप्रिल या एकाच दिवशी.*

### २४ एप्रिल - सचिन तेंडुलकर यांचा जन्मदिन

सचिन तेंडुलकर लिखित 'प्लेईंग इट माय वे' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत — ६४०/-**

*२४ एप्रिल ते २६ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत ३९९/-**

### २६ एप्रिल - रवींद्र गुर्जर यांचा जन्मदिन

'कोमा, सेकंड लेडी, द पेलिकन ब्रीफ' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ६३०/-**

*२६ एप्रिल ते २८ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत ३४९/-**

### २६ एप्रिल - जागतिक नृत्यदिन

'मायकल जॅक्सन' या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ७९५/-**

*२६ एप्रिल ते २८ एप्रिलपर्यंत*

**सवलत किंमत ४९९/-**

## २९ एप्रिल - राजा रवि वर्मा यांचा जन्मदिन

रणजित देसाई लिखित 'राजा रवि वर्मा' या पुस्तकावर विशेष सवलत.

**सवलत किंमत २१९/-**

**मूळ किंमत - ३४०/-**

*२९ एप्रिल ते ३० एप्रिलपर्यंत*

## १ मे - महाराष्ट्र दिन

**संच - १** 'कर्मचारी, क्रांतिसूर्य, अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड, बी द चेंज– भ्रष्टाचाराशी लढा, मराठेशाहीतील मनस्विनी, अण्णा हजारे, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया, सैनिक हो तुमच्यासाठी, स्वप्न व्यवस्थापकाचे' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**सवलत किंमत १०२०/-**

**संचाची मूळ किंमत - १५०५/-**

*१ मे ते ३ मेपर्यंत*

**संच - २ डॉ. जयसिंगराव पवार लिखित १२** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**सवलत किंमत १०२०/-**

**संचाची मूळ किंमत -१८३०/-**

*१ मे ते ४ मेपर्यंत*

## ४ मे -रॉबिन कुक यांचा जन्मदिन

रॉबिन कुक यांच्या **नऊ अनुवादित** पुस्तकांवर विशेष सवलत.

**सवलत किंमत १०२०/-**

**संचाची मूळ किंमत - २८८५/-**

*४ मे ते ६ मेपर्यंत*

## ७ मे - रवीन्द्रनाथ टागोर यांचा जन्मदिन

रवीन्द्रनाथ टागोर यांच्या **सात अनुवादित** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**सवलत किंमत ५९९/-**

**संचाची मूळ किंमत - १०००/-**

*७ मे ते ८ मेपर्यंत*

## ८ मे - जागतिक रेडक्रॉस दिन

**संच -१** 'वॉर्सा ते हिरोशिमा, द रशियन डायरी, द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्, नेताजी, द अफगाण, द डायरी ऑफ मेरी बर्ग, शिंडलर्स लिस्ट, आठवणींचे मोती' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - २१६५/-**

*८ मे ते १० मेपर्यंत*

**सवलत किंमत १३०९/-**

**संच -२** 'द डायरी ऑफ ॲन फ्रँक, शत्रूशी दोन हात, लेनिनग्राडचा वेढा, प्रेमाची परिभाषा, द गन्स ऑफ नॅव्हारन, इनसाइड द गॅस चेंबर्स, एका सैनिकाचा मृत्यू, एक्झोड्स' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत -२६८०/-**

*८ मे ते १० मेपर्यंत*

**सवलत किंमत १६४६/-**

## १२ मे - मातृत्व दिन

'चिकन सूप फॉर द मदर्स सोल भाग १,२,३, चिकन सूप फॉर द इंडियन मदर्स, आजीच्या पोतडीतील गोष्टी, करुणाष्टक, कळेल का त्याला आईचं मन, जिच्या हाती पाळण्याची दोरी, रुचिरा भाग १ व भाग २, गर्भसंस्कार, एक सांगू?, सुखद मातृत्व, सुखद बालसंगोपन, माय डॉटर माय मदर, माझ्या लाडक्या लेकींसाठी, माझ्या अम्मीची गोष्ट, एका मातेचा लढा, कुंती' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ४४९०/-**

*१२ मे ते १४ मेपर्यंत*

**सवलत किंमत २८०६/-**

## १५ मे - जागतिक कुटुंब दिन

**संच १ - 'चिकन सूप मालिका ४३ पुस्तके'** या पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १७,२३०/-**

*१५ मे ते १६ मेपर्यंत*

**सवलत किंमत ८६१५/-**

**संच २ -** 'माय फॅमिली इज ऑल आय हॅव, फॅमिली, मेरा परिवार, हिरॉईन ऑफ द डेझर्ट, मी तिरस्कार करणार नाही' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १०१०/-**

*१५ मे ते १६ मेपर्यंत*

**सवलत किंमत ६०६/-**

## APRIL महिना विशेष

### 'एप्रिल फूल नको, करा एप्रिल कूल'

### 'A' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४३% पर्यंत सूट.

**संच - १** मधील २७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ६०९८/-** **सवलत किंमत - ३४७६/-**

**संच - २** मधील २८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ६२४०/-** **सवलत किंमत - ३५५७/-**

**संच - ३** मधील ३० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ६०७४/-** **सवलत किंमत - ३४६२/-**

**संच - ४** मधील ३० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ६१३०/-** **सवलत किंमत - ३४९४/-**

**संच - ५** मधील ३७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५९२०/-** **सवलत किंमत - ३३७४/-**

### 'P' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट.

**संच - १** मधील ३३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५८७५/-** **सवलत किंमत - ३५२५/-**

**संच - २** मधील ३५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५८४०/-** **सवलत किंमत - ३५०४/-**

**संच - ३** मधील ३२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५९६५/-** **सवलत किंमत - ३५७९/-**

### ‘R’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४३% पर्यंत सूट.

**संच - १** मधील **३९** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ६३१५/-** **सवलत किंमत - ३६००/-**
*१६ एप्रिल ते ३० एप्रिलपर्यंत*

### ‘I’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट.

**संच - १** मधील **२०** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५७८०/-** **सवलत किंमत - ३४६८/-**
*१६ एप्रिल ते ३० एप्रिलपर्यंत*

### ‘L’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट.

**संच - १** मधील **२०** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५३६५/-** **सवलत किंमत - ३२१९/-**
*१६ एप्रिल ते ३० एप्रिलपर्यंत*

## MAY महिना विशेष

**‘मे’च्या सुट्टीची मौज मोठी, ‘MAY’च्या पुस्तकांनी रंगेल सुट्टी’**

### ‘M’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट.

**संच - १** मधील **२७** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५९७०/-** **सवलत किंमत - ३५८२/-**

**संच - २** मधील **३१** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५९२०/-** **सवलत किंमत - ३५५२/-**

**संच - ३** मधील **२९** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५७१५/-** **सवलत किंमत - ३४२९/-**

**संच - ४** मधील **२५** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५७५५/-** **सवलत किंमत - ३४५३/-**

**संच - ५** मधील **२७** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत - ५७५०/-** **सवलत किंमत - ३४५०/-**

‘A’आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचासाठी एप्रिल महिन्यातील ‘A’आद्याक्षराचा संच पहावा.

**‘Y’ आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ३२% पर्यंत सूट.**

**संच - १** मधील **११** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - १७५५/-** **सवलत किंमत - ११९३/-**

*१ मे ते ३१ मेपर्यंत*


**आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील आणि आद्याक्षरांच्या पुस्तकसंचावर विशेष सवलत.**

**किमतींमध्ये बदलाची शक्यता**

**अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / What's App No. 9420594665**

website : www.mehtapublishinghouse.com

अनवाणी चालणारा वाट चुकला की,
भांबावून काट्याकुट्यांतूनही जातो.
तळपायांना पुढे कुरपे होतात,
ती त्याला जन्मभर वागवावी लागतात.




**व्यंकटेश माडगूळकर**

३ री आवृत्ती

# ॥ शिवछत्रपती ॥

एक मागोवा




**डॉ. जयसिंगराव पवार**

**किंमत : १७०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**


राणी सोयराबाईंनी शिवछत्रपतींवर
विषप्रयोग केल्याचा आरोप खरा आहे काय?
शिवछत्रपतींना उपस्त्रिया होत्या काय?
संभाजीराजे शिवछत्रपतींवर रुसून दिलेरखानास
का मिळाले?
वतने खालसाचा शिवछत्रपतींचा निर्णय म्हणजे
एक आमूलाग्र समाजक्रांतीच कशी होती?
शिवछत्रपतींचे कूळ 'गवळी-धनगर' होते काय?
'जेम्स लेन प्रकरण' काय आहे?
या व यांसारख्या अनेक प्रश्नांची चर्चा ज्येष्ठ
इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार
आपल्या या लेखसंग्रहात करत आहेत.

## पुस्तक परिचय

# समुद्रकाठचे एक वर्ष



जोआन अँडरसन या पत्रकार आणि नामवंत लेखिका आहेत. त्यांचा जन्म न्यू यॉर्कमध्ये झाला. त्यांनी येल युनिव्हर्सिटी ऑफ ड्रामामधून पदवी संपादन केली. लहान मुलांसाठी त्यांनी '१७८७', 'द फर्स्ट थँक्सगिव्हिंग फीस्ट','द अमेरिकन फॅमिली फार्म' यांसह अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'अ वॉक ऑन द बीच', 'द सेकंड जर्नी', 'ॲन अनफिनिश्ड मॅरेज', 'अ वीकेन्ड टु चेंज युवर लाईफ' ही त्यांची जास्त विकली गेलेली पुस्तके आहेत. 'ब्रेकिंग द टीव्ही हॅबिट' हे त्यांचं टीकात्मक पुस्तक आहे. दूरदर्शन आणि वृत्तपत्रांसाठीही त्यांनी लेखन केलं. स्त्रियांच्या प्रश्नांवर आपले विचार त्या नेहमीच मांडत असतात. स्त्रियांसाठी त्या वीकेन्ड शिबिरांचं आयोजन करतात आणि स्त्रियांना स्वाभिमानाने जगायला शिकवतात.




लेखक

**जोआन अँडरसन**

अनुवाद

**अरुंधती चितळे**

वैवाहिक जीवनाचा नवा पैलू उलगडणारी कथा

*परस्परांमधील नातं विरत चालल्यामुळे एक दाम्पत्य एकमेकांपासून विलग होण्याच्या वळणावर येऊन ठेपलंय; पण पत्नी जोआन असं ठरवते की, घटस्फोट न घेता वेगळं राहायचं. नवरा नोकरीच्या निमित्तानं वेगळ्या शहरात जाऊन स्थायिक होतो. जोआन केपकॉर्ड या आपल्या मूळ गावी येते. जुन्या स्मृतींमध्ये रमते. नवीन स्नेहबंध जुळतात. समुद्रकाठी वसलेल्या या निसर्गसंपन्न गावात तिच्या मनाची कवाडं खुली होतात. तिला स्वत:च्या अस्तित्वाची नव्याने जाणीव होते आणि मग ती आपल्या वैवाहिक जीवनाकडे तटस्थपणे बघू लागते. पती-पत्नीच्या नात्याकडे बघण्याचा वेगळा दृष्टिकोन तिला मिळतो. या वर्षभराच्या*

*'ब्रेक'मध्ये तिला अनेक अनुभव येतात. हळूहळू पती-पत्नी दोघांनाही आपण काय हरवलं आहे किंवा आपल्याला नव्यानं काय गवसलं आहे, याचा गांभीर्यानं विचार करू लागतात. एका निर्मनुष्य बेटावर एक रात्र घालवून आपल्या 'एकटेपणा'तली मजा उपभोगताना तिला आपल्या नवऱ्याविषयी असणाऱ्या भावना समजतात. पती-पत्नीचे काही काळानं गुळगुळीत, यांत्रिक होणारं नातं एखादा 'ब्रेक' घेऊन नव्या दमानं सुरू करण्यात असणारी मजा ही कथा सांगते.*


*जगाच्या सुरुवातीला फक्त एक विचार होता,*
*ज्याचं नाव स्त्री होतं.*
*ती स्त्री वृद्ध असून, ती तुमचं जगणं अर्थपूर्ण करते.*
*ती स्त्री कोळ्यासारखं आपल्याला एकत्र जाळ्यात गुंफते.*
*ती एक विचारी शक्ती आहे, जी सर्वांना आठवणीत ठेवते*
*व सतत त्यांचे स्मरण ठेवते.*

**– *निनावी***

**त्या** माझ्या आयुष्यात एखाद्या पौर्णिमेच्या चंद्रासारख्या अवतरल्या. हो, तोच पौर्णिमेचा चंद्र, जो समुद्राच्या लाटांना भरती आणतो. आमच्या त्या धुक्यातल्या पहिल्या भेटीनंतर आम्ही एका सुंदर संध्याकाळी पुन्हा भेटलो आणि आमच्या मैत्रीवर शिक्कामोर्तब झालं. सुरुवातीच्या भेटीत मी लाजरीबुजरी, जरा हातचं राखूनच वागत होते. जरा दडपणच होतं मला. त्याचं कारणंही तसंच होतं. 'टाईम' मासिकावरचा त्यांच्या नवऱ्याचा तो फोटो बघितला आणि मी दडपले. ते एक मोठे मानसोपचारतज्ज्ञ होते. एरिक एरिकसन. अशा सुप्रसिद्ध व्यक्ती मला अशांत करतात. माझी त्यांच्याशी बोलायची लायकी आहे का, या विचाराने मी अस्वस्थ होते. पण जोआनने मला विश्वास दिला. त्याही माझ्यासारख्या अस्वस्थेतून गेल्या आहेत, असं म्हणाल्या आणि माझी शरीराने म्हाताऱ्या, पण मनाने तरुण अशा जोआनबरोबर दृढ मैत्री झाली.

२ री आवृत्ती

# ॥ छत्रपती संभाजी ॥
## ए क चि कि त्सा




**डॉ. जयसिंगराव पवार**

**किंमत : १८०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

छत्रपती संभाजी महाराज मराठ्यांच्या इतिहासातील एक वादग्रस्त व्यक्तिमत्त्व...
या संभाजीराजांवर अन्याय कोणी केला?...
साहित्यिकांनी?... इतिहासकारांनी?... की बखरकारांनी?...
रायगडावरील गृहकलह का सुरू झाला?...
संभाजीराजे दिलेरखानास का मिळाले?...
वसंत कानेटकरांचे विश्लेषण किती खरे?...
'गोदावरी'चा प्रसंग खरा आहे काय?...
संभाजी चरित्रामधील राणी सोयराबाईंची भूमिका कोणती?...
संभाजीराजांनी प्रधानांना का शिक्षा केली?...
संभाजीराजांनी 'हिंदवी स्वराज्य' बुडविले की त्याचे प्राणपणाने रक्षण केले?...
संभाजीराजे मृत्यूला सामोरे कसे गेले?...
या व अशा अनेक प्रश्नांची चिकित्सा महाराष्ट्रातील ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार प्रस्तुत ग्रंथात करत आहेत...

खरी नाती अशीच सहजपणे जुळतात मला वाटतं. सारख्या विचारांचे आत्मे सहजपणे एकमेकांना शोधत एकत्र येतात. मग सारा औपचारिकपणा गळून पडतो. सहजपणे, एक नवं नातं निर्माण होतं. आम्ही पहिल्यांदा त्या धुक्यात भेटल्याला आता सहा आठवडे होऊन गेले होते. आमची मैत्री प्राथमिक फेरी पार करून पुढच्या टप्प्यावर पोहोचली होती. एकदा तर त्या म्हणाल्यादेखील, ''आपण जर आता आपल्या खऱ्या भावना एकमेकींपासून लपवत बसलो, तर आपण पुरुषांसारखंच वागू. पुरुष नेहमीच आपल्या भावभावना लपवत जगत असतात. खरंतर आपण सारेच इतके गंभीर असतो प्रत्येक बाबतीत, पण प्रत्यक्षात मात्र आपण चांगलेच विनोदी वागतो.''

माझ्या मैत्रिणीबरोबर घालवणारा वेळ मला एखाद्या परिकथेसारखाच वाटे. मुळात लहानपणापासूनच मला पऱ्या खूप आवडत. त्यांच्या हातातल्या जादूच्या कांडीने त्या सामान्याला असामान्य, कुरूपतेला सुंदर आणि गुलामाला स्वतंत्र बनवतात. मलाही अशीच एक नव्वद वर्षांची म्हातारी, सुंदर परी भेटली होती, जी आपली हुशारी, चातुर्य विणत बसली होती आणि मलाही तेच शिकवत होती. आयुष्याचं महावस्त्र विणायला मला ती शिकवत होती. ''स्वत:पुरती नेहमी एक जागा ठेव,'' ती परी सांगत असे. ''आयुष्याचे रंग एकमेकांत मिसळताना प्रत्येक रंगाचा अर्थ, त्याची ताकद नीट समजून घे. काही न समजता घाईने जर ते एकमेकांत मिसळले, तर साराच गोंधळ होईल. स्वातंत्र्य, भावना, जवळीक, अपेक्षा, सुख, दुःख साऱ्या धाग्यांचे रंग, पोत, ताकद वेगवेगळी आहे. ती नीट समजावून घ्यायला पाहिजे.'' आता आम्ही छोटी छोटी जाजम विणत होतो. मी माझ्या स्वभावानुसार, घाईघाईने वेगवेगळ्या रंगांचे धागे एकत्र मिसळत होते. त्यांची शिकवण होती की, 'खरा आनंद काहीतरी करत राहण्यात आहे. विणत राहण्यात आहे. विणताना कापड घट्ट ओढलेलं असावं म्हणजे कळतं, आपण काय विणतो आहे. त्याचा आकार, त्याचं डिझाईन, याची कल्पना येते. मुली लक्षात ठेव, अजून अर्धं आयुष्य तुझ्याकडे शिल्लक आहे. प्रत्येक स्त्रीला एखादा मार्गदर्शक जरूर भेटावा. आई सोडून. कारण आई शिकवताना फार अपेक्षा ठेवते. आपली मुलगी

कशी होईल, ती पडल्यानंतर जी कायम आधारच देते, संकटांना सामोरे जाताना जी तुमच्या संकटात सहभाग घेते, जी अडचणींवर मात करायला शिकवते. हे उत्तम असलं तरी यात आधार घेण्याची, अवलंबून राहण्याची वृत्ती वाढते.' पण जोआनच्या बाबतीत असं नव्हतं. त्या फक्त दिशा दाखवायचं काम करत, त्यावर विचार करायला भाग पाडत. आपापला मार्ग आपण कसा निवडायचा यावर टिपण्णी करत. थोडक्यात झोपलेल्याला फक्त जागं करायचं काम करत. त्यांचे येणारे फोनही अगदी सकाळी सकाळी येत. त्यांचा गोड पण ठाम स्वर कानात पडताच एक उत्साहाची लहर अंगात धावे.

"हॅलो, काय आजचा दिवस काहीतरी वेगळं करायचंय का?"

"तुमच्या मनात काय आहे? कुठे जायचं आहे?"

"विशेष काही नाही. फक्त बाहेर पडून जरा अनुभव गोळा करायचे आहेत."

आजही असंच त्यांच्या बोलवण्यावरून मी त्यांच्या घरी निघाले होते. साधारणपणे दुपारी मी त्यांच्या घरी पोहोचले. त्यांचं घर सेंट फ्रान्सिसच्या पुतळ्यापासून जवळच होतं. दाट झाडीत ते वसलं होतं. नाना प्रकारचे पक्षी त्यांच्या आजूबाजूला झाडांवर येत. बरेच बर्ड फिडर वेगवेगळ्या ठिकाणी लावून ठेवले होते. दाराच्या बाजूला  लोखंडी त्रिकोणात पाटी लावली होती – 'बेल जोरात वाजवा'. बरेचदा वाजवल्यावर घरगुती कपड्यांत त्या दार उघडायला आल्या. आनंदित होत मला त्यांनी मिठीत घेतलं. मी मात्र घाबरतच मिठी मारली. हो, न जाणो, एखादं हाड वगैरे तुटायचं. पण त्या चतुर होत्या. लगेच म्हणाल्या, "मुळीच घाबरू नकोस. माझी हाडं तशी पक्की आहेत. आत ये, मला तुला एक विशेष गंमत दाखवायची आहे."

माझा हात धरून त्या हॉल पार करून बाहेर लिव्हिंग रूममध्ये गेल्या. तिथे मला एका आरामखुर्चीत बसवलं आणि आपण टेबलाशी खुर्चीवर बसल्या. टेबल वेगवेगळ्या प्रकारच्या लिखाणसाहित्याने नटलेलं होतं. 'सतत हसत राहा' असा संदेश टेबललॅम्पशेजारी टांगला होता. त्यांनी बऱ्याच कागदांची उलथापालथ करून एक कागद शोधून काढला.

मी तुझ्यावर एक कविता केली आहे. ऐक हं–

“अजून तिच्या केसांना
स्पर्शही झाला नाही दाट धुक्याचा.
तोवरच या अधीर स्त्रीला
जाणून घ्यायचाय प्रवास या पक्ष्याचा.
खुल्या मनाला खोली असते वाढण्याची,
जशी प्रकाशाला सोबत असते सावलीची.
घडतंय ते घडू दे सावकाश.
वाढू दे सावकाश. समजू दे सावकाश.
सारं कसं जरा धीराने... धीराने...”

मला कसंतरीच झालं. त्यांनी माझ्या घाईघाईने उत्तर शोधण्याच्या स्वभावावर बरोबर बोट ठेवलं होतं. खरं तर माझ्या आयुष्यात त्या अजून डोकावल्या नव्हत्या. नवऱ्याला सोडून मी इथे का राहते आहे, याची त्यांना कल्पना नव्हती. पण माझी ही धडपड त्यांना नक्कीच कळली होती.

“धीर हा शब्द तुझ्या कोशातच नाही ना मुली?” शांततेचा भंग करत त्या म्हणाल्या. “पण तू एवढी अस्वस्थ होऊ नकोस. कुठलीच गोष्ट सहजपणे समोर येत नाही. सतत निरंतर घडण्यातून आपण आपल्याला हवं ते निवडायचं असतं.”

माझ्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. माझ्यातल्या खऱ्या ‘मी’ला त्या आता ओळखू लागल्या होत्या बहुधा.

“तुझ्यातला फसफसता उत्साह मला कळतोय. तुझ्यातली जागी होणारी ‘तू’ मला जाणवतेय. खूप काही चांगलं घडतंय.”

त्या बहुधा खरंच बोलत होत्या. माझ्या भविष्याविषयी विचार करताना मी कुठेतरी अडत होते.

“पूर्वीच्या आयुष्यात तू प्रत्येक बाबतीत फार काळजीपूर्वक, काटेकोर निर्णय घेतले होते. त्यात तुझ्यातल्या स्वत:ला तू पार गुदमरवून टाकलंस. मग एवढी घाई आज आहे, त्यात आश्चर्य कसलं?”

गालावर अश्रू वाहण्याचा वेग अजूनच वाढला. लपलेल्या व्यक्तीला शोधून काढल्यावर जसं वाटतं, तसं मला वाटू लागलं. खरं तर मी कधीची वाट बघत होते अशा माणसाची, जो माझ्या चेहऱ्याआडचा चेहरा ओळखू शकेल.

मी काय विचार करतेय तो कळला आहे अशा प्रकाराने हसत त्या म्हणाल्या, ''साऱ्यांना स्त्रिया अशाच हव्या असतात. समजूतदार, ज्यांच्यावर राज्य गाजवता येईल अशा. पण गंमत अशी आहे की, आपल्याला ते खटकत तर नाहीच, उलट त्याचं भूषणच वाटतं.''

यावर आम्ही दोघीही खूप हसलो. घर सोडून आल्यापासून आज पहिल्यांदाच मला माझ्या निर्णयाची खात्री वाटली.

मी म्हणाले, ''घर सोडून येण्याचा निर्णय खूप कठीण होता. पण मला आतून असं वाटत होतं की, बाहेर पडून जरा निसर्गात जावं. त्याचे नियम समजावून घ्यावेत.''

''मी पण इथे आले, ते माझ्या नवऱ्याच्या दुर्बलतेवर मात करायला. ओळखीच्या, परिचयाच्या लोकांत राहून तुम्ही हे साध्य करू शकत नाही. सगळ्यांच्या सूचनांचा, मतांचा तुमच्यावर परिणाम होतो व तुम्ही स्वतंत्रपणे निर्णय घेऊच शकत नाही.''

मला आमच्या दोघींच्या परिस्थितीची खूप मजाच वाटली. त्या नवऱ्यासकट स्वातंत्र्याच्या शोधात पळून आल्या, तर मी नवऱ्याशिवाय स्वातंत्र्याच्या शोधात इकडे पळून आले.

''पण इकडे येणं हा खूपच चांगला निर्णय होता. आहे त्या परिस्थितीत लहान मुलासारखं रडत बसण्यापेक्षा हे खूप चांगलं आहे. बायकांना अवलंबित्वाची भावना म्हणजेच प्रेम असं वाटतं. ज्यावर अवलंबून राहावं असं माणूस म्हणजे नवरा. त्याच्या छायेत त्यांना सुरक्षित वाटतं. पण लक्षात ठेव मुली, एकटेपणात माणसाचा सर्वांगिण विकास होतो. स्वत:विषयीच्या भ्रामक कल्पना लय पावतात.

मी माझ्या आयुष्यात सतत कशापासून तरी पळतेच आहे. मी लहान असताना जंगलात पळून जात असे, जिकडे मला मन:शांती मिळत असे. जरा तरुण झाल्यावर मी युरोपला निघून गेले. विसाव्या वर्षी युरोपला

निघून जाणं जरा चमत्कारिकच होतं. तिथे मी मला काय हवं होतं ते मिळवलं. स्वत:चं नावही बदललं. स्वत:ची ओळख निर्माण करणं फार महत्त्वाचं असतं. पण एक लक्षात ठेव, कुठलाही बदल घडवून आणण्यासाठी कृती आवश्यक असते. आपण काय बोलतो ते जर कृतीत आणलं नाही, तर त्या शब्दांना काही अर्थ नाही. ते केवळ पोकळ शब्दच राहतात, ज्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही.''

''मग कशासाठी थांबलो आहोत आपण? तुम्ही तर सतत मला उपदेशाचे डोस पाजण्यात गर्क आहात.'' इति मी.

त्यांना हसू आलं. आपला कोट व हॅट घेत त्या म्हणाल्या, ''हो, आपण बाहेर जायलाच हवं.''

आम्ही सरळ गाडीत बसलो आणि बंदराकडे निघालो. गाडी पार्क करताच अगदी नवतरुणीसारखं उडी मारून त्या खाली उतरल्या आणि भराभर चालत सुटल्या. ही जागा तशी कमी वर्दळीची. तशी लोकांनी वाळीत टाकल्यासारखी; पण नवोन्मेषशालिनी. आम्ही असं भासवत होतो की, इथे आम्ही आमच्या आत्म्याच्या शोधात आलो आहोत. विशेष काहीच शोधत नव्हतो. पण असा एक शिंपला, एखादा दगड, ओंडका शोधत होतो, जो आमच्याशी बोलेल. वादळामुळे भरपूर समुद्रवेली, शंख, शिंपले किनाऱ्यावर आले होते. वेलींमुळे आपण एखाद्या स्पंजवरून चालतो आहोत असं वाटत होतं. माझ्यापासून जरा अंतरावर माझी परी चालली होती. तेवढ्यात मी त्यांना खाली वाकताना पाहिलं. वाकून वेलीचा काही भाग आपल्या डोक्यावर ठेवत त्या म्हणाल्या, ''मी नेहमी स्वत: जलपरी असल्याचं स्वप्न कायम बघितलं आहे. आत्ता जर आपल्याला लोकांनी बघितलं, तर काय म्हणतील ना सारे?'' आणि त्या हसतच सुटल्या. माझ्या मनात आलं, त्या या साऱ्या पंचमहाभूतांचाच एक भाग आहेत. आत्ता त्यांच्याकडे बघताना मला आठवले सील्स. त्याही एक सील तर नसतील? सीलना जसं खोल समुद्राचं ज्ञान असतं, दुसऱ्यांना ऐकू न येणारं त्यांना ऐकू येतं आणि समुद्रातली वादळं त्यांना शक्ती देऊन जातात, तसंच काहीसं जोआनचं होतं. त्या प्राणी आणि मनुष्यप्राणी या दोघांची सरमिसळ तर नव्हत्या? कोण जाणे. पण एवढं खरं की,

त्यांच्या सहवासात प्रौढपणाचा मुखवटा गळून पडत असे. लहान मुलासारखं खेळकर, उत्साही, निर्व्याज, निर्धास्त वाटत असे. पाण्याचा किनारा कुठला आणि साधे वारे का वादळ कधी येतंय याची काळजी कशाला करायची?

बेपर्वाईने नजर सहज समोर टाकली, तर माझ्यापासून दहा पावलांवर एक कोल्हा उभा होता. मी घाबरून जोआनचा हात पकडला. कोल्हा सरळ माझ्याचकडे पाहत होता. मीही मग धीटपणे त्याच्या नजरेला नजर दिली. दोन मिनिटे तो आम्हाला निरखत राहिला. मग काय वाटलं, कोण जाणे. वळून झाडीत दिसेनासा झाला. जोआन टाळ्या वाजवत म्हणाल्या, "हे एकमेकांची प्रतिमा निरखत बसणं खूपच छान होतं."

आम्ही जरा पुढे चालत राहिलो. पुढे खूप शंख, शिंपले विखुरले होते. प्रत्येक ढिगात आपली काठी खुपसत जोआन त्या ढीगाला सुटं सुटं करत होत्या. एका लाकडाच्या ओंडक्यावर बसून मी ते दृश्य बघत होते.

"डोळ्यांना सुखवील अशीच ही जागा वाटतेय."

"काय म्हणालीस?"

"एका आजोबांनी खूप वर्षांपूर्वी मला हे सांगितलं होतं. वर्षातून एकदातरी जंगलात किंवा एखाद्या एकांत जागी जावं. तिथला निसर्ग दात्याच्या भूमिकेत असतो. एकटेच एकांतात असल्याने त्या दात्याचे दान आपण स्वीकारायला तयार असतो. खूप मनस्वास्थ्य बिघडलेला माणूसही अशा जागेवर येऊन शांत होतो. आपल्यालाच पडलेल्या ढीगभर प्रश्नांची उत्तरं त्याला या निसर्ग सान्निध्यात सापडतात. या शांततेला एक वेगळीच भाषा असते."

"हो, ही जागा चांगलीच आहे."

मी ओंडक्यावरून उठले. किनाऱ्यावर जरा फिरू लागले. फिरता फिरता मला एक रंगीत, सुंदर काचेचा तुकडा मिळाला. अजून शोध घेता घेता मला सात-आठ तुकडे मिळाले. कधीतरी हे तुकडे एकसंध वस्तूचा भाग होते. आज इकडे तिकडे विखुरले आहेत. पाण्यामुळे, वाऱ्यामुळे त्यांच्या कडा धारदार न राहता आता बोथट झाल्या होत्या. काळाचा परिणाम. केवढा बदल काचेच्या रूपात घडलाय. एखाद्या स्त्रीतला बदलही


असाच असतो का? तिच्यातली धारदार बाजू काळाने बोथट होते का? काहीतरी, कुठेतरी स्त्रीच्या आयुष्याविषयी जाणीव होत होती. एक संपूर्ण शिंपला सापडला. उघडा. आत काहीच नसलेला, पण तरीही दुसऱ्या भागाला घट्ट चिकटलेला. स्त्रीचं या शिंपल्यासारखंच असतं. तिच्यातला रस तिची मुलं, कुटुंब – तिने घट्ट शिंपल्यात बंदिस्त केलेलं असतं. पण मुलं मोठी झाली, शिंपला उघडला की ती रिकामी; पण नवऱ्याचं एक टोक घट्ट पकडून ठेवलेली. बाजूला काही छोट्या शिंपल्याही पडल्या होत्या. एकमेकांना चिकटलेल्या. पण वेळ आल्यावर विभक्त होणाऱ्या. आता मी माझ्याविषयी विचार करू लागले. मी अशी किती लोकांना चिकटले होते आणि दुसऱ्यांना मला चिकटायला दिलं होतं. गरज संपल्यावर मी जरा त्यांच्यापासून विभक्त का नाही झाले? खरं तर वेळेवर सोडून देण्यानेच आपण आपलं स्वातंत्र्य टिकवू शकतो.

काही वेळाने जोआन माझ्याकडे आल्या. माझा हात धरत त्या मला समुद्राला सामोरे घेऊन गेल्या. त्या विशाल समुद्रासन्मुख आम्ही दोघी शांतपणे उभ्या होतो, एकमेकींना मदत करत होतो. त्यांना माझी मदत एक जोडीदार म्हणून हवी होती. थोड्याशा साथसंगतीने त्यांच्यातल्या साहसी स्त्रीची तहान त्या भागवू शकत होत्या. मलाही माझ्या स्वातंत्र्याचा अर्थ कळायला त्यांची मदत होत होती. आमच्या या गुप्त खजिन्याच्या सफरीवर आम्हाला बरंच काही मिळालं होतं. आमच्या चित्तवृत्ती बहरल्या होत्या. स्वत:कडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला होता. निदान माझा तरी. माझ्यात कोणीतरी वेगळीच शक्ती भरली आहे, असं वाटत होतं. शरीर थकलं होतंच, पण मनही विचार करून थकलं होतं. पण उत्साह मात्र नुसता सळसळत होता. नवचैतन्यच मिळालं होतं जणू. आता आम्ही घरी जायला निघालो होतो. नवजीवन, नवीन उत्साह घेऊन. इथे आलो होतो, त्यापेक्षा वेगळ्या होऊन!

❖

**२ री आवृत्ती**

# मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध




**डॉ. जयसिंगराव पवार**

**किंमत : २४०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

शिवछत्रपतींच्या निधनानंतर औरंगजेब बादशहा आपल्या अफाट लष्करी शक्तिनिशी मराठ्यांची सत्ता समूळ नष्ट करण्याच्या महत्त्वाकांक्षेने दक्षिणेत धावून आला आणि त्यातून इतिहासप्रसिद्ध 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध' सुरू झाले. छ. संभाजी, छ. राजाराम व महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली मराठे २६ वर्षे लढले आणि अखेर बादशहास या मराठ्यांनी पराभूत करून आपल्या दफनभूमीचा शोध याच महाराष्ट्रात घ्यावयास लावला. अशा या स्वातंत्र्ययुद्धातील काही घटनांचा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी घेतलेला हा शोध.

या ग्रंथात आपण वाचाल...- राजधानी रायगडचा पाडाव - सूर्याजी पिसाळची भूमिका - छ. राजारामांचा जिंजीचा जीवावरचा प्रवास - इ.स. १६८१ ची मराठ्यांची मसलत - मराठ्यांची दिल्ली जिंकण्याची महत्त्वाकांक्षा - सेनापती संताजी घोरपडे याची शोकांतिका - छत्रपती राजारामांचा दासीपुत्र राजा कर्ण याचे तथाकथित राज्यारोहण - स्वातंत्र्यसौदामिनी महाराणी ताराबाईंच्या कार्याचे मूल्यमापन - मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा शोध आणि बोध.

## पुस्तक परिचय


# अवनी एक नवी



श्री. एकहार्ट टोले हे मूळचे जर्मन; पण आता अमेरिकेत स्थायिक झालेले प्रज्ञावंत, आत्मदर्शी लेखक.

The Power Of Now या त्यांच्या पुस्तकानं त्यांना जगात सर्वत्र आध्यात्मिक मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळवून दिली. कुठल्यातरी अज्ञात प्रेरणेमुळे ते चांगलं करिअर करण्याची शक्यता सोडून चेतना जागरणाच्या साधनेत मग्न झाले. द्वेष, हिंसा, अत्याचार ही मानवतेला जडलेली, अहंकारातून निर्माण झालेली दुखणी आहेत हे त्यांच्या ध्यानी आलं. यावर उपाय म्हणजे पृथ्वीवर एका नव्या चेतनेचं जागरण नि प्रकटन असं ते सांगतात.

पति-पत्नी, आई-वडील, मुलं, मित्र-सहकारी या सर्वांच्या नातेसंबंधांना ही जागृत चेतना टवटवीत, अर्थपूर्ण करते. उपनिषदं, बौद्ध वाङ्मय, चिनी अध्यात्म, जे. कृष्णमूर्ती आणि ख्रिस्तसाधना या सर्वांचा मोकळेपणाने संदर्भ देत ते सृष्टिविकासाला अनुकूल अशी एक नवीन जीवनपद्धती सुचवीत आहेत. ती म्हणजे 'A New Earth' – हे पुस्तक. त्याचा मराठी अनुवाद – 'अवनी एक नवी' या नावाने आपल्याला सादर करीत आहोत.




लेखक
**एकहार्ट टोले**

अनुवाद
**नीलिमा जोशी**

# जाऊ या उन्नत जीवनाकडे

जीवन अधिकाधिक प्रफुल्ल, प्रसन्न, प्रगल्भ होत जातं त्या अद्भुत वाटेने प्रवास करण्याची सिद्धता करू या.
सध्याच्या धावपळीच्या जगात आपण नको तितका विचार करतो; नको तेवढ्या गोष्टींच्या मागे धावतो आणि जगण्यातला निखळ आनंद हरवून बसतो. लोक आपल्याला काय म्हणतील? मित्र, कुटुंब आणि शेजारी यांच्या तुलनेत आपण
कुठे - कसे आहोत, याचा विचार करतो आणि आत खोलवर कुठेतरी आपल्याला चिंता वाटते की,

जसे आपण इतरांच्या दृष्टीत असायला हवे तसे आपण नाही आहोत की काय?

एकहार्ट टोले आपल्याला विश्वास देतात की भय, चिंता आणि सदैव 'हे हवं - ते हवं' म्हणणारी तृष्णा यातून मुक्त होणं सहज शक्य आहे. हे पुस्तक वाचताना तुम्ही स्वत:च्या जीवनाला घालून घेतलेल्या कृत्रिम मर्यादांमधून मोकळे व्हाल आणि प्रसन्नतेने, मुक्तपणे जीवन जगायला लागाल. आनंदाचा शोध घेणं सोडून द्या, मग तो तुम्हाला गवसेल; तुम्ही शब्दांत बांधू शकणार नाही अशा क्षणांत - अशा अनुभवांत!

तुम्ही कोण आहात याचा शोध घ्या आणि प्रसन्न, प्रगल्भ जीवनाच्या वाटेवरचा प्रवास सुरू करा!

## मानवी चेतनेचं पहिलंवहिलं उमलणं

**उद्‌बोधन**


एकशे चौदा दशलक्ष वर्षांपूर्वीची गोष्ट. एका सकाळी सूर्योदयानंतर पृथ्वीवरचं पहिलंवहिलं फूल उमललं. सूर्याच्या कोवळ्या किरणांनी त्याला स्पर्श केला. वनस्पती जगताच्या उत्क्रांती पर्वातली, त्याच्या परिवर्तनातली ही ऐतिहासिक घटना होती. त्यापूर्वी कित्येक दशलक्ष वर्षं ही पृथ्वी वनस्पतींनी डवरलेली होती; पण फूल फुलणं ही घटना नवी होती! ते पहिलं फूल कदाचित फार काळ राहिलं नसेल. सुरुवातीला फुलं फुलणं ही काहीशी दुर्मीळ, क्वचित आढळणारी गोष्ट असेल. कारण खूप-खूप फुलांचे बहर यायला वातावरण तितकं अनुकूल नव्हतं; परंतु एक दिवस ती निर्णायक वेळ आली आणि साऱ्या पृथ्वीवर रंग आणि गंध यांची जणू उधळण झाली! ज्ञानेंद्रियांनी अनुभव घेणारी चेतना त्या वेळी उपस्थित असती तर तिने हा रंग-गंधाचा उत्सव अनुभवला असता!

पुष्कळ काळानंतर आपण ज्यांना फुलं म्हणतो त्या नाजूक सुगंधी जीवांनी पृथ्वीवरच्या इतर प्रजातींच्या उत्क्रांतीमध्ये महत्त्वाचा सहभाग घ्यायला सुरुवात केली. मानवांना तर फुलांबद्दल विशेषच आकर्षण वाटू लागलं. मानवी चेतनेचा जसजसा विकास होऊ लागला तसतसं तिला जाणवू लागलं की, आपल्या अस्तित्वाच्या संघर्षाशी संबंध नसणारी आणि व्यवहारात उपयुक्त न वाटणारी फुलं आपल्यासाठी मोलाची आहेत. कितीतरी कलाकार, कवी आणि योगी यांच्यासाठी फुलं स्फूर्तीचा झरा ठरली. जीझस म्हणायचे की, फुलांच्या फुलण्याचं चिंतन करा आणि त्यांच्याकडून

२ री आवृत्ती

# राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे

**डॉ. जयसिंगराव पवार**




**किंमत : १४०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

राजर्षी शाहू छत्रपती महाराजांनी आपल्या कारकिर्दीत अनेक सामाजिक सभांच्या आणि परिषदांच्या व्यासपीठांवरून अध्यक्ष अथवा प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या भाषणांचा हा संग्रह आहे.

महाराजांच्या चरित्र-वाङ्मयात या भाषणांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ही त्यांच्या चरित्राची अनमोल साधनेच आहेत. महाराजांच्या समाजक्रांतीच्या विचारांचे अचूक मूल्यमापन करण्यासाठी या भाषणांचे अभ्यासकांना तसेच सामान्य शाहूप्रेमींना मोलाचे मार्गदर्शन होते.

ही भाषणे म्हणजे शाहू छत्रपतींच्या समाजक्रांतीची मूळ संहिताच आहे.

कसं जगायचं ते शिका. एकदा बुद्धांनी एक फूल हातात धरलं आणि त्याकडे पाहत 'मौन प्रवचन' केलं. तिथे उपस्थित असलेल्या महाकश्यप नावाच्या भिक्खूला ते कळलं. त्याच्या मुद्रेवर हळूहळू स्मित उमललं. असं सांगतात की, आत्मज्ञानाचं सूचक असलेलं ते स्मित पुढे अठ्ठावीस ज्ञानी महात्म्यांना, परंपरेनं लाभलं आणि त्यातूनच कालांतराने झेन ध्यानपद्धतीची सुरुवात झाली.

फुलाचं सौंदर्य न्याहाळण्याने मनुष्याला त्याच्या खऱ्या अंत:स्वरूपाचं सौंदर्य कळू लागतं असं म्हणतात. मानवी चेतनेच्या उत्क्रांतीत सौंदर्याची पहिली जाणीव हा फार महत्त्वाचा टप्पा मानला जातो. आनंद आणि प्रेम या भावना सौंदर्याच्या अनुभूतीशी फार जवळून जोडलेल्या आहेत. आपल्याही नकळत फुलं ही आपल्यासाठी श्रेष्ठ आणि अत्यंत पवित्र असलेल्या आपल्या अंतर्यामीच्या आत्म्याची अभिव्यक्ती झाली. फुलं ही वनस्पतींवर उमलतात; पण वनस्पतीपेक्षा ती फार तरल, नाजूक आणि अल्पजीवी असतात. जणू अज्ञात प्रदेशातून आलेले दूतच! आकारमय जगत अन् निराकार सत्य यांच्यातला जणू सेतूच असतात ती. मनुष्याला त्यांचा नाजूक सुगंध प्रिय असतोच; पण त्या सुगंधातून आत्म्याच्या विश्वाचा सुगंध आपल्याकडे येत असतो. मनुष्याची उन्नत अवस्था म्हणजे ज्ञानप्राप्ती किंवा आत्मसाक्षात्कार. त्याचप्रमाणे वनस्पती जगताची उन्नत अवस्था म्हणजे पुष्पित होणं.

खनिजं, वनस्पती, प्राणी किंवा मनुष्यजात या सर्व उत्क्रांतीच्या टप्प्यांवर उन्मीलन किंवा बहरणं, विकसणं असतं. पण केवळ उत्क्रांतीच्या टप्प्यावरची क्रमाने येणारी ती एक स्थिती नव्हे. ती आहे एक झेप. अस्तित्वाच्या एका पातळीवरून दुसऱ्या पातळीवर जाणारा; जणू आधीची अवस्था – त्यातील जडता राहतच नाही. एका अननुभूत तरलतेकडे चेतना झेपावते.

खडक-पाषाणाइतकं जड नि अभेद्य काय असू शकेल? पण त्यांच्यातही परिवर्तन होतं. त्यांचे स्फटिक बनतात. त्यातून आरपार प्रकाश जाऊ शकतो. आत्यंतिक उष्णता आणि दाबाखाली कार्बनच्या काही संयुगाचं हिऱ्यामध्ये रूपांतर होतं. अन्य काही खनिजाचं रूपांतर मौल्यवान खड्यांमध्ये होतं.

सरपटणारे प्राणी एक प्रकारे भूमीशी बांधलेले असतात. लक्षावधी वर्षं त्यांचं स्वरूप तसंच राहिलं; परंतु कालांतराने काहींना पंख फुटले; त्यांचे पक्षी झाले. गुरुत्वाकर्षणाची शक्ती त्यांच्यावर लक्षावधी वर्षं काम करत होती. तिला झुगारून ते आकाशात झेपावले. सरपटण्यात किंवा चालण्यात निष्णात होण्याऐवजी या दोन्ही क्रिया ओलांडून ते गेले.

अज्ञात कालापासून फुलं, स्फटिकं, मौल्यवान रत्नं आणि पक्षी यांना मानवी चेतनेच्या विश्वात एक विशेष स्थान आहे. इतर जीवाकारांप्रमाणेच ती मूळ जीवनचैतन्याची अल्पजीवी प्रकटीकरणं आहेत. मानवी चेतनेला ती आकृष्ट करतात याचं कारण त्यांची तरलता – अपार्थिवता!

एकदा का मनुष्याला आपल्या स्वत:मधील चेतनेच्या अस्तित्वाची जाग आली, त्याचं अवधान स्थिर जागृत झालं की, स्वत:च्या ठिकाणचा दिव्यांश आणि प्रत्येक जीवाच्या ठिकाणी असलेली चेतना एक आहेत अशी त्याला जाणीव होते. स्वाभाविकच त्या जीवांविषयी त्याला प्रेम वाटू लागतं. जोवर हे घडत नाही तोवर बहुतेक लोक बाह्य रूपाकडे, मनोकायिक अस्तित्वाकडेच पाहतात. स्वत:च्या आणि इतरांच्या आंतरिक चेतनेचं त्यांना भान नसतं.

परंतु हे भान अगदी पुसट रितीने ज्यांना असतं त्यांना जाणवतं की फुलं, स्फटिकं आणि मौल्यवान रत्नं आणि पक्षी यांच्या ठायी केवळ भौतिक, शारीर अस्तित्व नाही, काहीतरी अधिक आहे; म्हणून ते त्याकडे खेचले जातात. त्यांच्याबद्दल प्रेम निर्माण होतं. या गोष्टींमध्ये जी तरलता, अपार्थिवता असते ती त्यांच्या भौतिक अस्तित्वाने झाकोळून जात नाही. इतर जीवरूपांमध्ये ती झाकलेली असते. मात्र कुठल्याही नव्याने जन्मलेल्या जीवांमध्येही ही तरलता, अपार्थिवता आपल्याला जाणवते. छोटी बाळं, कुत्र्याची किंवा मांजरीची चिमुकली पिलं, छोटी कोकरं या सर्वांत ती जाणवते.

या सर्वांच्या ठिकाणी एक निरागसता, गोडवा आणि सौंदर्य जाणवतं. ते इहलोकीचं नसतं; पण ज्यांची चेतना फारशी संवेदनशील नाही अशांनाही ती आनंद देतात.

जेव्हा तुम्ही सजगपणे एखाद्या फुलावर, स्फटिकावर किंवा पक्ष्यावर चित्त केंद्रित करता पण त्याला काही नाव देत नाही, त्या वेळी ती गोष्ट तुमच्यासाठी निराकार अस्तित्वाकडे नेणारा दरवाजा होते. चैतन्याच्या विश्वाकडे नेणारं – एक छोटं का होईना – दार प्रत्येकाच्या अंतर्यामी असतं. म्हणून जणू आतून प्रकाशित आहेत, असं वाटणाऱ्या या तीन गोष्टींनी प्राचीन कालापासून मनुष्याच्या चेतनेच्या उत्क्रांतीला महत्त्वाचं साहाय्य केलं आहे. बौद्ध पंथामध्ये कमळाच्या गाभ्यातलं रत्न हे एक केंद्रवर्ती प्रतीक आहे. ख्रिस्तमार्गात शुभ्र कबूतर हे पवित्र आत्म्याचं प्रतीक मानलं आहे. संपूर्ण पृथ्वीच्या आणि मनुष्यजातीच्या चेतनेत जे आमूलाग्र परिवर्तन घडून येणार आहे, त्याची तयारी या प्रतीकांनी केली आहे. आजही ती करत आहेत. लवकरच चेतनेचं हे नवं जागरण आपण पाहणार आहोत.

**या पुस्तकाचा उद्देश**

वनस्पतींवर फुलोरा येणं हे फार वेधक असलं तरी मनुष्य चेतनेचा जो विकास होणार आहे त्याचं ते अगदी फिकं प्रतिबिंब आहे. मनुष्यजात आपल्या गोठलेल्या, यांत्रिक झालेल्या मनोरचनांच्या जडतेतून मोकळी होऊन चैतन्याचा प्रकाश आरपार जाऊ शकेल अशी पारदर्शी होऊ शकेल का? जडवादाला आणि जडत्वाला गुरुत्वाकर्षणासारखी जबर खेच असते. त्यातून आणि नामरूपांच्या, व्यक्तिमत्त्व नावाच्या एका बंदीशाळेतून, अहं नावाच्या पिंजऱ्यातून मुक्त होऊन ती वर झेपावू शकेल का?

अशा प्रकारच्या परिवर्तनाची शक्यता मनुष्यजातीतील प्रगत आत्म्यांनी फार पूर्वीपासून सूचित केली आहे. बुद्ध, जीझस आणि अन्य अनेक अनाम आत्मे ही मनुष्य चेतनेच्या बहराची, उमलण्याची साक्ष आहेत. ते आपले पथदर्शी, महान, अमोल आत्मे होते; परंतु त्यांचा संदेश आपल्याला नीट कळला नाही. त्या संदेशाचं विकृतीकरण झालं. काही मूठभर लोक सोडले तर या महान आत्म्यांच्या ज्ञानाचा लाभ मानवतेला झाला नाही. मनुष्यजातीत अपेक्षित परिवर्तन घडून आलं नाही.

या महात्म्यांच्या काळात होती त्यापेक्षा ही मनुष्यजात आंतरिक परिवर्तनाला आता अधिक योग्य झाली आहे का? असं का असावं? या आंतरिक परिवर्तनाची गती वाढवण्यासाठी आपण काय करू शकतो? अहंकेंद्रित अशा चेतनेच्या प्राचीन कालापासून असलेल्या स्थितीला कसं ओळखायचं? आणि नव्याने उदित होत असलेल्या मुक्त चेतनेची तरी खूण काय? या आणि अशा प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी हे पुस्तक लिहिलं आहे. आणखी विशेष म्हणजे ती नवी चेतना आपल्यात उदित होण्यासाठी, जुन्या चेतनेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी हे पुस्तक साधन म्हणूनही उपयोगी पडू शकेल. या पुस्तकात जे विचार, ज्या संकल्पना मांडल्या आहेत त्यांचा तुम्हाला मार्गदर्शक खुणा म्हणून उपयोग होऊ शकेल; पण प्रत्यक्ष परिवर्तन घडणार आहे ते तुमच्या स्वत:च्या चेतनेत.

तुमच्या ज्ञानात भर घालावी किंवा तुम्हाला काहीतरी गोष्ट पटवून द्यावी यासाठी हे पुस्तक नसून तुमच्या चेतनेत एक अभिनव परिवर्तन होण्यासाठी आहे. 'वा! वाचण्यासारखं आहे बरं का हे पुस्तक!' असं तुम्ही या पुस्तकाबाबत म्हणू शकणार नाही, कारण हे तर्क किंवा कल्पनांशी खेळण्याचं पुस्तक नाही. हे पुस्तक तुमच्याविषयी आहे. एकतर ते तुमच्या चेतनेची स्थिती बदलून टाकेल किंवा ते काहीच करणार नाही. मात्र, ज्यांची चेतना नव्या परिवर्तनाला सिद्ध आहे त्यांच्या चेतनेत हे पुस्तक नवजागर

अवश्य घडवून आणील. अजून सर्वांचीच तयारी झालेली नाही; पण काहींची अवश्य झालेली आहे. जागृत होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसोबत समूहाच्या चेतनेची जागृती जवळ येणार आहे. या व्यक्ती इतरांसाठी पायवाट सोपी करणार आहेत. चेतनेचं जागरण हे शब्द तुम्हाला अनोळखी वाटले तरी पुढे वाचत राहा. जागरणाच्या प्रत्यक्ष प्रक्रियेतूनच तुम्हाला या शब्दांची ओळख होईल. थोडी ओळख या प्रक्रियेला गती देईल. मग तुम्ही मागे फिरू शकणार नाही. काहीजणांना ही झलक, ही प्रचिती पुस्तक वाचतानाच येईल. काहींच्या बाबतीत ही परिवर्तन प्रक्रिया त्यांच्याही नकळत सुरू झालेली असते. आपल्याबाबत हे घडत आहे याची जाणीव त्यांना पुस्तक वाचताना होईल. काहींच्या बाबतीत व्यथेच्या निरासाच्या स्वरूपात ही प्रक्रिया सुरू झाली असेल; कुणाला मार्गदर्शक भेटलेले असतील, तर कुणाला 'द पॉवर ऑफ नाऊ' या पुस्तकाच्या वाचनातून जाग आलेली असेल किंवा वरीलपैकी अनेक बाबी एकत्रितपणे जाणवल्या असतील. जर जागरणाची प्रक्रिया तुमच्यात सुरू झालेली असेल तर हे पुस्तक तिला गती नि तीव्रता देईल.

चेतना जागरणाचा आवश्यक भाग म्हणजे आपल्यातील असावध, निद्रित अशा अहंकाराची विचारपद्धती, त्याचं बोलणं, त्याचं वर्तन यांची ओळख होणं आणि आपल्या चेतनेत जे सामूहिक स्वरूपाचे मानसिक संस्कार आणि रचना आहेत त्या उमजणं. म्हणून या पुस्तकात अहंकाराचे महत्त्वाचे गुणविशेष आणि त्यांचा व्यक्तीवर आणि समाजावर होणारा परिणाम यांविषयी लिहिलं आहे. त्याची दोन महत्त्वाची कारणं आहेत : एक म्हणजे अहंकाराची मूळ रचना जर समजली नाही, तर तुम्ही त्याला ओळखू शकणार नाही. तो तुम्हाला अशी भूल घालील की, पुन:पुन्हा तुम्हाला वाटेल की, तो अहंकार म्हणजेच आपण आहोत. हा तुमच्यात घुसलेला तुमचा शत्रू आहे आणि दुसरं कारण असं की, अहंकाराला ओळखणं हीच चेतना जागरणाची सुरुवात आहे. जसा अंधाराशी झगडा शक्य नसतो तसाच अहंकाराशीही; पण प्रकाश आल्यावर जसा अंधार राहत नाही तशी चेतना जागृत झाली की अहंकाराची निवृत्ती होते.

**मनुष्यजातीमध्ये पिढ्यान्‌पिढ्यांची विकृती**

मनुष्यजातीच्या प्राचीन धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरांचा आपण अभ्यास केला, तर दर्शनी भिन्नतेच्या तळाला दोन मूलभूत समान स्रोत वाहत असल्याचं ध्यानी येतं. त्यांचे अनुभव व्यक्त करायला विविध पंथ, विविध परिभाषा वापरतात; परंतु अंतिम सत्याचे दोन पैलू त्यातून व्यक्त होतात. एक म्हणजे साधारण मानवी चेतनेचा एक महत्त्वाचा भाग अयोग्य रितीने काम

करत आहे. हिंदू धर्माच्या गाभ्यातील विचारांमधील एक विचार आपल्याला सांगतो की, तो एक मोठाच सामूहिक भ्रम किंवा 'माया' आहे. रमण महर्षी तर सरळ-सरळच म्हणतात की, मन ही माया आहे.

वेगळ्या शब्दांमध्ये बौद्ध तत्त्वज्ञानही हेच सांगत आहे. मनुष्याचं मन दु:खाची निर्मिती करत असतं. दु:ख म्हणजे वेदना, असमाधान, व्यथा! मनुष्यचेतनेचा हा गुणधर्म आहे. बुद्ध म्हणतात, 'तुम्ही कुठेही जा, काहीही करा; प्रत्येक परिस्थितीतून मानवी मन दु:खाची निर्मिती करतच असतं.'

ख्रिस्तमार्गात 'प्रारंभीचं पाप' ही संकल्पना आहे. ती ख्रिस्ती समूहमनात खोलवर रुजलेली आहे. 'पाप' या शब्दाचे अनंत चुकीचे अर्थ लावले गेले आहेत. 'न्यू टेस्टामेन्ट' हा ख्रिस्ती धर्मग्रंथ ग्रीक भाषेत लिहिला गेला. त्या भाषेत या शब्दाचा अर्थ 'नेम हुकणे' असा आहे. बाण लक्ष्यावर न पोचता आजूबाजूला गेला की 'नेम हुकला' असं आपण म्हणतो. 'पाप' म्हणजे मनुष्यजीवनाचा हेतू समजण्यात, तिथवर पोहोचण्यात झालेली गफलत असा अर्थ आहे. जीवन अकुशलतेने, अंधतेने जगलं की, त्याची परिणती दु:खात होणारच. 'पाप' ही संकल्पना मानवी चेतनेतली एक मूलभूत विकृती दाखवून देते. परंपरेने या संकल्पनेवर चढवलेली पुटं काढून तिचा मूळ अर्थ पाहिला तर!

आजवर मनुष्यजातीने जी प्रगती केली आहे ती स्पृहणीय आहे; नाकारण्यासारखी नाही. संगीत, साहित्य, रंग, चित्रकला, वास्तुरचना आणि शिल्पकला यांत आपण अप्रतिम कलाकृती निर्माण केल्या आहेत. अलीकडच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञान यांनी आपल्या जीवनशैलीत विलक्षण बदल घडवून आणले. दोनशे वर्षांपूर्वी ज्या गोष्टी अशक्य वाटत होत्या त्या आता सहज शक्य झाल्या आहेत. मनुष्याला बुद्धीचं अपूर्व वरदान आहे. परंतु या बुद्धीला भ्रमाची एक झाक आहे हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्याच्या मनाला जो अहंकाराचा विकार झाला आहे तो विज्ञान तंत्रज्ञानामुळे कित्येक पट वाढला आहे; त्यामुळे पृथ्वीवर संहाराचं तांडव झालं आहे. त्याची झळ मानवजातीला आणि प्राणी-वनस्पती इत्यादी जीवजातींनाही पोहोचली आहे. विसाव्या शतकाचा इतिहास या संहारपर्वांनी भरलेला आहे आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या विकाराची तीव्रता दिवसेंदिवस वाढतेच आहे.

१९१४ मध्ये पहिलं महायुद्ध पेटलं. भय, हाव, सत्तापिपासू यातून क्रूर, विनाशकारी युद्धं उद्भवली. त्यातून गुलामी, छळवाद आणि सर्वग्रासी हिंसा यांचा वणवा पसरला. हे सारं तथाकथित धार्मिक संघर्षांमधून, विचारसरणींच्या संघर्षांतून घडलं. नैसर्गिक आपत्तींमधून जेवढी मनुष्यहानी

झाली नाही तेवढी या तथाकथित संघर्षांमधून झाली. १९१४ पर्यंत मनुष्याच्या बुद्धीने केवळ ऊर्जाचलित यंत्रंच निर्माण केली नव्हती तर बॉम्ब, मशिनगन्स, पाणबुड्या, अग्निप्रक्षेपक आणि विषारी वायूचीही बरोबरीनं निर्मिती केली होती. मानवी बुद्धी ही मनुष्याच्या विकृतीची दासी झाली होती! फ्रान्स आणि बेल्जियममधल्या दलदलीच्या प्रदेशातील युद्धात काही मैलांचा प्रदेश बळकावण्यासाठी लक्षावधी सैनिकांनी प्राण गमावले! १९१८ मध्ये पहिलं महायुद्ध संपलं. त्यातून जे जिवंत राहिले ते भयाने सुन्न होऊन या युद्धाचे भीषण परिणाम पाहू लागले. दहा दशलक्ष लोक या संहाराचे बळी झाले. कितीजण जखमी आणि अपंग झाले त्याची मोजदाद नाही. मनुष्यातील विकृतीचं हे भयाण दर्शन पूर्वी कधीच झालं नव्हतं; पण त्या वेळी कल्पनाही नव्हती की ही फक्त सुरुवात आहे!

विसाव्या शतकाच्या शेवटी आपल्याच बांधवांकडून धारातीर्थी पडलेल्या मानवांची संख्या शंभर दशलक्षांहून अधिक झाली. भिन्न राष्ट्रांच्या प्रत्यक्ष युद्धात जे कामी आले ते तर यात होतेच. पण ज्यांची क्रूरपणे सामूहिक हत्या करण्यात आली अशांचीही संख्या मोठी होती. स्टालिनच्या सत्तेखालच्या रशियात वर्गसंघर्षाच्या नावाखाली वीस दशलक्ष व्यक्तींना प्राणांना मुकावं लागलं. नाझी जर्मनीत जे सामूहिक अत्याचार झाले ते सांगायला शब्द धजत नाहीत! स्पेन आणि कंबोडिया येथील अंतर्गत यादवीतही फार मोठा मानव संहार झाला. या देशांमधली एक चतुर्थांश जनता मृत्यूच्या मुखात गेली.

रोजच्या दूरदर्शनवरच्या नुसत्या बातम्या पाहिल्या तरी ध्यानात येतं की, हिंसाचाराची आग शमलेली नाही. एकविसाव्या शतकातही हा वणवा वाढतोच आहे. मनुष्यचेतनेची आणखी विकृती म्हणजे मानवेतर जगतातली तिने चालवलेली निर्घृण हिंसा. आपल्याला प्राणवायू पुरवणाऱ्या वनस्पतीसृष्टीची बेफाम तोड, प्राण्यांची प्रचंड हिंसा, नद्या आणि समुद्र, तसेच पर्यावरण यांची अक्षम्य हानी! लालसेने प्रवृत्त होऊन आपलं या जीवसृष्टीशी आणि पर्यावरणाशी असलेलं नातं विसरून माणसं जर अशीच आंधळेपणाने संहाराची वाट चालत राहिली तर एक दिवस त्यांचा स्वत:चा विनाश अटळ आहे.

मनुष्यजातीच्या अंतरंगातील या विकृतीच्या सामूहिक आविष्कारांनी आपला इतिहास भरलेला आहे. हा सारा मनोविकृतीचा - वेडाचा इतिहास आहे. मानवजातीचा हा इतिहास मनोरुग्णतेच्या शास्त्राच्या दृष्टीने कोणा एका व्यक्तीचा इतिहास म्हणून पाहिला तर? मनोरुग्णतेची एकापेक्षा एक लक्षणं

दिसतात. दुसऱ्याविषयीचं भय नि संशय, तथाकथित शत्रूंविषयी द्वेष, हिंसाप्रवृत्ती आणि क्रूरता. मधला काही स्वास्थ्याचा काळ सोडला तर गुन्हेगार प्रवृत्तीची ही पिसाट हिंसा सर्वत्र दिसते.

भय, लालसा आणि सत्ताकांक्षा या मानवी मनाच्या प्रेरणा राष्ट्रं, जाती, धर्म आणि विचारसरणी यांच्यातल्या हिंसक युद्धाला तर कारणीभूत होतातच; पण व्यक्तिगत संबंधांतही त्या सततचा ताण नि संघर्ष उभा करतात.

आपल्या इतरांकडे पाहण्याच्या आणि स्वत:कडे पाहण्याच्या दृष्टीत त्या विकृती आणतात; त्यामुळे प्रत्येक परिस्थितीचा आपण विकृत अर्थ लावतो. भयापासून मुक्ती आणि लालसेची तृप्ती करण्याकरिता विकृत कृतींचा आधार घेतो. या गोष्टीला अंतच राहत नाही.

इथे हे लक्षात घेतलं पाहिजे की भय, लालसा आणि सत्ताकांक्षा या मूळ विकृती नसून मनुष्यचेतनेत खोलवर लपलेल्या एका मूलभूत भ्रमात त्यांचा जन्म होतो. भय आणि लालसा यातून मुक्त व्हा असं आपल्याला अनेक धर्मपंथ सांगत असतात. परंतु त्यांचं अनुसरण शक्य होत नाही. कारण या भ्रमाच्या मुळाशी आपण जात नाही. भय, लालसा, सत्ताकांक्षा ही मुळातली कारणं नव्हेत. आपण सदाचारी, चांगली माणसं होण्याचा प्रयत्न करतो. परंतु जोवर चेतनेत परिवर्तन होत नाही तोवर हा प्रयत्न यशस्वी होणार नाही. या प्रयत्नाने भय, लालसा, सत्ताकांक्षा यांचं दर्शनी स्वरूप बदलेल. त्या अधिक सूक्ष्म होऊन रूप बदलतील; पण स्वत:ची प्रतिमाच मजबूत करत जातील. आपल्याला चांगलं 'बनायचं' आहे, सत्प्रवृत्त 'व्हायचं' आहे असं नसून मुळात जो चांगुलपणा, सत्प्रवृत्ती आपल्यात आहेच ती शोधायची आहे. तिच्या प्रकटीकरणाला वाव द्यायचा आहे. पण आपल्या चेतनेत मूलभूत बदल झाल्याशिवाय हे शक्य होणार नाही.


साम्यवादाचा इतिहास पाहा. त्याच्या मूळ प्रेरणा चांगल्याच होत्या; परंतु अंतर्विश्वात, आंतरिक चेतनेत बदल न घडवता नुसता बाह्य परिस्थितीत बदल घडवण्याचा अट्टाहास केला तर काय अनर्थ होतो याचं ते चांगलं उदाहरण आहे. अहंकार ही मनुष्याच्या चेतनेतील मूलभूत विकृती आहे. ती नाहीशी केल्याशिवाय बाह्य सुधारणेचे सर्व प्रयत्न असफल ठरतात.

❖

**३ री आवृत्ती**

# मराठेशाहीचे अंतरंग

**डॉ. जयसिंगराव पवार**




**किंमत : १७०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

संभाजी राजांना मोगलांनी कैद केल्यावर त्यांना सोडविण्यासाठी काही प्रयत्न झाले की नाही? झाले असल्यास ते कोणते? - छ. राजाराम महाराजांची पहिली राणी- प्रतापराव गुजरांची कन्या, ही लग्नानंतर लवकरच मरण पावली, असे इतिहासकार मानत आले. प्रत्यक्षात ती सन १७१९ पर्यंत जिवंत होती, मग ती होती कोठे? -गिरजोजी यादवासारखा एक देशमुख- वतनासाठी काय काय करत होता? वतनासाठी वतनदार काय काय खटपटी लटपटी करत? - खेडच्या लढाईत सेनापती धनाजी जाधव ताराबाईचा पक्ष सोडून शाहू महाराजांना का जाऊन मिळाला? -सन १७१४ मध्ये पन्हाळगडावर महाराणी ताराबाई व त्यांचे पुत्र शिवाजीराजे यांच्या राजवटीचा अंत घडवून आणणारी 'राजवाड्यातील क्रांती' कोणी घडवून आणली?- पुण्याच्या पेशव्यांशी प्रसंगी मुत्सद्देगिरीने वागून, संघर्ष करून, कोल्हापूरकर राणी जिजाबाई यांनी आपल्या राज्याचे रक्षण कसे केले? - माणुसकीला काळिमा फासणारी मराठेशाहीतील स्त्रीगुलामांची खरेदी-विक्री कशी होत असे? - मराठेशाहीतील छत्रपती, शिवरायांचे वंशज यांची सत्ता का लयाला गेली? यांसारख्या मराठेशाहीच्या अंतरंगातील अनेक प्रश्नांचा शोध घेत आहेत प्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार.

# मातीचे मम अवघे जीवन



क्रिस्टीन किंबल या उत्तर न्यू यॉर्कमध्ये राहणाऱ्या एक शेतकरी आणि लेखिका आहेत. शेती करण्याआधी किंबल एक स्वतंत्र लेखक, शिक्षक आणि न्यू यॉर्क शहरात साहित्यिक सहाय्यक म्हणून काम करीत होत्या. त्यांचा जन्म १९७१मध्ये मध्य न्यू यॉर्क येथे झाला. १९९४मध्ये हार्वर्डमधून त्यांनी पदवी प्राप्त केली.
नंतर त्या न्यू यॉर्क सिटीमध्ये गेल्या, जेथे त्यांनी एका साहित्यिक संस्थेत काम केले. सर्जनशील लेखन शिकवले आणि मासिके व प्रवास मार्गदर्शनासाठी त्या मुक्त झाल्या. २००२मध्ये त्यांनी मार्क नावाच्या एका विंगनट शेतकऱ्याची मुलाखत घेतली आणि त्याच्या पेशात आवड निर्माण झाली. त्यांनी व अन्य सहकाऱ्यांनी मिळून २००४मध्ये एसेक्स फार्मची स्थापना केली.
त्यांनी आपले पती मार्क यांच्यासह २००३पासून एसेक्स फार्म चालवले आहे. त्यांना दोन मुली आहेत.




लेखक

**क्रिस्टीन किंबल**

अनुवाद

**मेधा मराठे**

क्रिस्टीन किंबल एका तरुण, तडफदार शेतकरी मार्क याची मुलाखत घेण्यासाठी न्यू यॉर्कहून गेली तेव्हा तिचं जगच बदललं. एका अंतःप्रेरणेनं तिनं आपलं शहरी आयुष्य सोडलं आणि लेक चॅम्पलेनजवळ त्याच्याबरोबर पाचशे एकरांमध्ये नवीन शेत वसवायला सुरुवात केली. 'द डर्टी लाइफ'मध्ये या जोडप्यानं उत्तरेकडील प्रदेशातील अति थंड हिवाळ्यापासून सुगीच्या हंगामातील कोठारातल्या पोटमाळ्यावरच्या लग्नापर्यंत कसे दिवस घालवले, याचा साद्यंत वृत्तान्त सांगितला आहे.

प्रत्येक गोष्ट उत्पादित करून समाजाला परिपूर्ण आहार द्यायची क्रिस्टीन आणि मार्कची कल्पना ध्येयवादी व रोमांचकारी होती आणि ती यशस्वी झाली. वर्षभर शंभराच्या वर माणसं प्रत्येक शुक्रवारी संध्याकाळी एसेक्स फार्मवर जाऊन त्यांच्या परिपूर्ण आहारातला आठवडी सहभाग आणतात. बीफ, पोर्क, कोंबड्या, दूध, अंडी, मेपलचा पाक, धान्यं, पिठं, वाळविलेला घेवडा, सुगंधी वनस्पती, फळं आणि चाळीस वेगवेगळ्या भाज्या, हे सर्व शेतावर

पिकतं. या डर्टी लाइफमध्ये- मातीतल्या आयुष्यात- क्रिस्टीनला शारीरिक कष्ट करण्यातला आनंद गवसतो. चांगल्या आयुष्याचा केंद्रबिंदू चांगलं अन्न आहे, हे तिला समजतं. ती त्याच्या प्रेमात पडते. शेवटी त्या माणसाशी, त्या लहान गावाशी आणि त्या सुंदर जमिनीशी एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहण्यात धन्यता मानते.

## मनोगत

'द डर्टी लाइफ' ही क्रिस्टीन किंबल यांची आत्मकथा वाचून मी भारावून गेले. कित्येक दिवस मी क्रिस्टीनबरोबर 'एसेक्स फार्म'वर फिरते आहे आणि अनुवाद संपला तरी मन अजून तिथेच घोटाळत आहे. क्रिस्टीनची ही प्रेमकथा केवळ माणसावरील प्रेमाची नसून अपूर्णत्वातून पूर्णत्वाकडे नेणाऱ्या मातीवरील ओढीची ही कथा आहे. तिनं त्यासाठी सुंदर, सोपे शब्द वापरून भाषा प्रवाही ठेवली आहे. मी या आत्मकथेचा अनुवाद मूळ पुस्तकाप्रमाणेच केला असून जरूर तेथेच इंग्रजी शब्दांचा वापर केला आहे.

या अनुवादाची जबाबदारी माझ्यावर सोपविल्याबद्दल मेहता प्रकाशनाचे मी मनापासून आभार मानते. काही अनुवादाबाबत मोलाचा सल्ला दिल्याबद्दल सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. अनंत मनोहर व प्रा. ना. कृ. मराठे यांच्याबद्दल मी कृतज्ञ आहे. सौ. वृषाली मराठे हिचेही मोलाच्या सल्ल्याबद्दल मनापासून कौतुक.


**– मेधा मराठे**

सोसाट्याचा वारा असलेल्या एके दिवशी आम्ही पहिल्यांदा एसेक्स फार्म बघायला गेलो. तो सप्टेंबर महिना होता. आम्ही पोकेप्सीपासून उत्तर दिशेला धिम्या गतीनं जाणारी आगगाडी पकडली होती. आमच्या सायकली आणि कँप टाकायची साधनसामग्री मालाच्या डब्यात टाकली. आम्ही आदळत आपटत हडसनहून ॲडिरॉन्डॅक पार्क व तिथून लेक जॉर्ज मागे टाकून लेक चॅम्प्लेनच्या किनारी असलेल्या निर्जन अशा वेस्टपोर्ट स्टेशनवर उतरलो. पश्चिमेला असलेल्या ॲडिरॉन्डॅक पर्वतातील हिरवाई कमी होऊन पानं शुष्क व्हायला सुरुवात झाली होती. उन्हाळा घालविण्यासाठी आलेली न्यूयॉर्क आणि बॉस्टनमधील मंडळी चेम्प्लेन सरोवराच्या काठी असलेली

३ री आवृत्ती

# शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?

**डॉ. जयसिंगराव पवार**




**किंमत : १२०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

या ग्रंथात-
आजच्या आपल्या धर्मनिरपेक्ष लोकशाही राज्यात शिवचरित्र आम्हास कसे मार्गदर्शक होऊ शकते? शिवछत्रपतींच्या 'स्वराज्याचा' खरा अर्थ कोणता? शिवराज्याभिषेकाचा अन्वयार्थ काय? ऐतिहासिक ललित साहित्यिकांपासून इतिहासकारांची कोणती अपेक्षा आहे?
इत्यादी प्रश्नांचा ऊहापोह महाराष्ट्रातील ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार करत आहेत.
याशिवाय शिवछत्रपतींचे आरमार, त्यांचे मुंबईकर इंग्रजांशी असलेले संबंध, सरसेनापती हंबीरराव मोहिते, शिवछत्रपतींवरील खुनी हल्ला इत्यादी विषयांवरील माहितीपूर्ण लेख.

आपली घरं बंद करून शहरात परतली होती. आम्ही सरोवराच्या किनाऱ्यालगतच्या वनराईजवळून उत्तरेच्या रस्त्यानं सायकली हाणत निघालो. सर्वसाधारण दिसणारी कामगारांची कुरणातील घरं, साधी उन्हाळी घरं आणि श्रीमंत वतनवाड्या आम्ही मागे टाकल्या.

लार्स हे मॅनहॅटनला वकील म्हणून व्यवसाय करत होते. त्यांनी आठ वर्षांपूर्वी पाचशे एकर शेतजमीन आर्थिक गुंतवणूक म्हणून खरेदी केली होती. त्यांना ती शेतजमीन आवडली होती, कारण त्यामुळे आपल्या आजोबांच्या नॉर्वेमधील शेतावर उन्हाळ्यात घालविलेल्या दिवसांची आठवण होऊन त्यांच्यातील लहानपण जागं व्हायचं, असं त्यांनी सांगितलं होतं. ते मालक झाल्यापासून त्यांच्या गैरहजेरीत एक माणूस त्यांच्या शेताची देखभाल करायचा. त्यांना वाटलं होतं त्याप्रमाणे ते वारंवार काही शेताकडं येऊ शकत नव्हते. आम्ही त्यांना भेटलो तेव्हा ते शेत विकायचा विचार करत होते. परंतु तिथं सर्वसाधारणपणे आम्ही काय करू शकू याबद्दलचे विचार ऐकल्यावर त्यांना त्यात रस वाटू लागला. म्हणून आम्हाला जमीन आवडली तर शेतघर, कोठारं, जमीन, शेतीची साधनं या सर्वांसकट एक वर्षापुरतं मोफत लीज द्यायचं त्यांनी ठरवलं.

लार्सनी दिलेल्या नकाशाप्रमाणे आम्ही चिमुकल्या एसेक्स गावातून सायकली चालवत पुढं निघालो. इतिहासाच्या पुस्तकातून बाहेर पडल्यासारखी वाटणारी १८५० मधली घरं, अपरिचित दिसणाऱ्या फेरीबोटीच्या गोदी, लायब्ररीची दगडी इमारत, मेनस्ट्रीटवरची या ऋतुपुरती बंद झालेली एक लहानशी दुकानांची रांग आम्ही मागं टाकली. हे शेत अग्निशामक दलाच्या इमारतीच्या पुढं, गावाच्या पश्चिमेला होतं. अस्ताव्यस्त वाढलेली शेतं आणि दुरुस्तीला आलेला काटेरी तारेच्या कुंपणांचा पट्टा हे संधिप्रकाशात झालेलं शेताचं पहिलं दर्शन होतं. काही माणसं तिथं भराभर गवत कापत होती आणि दोन ट्रॅक्टर्स अंधारात पळत होते.

दोन दगडी कमानींमधून शेताच्या आत जाणारी धुळीची वाट आम्हाला दिसली. उजव्या कमानीच्या आधारानं एक पुसट झालेली खुणेची हिरवी पाटी होती. त्यावर 'एसेक्स फार्म' असं लिहिलं होतं. आतल्या वाटेवर दोन्ही बाजूंना मेपलच्या झाडांची रोपटी लावलेली होती. त्यांची पानं तांबडी झालेली होती. गवत काळजीपूर्वक कापलं होतं. सालासारखा पांढरा रंग असलेलं

आणि सेज वनस्पतीसारखं हिरवट छप्पर असलेलं शेतघर मात्र पाव मैल आत होतं. त्याची पुढची खिडकी मोडली होती. त्यामुळं ते एका डोळ्यानं आंधळं असल्यासारखं दिसत होतं. आम्ही त्या घरासमोर त्याचा थोडा अंदाज येण्यासाठी थांबलो. आणि अचानक एक सशक्त, तगडा खच्ची केलेला, काळा बुल जातीचा शिकारी कुत्रा गॅरेजमधून सणाणत बाहेर आला. त्याच्यामागं दोन पांढरे मिश्रजातीचे धनगरी कुत्रेही आले. मागे बांधलेल्या साखळीमुळे तो बुल उलटा खेचला गेला आणि त्याचे मोठे वृषण स्पष्ट दिसले. ते पांढरे कुत्रे तेवढे हिंस्र नव्हते. त्यामुळं दबकत घाबरत ते आमच्या पायात घोटाळू लागले. घराच्या वरच्या उघड्या खिडकीतून टिव्हीवरचा फूटबॉलचा मोठमोठ्यानं आरडाओरडा आम्हाला ऐकू आला. आम्ही दार वाजवलं तरी कोणी उत्तर दिलं नाही. आम्ही आतपर्यंत गेलेल्या लांबलचक वाटेनं तसेच पुढं गेलो. वाटेच्या दोन्ही कडेला पडक्या इमारती होत्या. वाटेपासून थोड्या अंतरावर, ब्रेडची जुनी प्लॅस्टिकची खोकी भरलेली, धुळीनं माखलेली एक स्कूलबस पडलेली होती.

आम्ही सायकलवरूनच धान्याच्या कोठारात शिरलो. कोठाराच्या जमिनीवर पूर्वीच्या जुन्या धान्याचा दोन इंची जाड थर होता. आम्ही दार उघडताच आत प्रकाश पडला आणि उंदरांची फौजच्या फौज बाहेर पडण्यासाठी धडपडू लागली. आम्ही सायकली तिथंच ठेवून सरोवराच्या दिशेनं पूर्वेकडं चालत गेलो. थोड्याशा उंचवट्यावर आल्यावर समोर संगमरवरी दगडांचं नक्षीकाम केल्यासारखी मोकळी शेतं आणि फरसारखे दिसणारे स्प्रूसचे, टोकदार फांद्या असलेले दलदलीत वाढणारे भक्कम लाकडाचे, कडू फळांचे, ओकचे, पिवळ्या सुगंधी फुलांचे शोभिवंत लिंडेन आणि इमारतीसाठी उपयुक्त लाकडाचे लाल मेपलचे असे अनेक सरळ रांगेत लावलेले वृक्ष जोपासलेले दिसले. समोरची जमीन सपाट होती. तरी काही खोलगट भागात दलदल होती. आम्ही आमचा तंबू हिरव्या झाडीत टाकला. ती पांढरी कुत्री आमच्या मागोमाग येऊन आमचं लक्ष वेधण्यासाठी घोटाळत होती. आम्ही तंबू ठोकेपर्यंत जवळजवळ अंधार झाला होता. आम्ही सायकली ठेवल्या होत्या तिथपर्यंत परत आलो आणि पुन्हा एसेक्स गावापर्यंत येऊन आमच्या प्रवासाचा शेवटचा टप्पा पूर्ण केला. नुकताच मी आशियाचा दौरा केल्यानं जेटलॅग अजून गेला नव्हता आणि मी मरणाची

दमले होते. मला झोपेपेक्षा अन्नाची जास्त जरुरी वाटत होती. काही कारणामुळं आम्ही अन्नपदार्थ बरोबर घेऊ शकलो नव्हतो. माझं डोकं ताळ्यावर ठेवण्यासाठी शरीरातील साखरेची आवश्यक पातळी खालीखाली उतरत होती. मला इतकी भूक लागली होती की मी जाम चिडले होते. टाउन हॉलच्या बाहेरील बाकावर मी बसून राहिले आणि मार्क जेवण मिळण्याची कुठं शक्यता आहे का हे बघायला गेला होता. तो परत येऊन खाली बसला आणि वाईट बातमी सांगण्याआधी त्यानं आपल्या हाताचा विळखा सावधपणे माझ्याभोवती टाकला. तिथं खाणं मिळण्याची एकमेव जागा होती, ती म्हणजे एक खानावळ. तिथं रिकामी टेबलं दिसत होती तरी ते मात्र आम्हाला घेत नव्हते. कारण आम्ही आरक्षण केलं नव्हतं. तिथं दुकानं नव्हती आणि जवळचं तालुक्याचं गाव पाच मैल दूर उंच टेकडीवर होतं. आतापावेतो खूपच अंधार झाला होता आणि काहीतरी खाल्ल्याशिवाय जवळच्या गावात सोडाच, पण शेतापर्यंत जाणंसुद्धा मला शक्य नव्हतं. जिथं तुम्ही भुकेनं खरोखर मरू शकता अशा या लहान नीरस जागेच्या अपरिचित कानाकोपऱ्याचा मला तिटकारा वाटू लागला आणि मी चिडले. त्या क्षणी त्या शेतजमिनीचासुद्धा मला तिरस्कार वाटू लागला. तिथं केरकचऱ्याचे ढीग होते, दलदल होती आणि उन्हाळ्यात तर बहुधा डासांनी तुम्हाला फाडून खाल्लं असतं. त्या बाकावरच मी झोपले तर पोलीस पकडतील की नाही, अटक होईल की नाही या शक्यतेचा मी विचार केला आणि ठरवलं की मला पकडलं तर हवंच आहे. त्यांना मला गाडीत घालून तुरुंगापर्यंत न्यायला लागलं असतं आणि खायलाही द्यायला लागलं असतं. शेंगदाण्याचं लोणी लावलेलं सँडविच सारखं काहीतरी मिळणं हे सुद्धा मला पूर्णपणे मान्य होतं. त्या गावातल्या भकास रिकाम्या रस्त्यावर एकमेव ट्रॅफिक लाइट अविरतपणे उघडझाप करत होता.

आमच्या बाकासमोर पार्किंगच्या जागेत येणाऱ्या गाडीच्या दोन हेडलाइटच्या प्रकाशात आम्ही दुर्दशेच्या मूकनाट्यातील प्रसंगाप्रमाणे स्तब्ध बसलो होतो. एक रुपेरी केसांचा माणूस हातात अन्न शिजवायचं, झाकण असलेलं काचेचं पातेलं घेऊन गाडीतून बाहेर आला. तो आमच्याकडं बघून अगदी मोकळं हसला. आमच्या सायकली त्यानं पाहिल्या, आम्ही कुठून आलो, कुठं जाणार असं त्यानं विचारलं. आम्ही पोकेप्सीहून आलो असून

एसेक्स फार्मवर आम्ही राहणार असल्याचं मार्कनं त्याला सांगितलं.

"बरं," त्यानं विचारलं, "तुम्हाला भूक लागलीये का?"

त्या माझ्या अगतिक परिस्थितीत सुद्धा 'नको, आभार' असं माझ्या जिभेच्या टोकावर आलेलं मला जाणवलं. खरी कळकळ नसलेल्या दयाळूपणाचा देखावा कोणी केला तर त्याबाबत अविश्वास दाखविण्याची ही शहरी सवय. पण मार्कनं आमच्यावतीनं केव्हाच निमंत्रण स्वीकारलं होतं. त्या माणसानं आम्हाला रस्ता ओलांडून एका मोठ्या दगडी बांधणीच्या चर्चच्या तळघरात नेलं. त्यानं दार उघडल्याबरोबर तिथल्या पिकलेल्या केसांच्या समुद्रातून चांदीच्या भांड्यांचा किणकिणता आवाज, गप्पा आणि हशाचा आवाज वर उसळला.

आम्ही वेगवेगळ्या वयाच्या वृद्धांच्या गर्दीत आदळत, आपटत जात आहोत असं आम्हाला वाटलं. पण मी पर्वा केली नाही. कारण भिंतीजवळील लांबलचक टेबलं अन्नपदार्थांनी खचाखच भरलेली मला दिसली. हॅमचे काप, भाजलेला घेवडा, कुस्करलेला बटाटा, फळांनी सजवून वर रंगीत क्रीमचा गोळा ठेवलेल्या चमकदार रंगाच्या जेली- कोशिंबिरी असं सर्व प्लेट्समध्ये भरलेलं होतं. ज्या माणसानं आम्हाला तिथं आणलं त्यानं सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आणि पन्नास सुरकुतलेले चेहरे आमच्या दिशेला वळले. त्यानं आमची ओळख 'सायकलीवरून लांबची सफर करणारे प्रवासी' अशी करून दिली आणि 'ते आपल्याबरोबर जेवण घेतील' असं म्हटलं. त्याबरोबर खोलीत टाळ्यांचा मोठा गजर झाला. नंतर एकच गोष्ट मला आठवते ती म्हणजे कोणीतरी माझ्या कोपराला धरून गर्दीतून वाट काढत जीवनसत्त्वानं भरलेल्या टेबलांकडे नेलं, माझ्या हातात थाळी दिली आणि माझ्या ग्लासमध्ये बर्फ घातलेला चहा ओतला. क्षणभर मला वाटलं की मी स्वप्न पाहत आहे की काय किंवा एखादं क्रूर असं मृगजळ भासतंय की काय. पण मी आता बसून खात होते, ते जेवण आज्या शिजवतात तसं होतं. म्हणजे एखाद्या खड्डे खणणाऱ्या किंवा शेतात मदत करणाऱ्या माणसाचं पोट नीट भरावं अशा पद्धतीचं होतं. मी बिस्किटं आणि रस्सा, हिरवा वर्ख लावलेला बदाम घातलेला घेवडा, कोंबडीच्या पायाचे तळलेले तुकडे खाल्ले. तिथं उभट भांड्यात गरमागरम कॉफी होती आणि एक संपूर्ण टेबल जेवणानंतर खायच्या गोड पदार्थांनी भरलेलं होतं. आजूबाजूला दृष्टीच्या टप्प्यात बघणं

थांबवून मी जेव्हा बोलू शकले तेव्हा मला कळलं की एसेक्स मेथॉडिस्ट चर्चच्या शतकोत्सव समारंभात आम्ही कडमडलो होतो. मला असंही कळलं की एसेक्स गावात तरुण कुटुंबं फारशी नव्हती. जी होती ती सर्व बिशपनी चालविलेल्या या चर्चची सदस्य होती. त्या तळघरातील प्रत्येक जण दुसऱ्याला अगदी जवळून ओळखत होता आणि बरेच जण एकमेकांचे नातेवाईक होते. त्या रात्री भेटलेले पुष्कळ जण आमच्या आयुष्यात महत्त्वाचे ठरणार होते. ज्या माणसाला आम्ही बाकावर सापडलो होतो तो होता वेन बेले. थोड्या वर्षांनी त्याची बायको डोन्ना माझ्या लहानशा मुलीकरता पांढरी लेस लावलेला गुलाबी स्वेटर आणि त्याला मॅचिंग छोटी टोपी सुद्धा विणणार होती. जिच्या शेजारी आम्ही बसलो होतो ती सुरकुत्या पडलेली लहानशी स्त्री होती, पर्ल केली! तिनं आम्हाला सांगितलं की ती नव्वद वर्षांची होईपर्यंत तिला सायकलवरनं भटकायला आवडायचं. त्यानंतर तिला सायकलच्या बारवर पाय टाकणं शक्य होईना. मग ती फक्त सरोवरापर्यंत सायकल चालवत नेऊन फेरी बोटीतून पलीकडं जाऊन सफर करून यायची. तीन वर्षांनंतर एकदा मी गाईचं दूध काढत होते तेव्हा तिची सून कोठारापर्यंत येऊन सांगू लागली की, पर्ल देवाघरी गेली होती. आमच्या रस्त्याजवळच असलेलं शेत तिनं संपूर्ण आयुष्यभर कसलं होतं. रंगाच्या कपच्या उडालेला, भाजी विक्रीसाठी उभारलेला तिचा स्टँड खांबाची टोकं दाखवत अजून तिथं भारदस्तपणे उभा आहे.

त्या रात्री सर्व दृष्टीनं तृप्त आणि उत्साही होऊन आम्ही शेतावर परत गेलो. आमच्याबरोबर रुमालात गुंडाळलेले केकचे तुकडे होते. मला अशा प्रकारच्या सार्वजनिक करुणेची अजिबात सवय नव्हती. अशा प्रकारचे लोकसमूह अजून कुठं अस्तित्वात असू शकतील, विशेषतः तंत्रज्ञान, संपर्काची सोय आणि काम या सर्वच बाबतीत वेगळ्या पडलेल्या प्रदेशात असतील असं मला कधी वाटलं नव्हतं. या ठिकाणी शेजारी एकमेकांची काळजी घेत होते. स्वास्थ्य असणं हे सार्वजनिक ध्येय होतं. मला इथं एक प्रकारची हेलावून टाकणारी सुरक्षितता वाटली. मी पहिल्यांदा मार्कनं कसलेली, अन्नधान्यानं समृद्ध शेतं पाहिली त्यावेळी मला अशीच जाणीव झाली होती. चैतन्ययुक्त आणि कोणताही उपरोध नसलेला असा तो भाव होता आणि तरी खूण म्हणून शिल्लक राहिलेल्या माझ्यातल्या स्वत्वानं त्या

विरुद्ध बंड केलं होतं आणि नंतर शरणही गेलं होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी थंडी आणि झिमझिम पाऊस पडत असताना लोखंडाच्या कोठारात मिळालेलं एक फावडं घेऊन आम्ही निघालो. केवळ तीनशे स्क्वेअर फुटाच्या अपार्टमेंटमध्ये राहण्याची सवय असणाऱ्या, रस्त्याच्या रुंदीइतकी दृष्टीची मर्यादा असणाऱ्या, स्वतंत्र सोयींनी युक्त अशा खोल्यांचा ब्लॉक हे जिचं एकमेव मोठं परिमाण आहे अशा व्यक्तीला पाचशे एकर जमीन ही निश्चितपणे प्रचंड मोठी वाटेल. ते शेत नसून एखाद्या सरंजामशहाकडून कुळाला मिळालेल्या जमिनीप्रमाणे वाटेल किंवा एखादा स्वतंत्र प्रांत वाटेल. लार्सच्या नकाशात ही शेतजमीन म्हणजे चारी बाजूला मैलभर अंतरावर रस्ते असलेला नुसता एक चौकोन होता. काही लहानमोठे जमिनीचे तुकडे गेल्या काही वर्षांत विकले गेल्यानं त्या ठिकाणी चौकोनाचे काही तुकडे कापून वेगळे दाखविले होते.

आम्ही चालत जाताना मला अगदी उदास वाटू लागलं. त्यासाठी मी हवेला दोष देत होते आणि मी अजून कॉफीही घेतली नव्हती. परंतु सत्य हे होतं की फार मोठ्या अपेक्षा ठेवल्या होत्या आणि सकाळच्या झिरझिरीत प्रकाशात दिसणारं शेत अगदी अपेक्षाभंग करणारं होतं. मी कल्पना केली होती त्याच्याशी हे शेत अजिबात जुळणारं नव्हतं. मला वाटलं होतं की थोडं उंचावर वसलेलं, शेतांचे तुकडे विखुरलेलं आणि सुस्थितीतल्या इमारतींचं ते काहीतरी असेल. ते इतकं प्रचंड आणि इतकं दूर असेल असंही वाटलं नव्हतं. निदान ते दलदलीचं नसेल असं वाटलं होतं.

आमच्या पावलांचे ठसे ओल्या मातीत उठवत आम्ही प्रथम उत्तरेकडे पायी निघालो. एका डळमळीत कुंपणावर चढलो, खुरटी लागवड ओलांडली आणि गुरांसाठी उपयुक्त चारा वाढविण्यासाठी राखलेलं पन्नास एकर शेत आम्हाला दिसलं. गवत आदल्याच दिवशी कापलेलं होतं. माझ्या बुटांच्या तळव्यातून कापणीनंतर राहिलेले गवताचे जाडेभरडे खुंट टोचल्याचं जाणवत होतं. मार्कनं फावडं जमिनीत मारलं. गवताळ जमिनीच्या खाली अगदी चिकणमाती होती. हे चांगलं नाही एवढं मला कळत होतं. त्यामुळं पावसाच्या दिवसात मुळं पाण्यात बुडाली असती आणि उन्हाळ्यात तिला तडे जाऊन ती जवळजवळ काँक्रिटसारखी घट्ट झाली असती. अशी कठीण माती मशीनच्या वजनानं घट्ट होते आणि आतील ऑक्सिजन बाहेर टाकते. मार्कलाही माझ्या

इतकंच उदास वाटू लागलं.

आम्ही दोन मुख्य कोठारांकडं परत आलो. धान्य व गवत ठेवण्यासाठी गुहेच्या आकाराची, लाल रंगाचं बांधकाम असलेली ती कोठारं होती. पूर्वेकडच्या कोठाराचं छत अगदी खाली होतं. त्याच्या आडव्या तुळयांना डोकं आपटू नये म्हणून मार्कला चटकन वाकावं लागलं. पश्चिमेकडचं कोठार अधिक हवेशीर व मोठं होतं. त्याचे जड खांब कुऱ्हाडीनं कापलेले होते. दोन्ही कोठारं दुग्धजन्य व्यवसाय करण्यासाठी अगदी योग्य होती. पश्चिमेकडचं कोठार दूध काढण्यासाठी तर पूर्वेकडचं वासरं आणि लहान वयाच्या, न व्यालेल्या कालवडींचे दावे बांधण्यासाठी खुंट असलेलं. कित्येक दशकं तिथं जनावरं नव्हती. परंतु दूध काढण्याच्या कोठारात दुग्धव्यवसायाच्या नोंदी असलेला एक खोका अजून तिथं होता. फार काळापूर्वी मृत पावलेल्या गाईंची नावं कार्डांच्या सुरुवातीला मोठ्या अक्षरात लिहून त्यांचा एक गठ्ठा त्यात ठेवला होता. त्या कोठारात ठेवलेल्या धुळीनं माखलेल्या गवताच्या गंज्या तुडवत जात असताना आम्हाला रिकाम्या बीअरच्या बाटल्यांचा साठा आणि फाटकी विटलेली कूल सिगरेटची जुनी पाकिटं सापडली. बांधकामावरचं छप्पर दोन्ही बाजूंना व्यवस्थित घट्ट बसविलेलं होतं. परंतु पश्चिमेच्या कोठाराला जोडलेली सिमेंट ठोकळ्यांनी बांधलेली आणखी एक मोठी खोली होती. तिचं पत्र्याचं छप्पर वाऱ्याबरोबर सारखं आपटत होतं. कित्येक ठिकाणी पावसाचं पाणी गळत होतं. त्यामुळं झऱ्यांची एक लहानशी मालिकाच तयार झाली होती.

आणखी एक डुगडुगतं कुंपण ओलांडल्यावर आम्ही एका विचित्र वाटणाऱ्या जंगलात आलो. तिथं प्लॅस्टिकच्या कुंड्यात लावलेली, वाढखुरटलेली स्प्रूस जातीच्या झाडांच्या शेकडो रांगा दिसत होत्या. डेअरी बंद झाल्यावर त्या शेतजमिनीत रोपवाटिका होती. गेली वीस वर्षं ती झाडं तशीच वाढत होती. मुख्य मुळं कुंड्यांच्या तळातून जमिनीत घुसून झाडं कशीबशी जगली होती. मागच्या बाजूला पडझड झालेलं हरितगृहसुद्धा होतं. त्यात रोपवाटिकेत वाढलेली फरची झाडं होती. मोडतोड झालेल्या, आग लागू नये म्हणून ट्रिटमेंट दिलेल्या लाकडातून आणि कुजलेल्या प्लायवूडमधून हिरवीगार झुडपं वाढलेली होती. ती सगळी जमीन काही भयानक घडामोडींचा अनुभव देत होती. जणू काही झाडांची शक्ती मानवी

प्रयत्नांना चारी बाजूंनी शांतपणे, सावकाश दुर्बल करत होती.

शेताच्या पश्चिमेकडील सपाट जमीन अचानक उंच होऊन पन्नास एकर वनराईनं व्यापलेली होती. आम्हाला झाडातून जाणारी वाट सापडली. त्यातील बरीचशी झाडं साखर तयार करतात त्या मेपलची असून बरीचशी निरोगी आणि मोठी होती हे मार्कच्या लक्षात आलं. तो त्या झाडावरच्या रसासाठी मारलेल्या खोडांवरच्या खाचांच्या खुणा शोधायला लागला. त्याला त्या मिळाल्यावर आम्ही शेतवाडीतील साखरी मेपलच्या राईतून जातोय हे समजलं. परत खाली येताना आम्ही साखरेचं गुऱ्हाळ ओलांडलं. त्याच्या तिन्ही बाजूंच्या भिंती ढासळल्या होत्या. कोणीतरी त्याचा वापर गाईचा गोठा म्हणून केल्यानं त्यात जुनं शेण भरलं होतं. साखर तयार करताना बाष्पीभवनासाठी वापरायच्या यंत्रावर छपरातून पाणी गळल्यानं ते गंजून अगदी भंगार झालं होतं.

आम्ही दक्षिणेकडची शेतं शेवटी पाहिली. ही शेतं भरपूर रहदारीच्या रस्त्याला लागून होती. त्यातील अर्धी जमीन उंचावर असून त्यात फर, पिन ओक, लिंडेन असे वृक्ष एका रांगेत जवळजवळ लावून जोपासले होते. मार्कनं पुन्हा फावडं मातीत मारलं आणि वर उचकटलं. नुकत्याच मारलेल्या खाचेत त्यानं हात घातला. फावडं कुठल्याही खडकावर आपटलं नव्हतं. मातीचा रंग कॉफीसारखा होता आणि आम्ही अगोदर खणलेल्या मातीसारखा तिचा पोत नव्हता. त्यानं ती आपल्या हातात घट्ट दाबली, अंगठ्यानं हळुवार स्पर्श केला, तिचा वास घेतला आणि शेवटी जीभ बाहेर काढून तिची चव बघितली. ती प्रवाहानं वाहून आणलेली गाळाची सुपीक जमीन होती. शेतकऱ्याला आनंदानं रडू येईल इतकी ही माती चांगली आणि समृद्ध होती. शेताच्या दक्षिणेकडच्या कुंपणाला लागून जवळजवळ पाव मैल लांबीपर्यंत ही अशीच माती होती. त्यानंतर पुन्हा चिकणमाती सुरू होत होती.

मार्क ज्या खात्रीनं आणि वेगानं माझ्या प्रेमात पडला त्याच खात्रीनं आणि वेगानं त्याच क्षणी त्या जमिनीच्या प्रेमात पडला. त्यानंतर हे आमचं घर असेल की नाही असा त्याच्या मनात कधीही प्रश्न उद्भवला नाही. आता मला कल्पना करणं कठीण असलं तरी त्यानं त्याविषयी माझ्याशी बोलणं नक्कीच अपेक्षित होतं. एकटेपणा किंवा ती चिकणमाती यांचा मला त्रास होत नव्हता.

"या शेताला आत्माच नाही असं वाटतं." आम्ही घरी जाण्यासाठी रेल्वेत बसलो तेव्हा अखेर मी त्याला म्हटलं.

त्यावर तो म्हणाला, "कारण ते उपयोगात आणलेलं नाहीये." होय-नाही म्हणायला वेळच नव्हता. पानगळीचा ऋतु संपत आला होता. येत्या वसंतऋतुत आम्हाला जर काही पिकवायचं असेल तर हिवाळाभर आम्ही योजना करणं आणि त्याप्रमाणं तयारी करणं आवश्यक होतं. मी आमच्या दुसऱ्या शक्यतेचा विचार केला - आणखी एक वर्ष न्यू पॉल्टझला राहून जमिनीचा शोध घेणं - त्यापेक्षा मी सरळ पुढं जाण्याचा विचार केला.

❖


## टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील. या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹१०० भरून उपलब्ध असलेल्या कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज ₹ १३५० राहील किंवा आठ पुस्तकांसाठी पोस्टेज ₹ १२५.

इतर कोणत्याही पुस्तकांवर २०टक्के सवलत मिळवा.

३ री आवृत्ती

# राजर्षी शाहू छत्रपती
## एक मागोवा




**डॉ. जयसिंगराव पवार**

**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

महाराष्ट्राच्या इतिहासावर अधिकार असलेले एक ज्येष्ठ इतिहाससंशोधक म्हणून डॉ. जयसिंगराव पवार यांची ख्याती आहे. मराठ्यांच्या इतिहासातील छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई या त्रयीची कारकीर्द व आधुनिक महाराष्ट्रातील म. फुले, राजर्षी शाहू व डॉ. आंबेडकर या त्रयीची कामगिरी हे त्यांचे खास संशोधनाचे विषय आहेत. गेली चार दशके डॉ. पवार यांनी इतिहाससंशोधन व लेखन या कार्यास स्वतःला वाहून घेतले असून, त्यांचे आजवर तीसहून अधिक इतिहासविषयक ग्रंथ, चाळीसहून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांनी संपादित केलेला 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ' हा त्रिखंडात्मक ग्रंथराज म्हणजे परिवर्तनशील महाराष्ट्राला त्यांनी अर्पण केलेला नजराणाच आहे. डॉ. पवार यांनी कोल्हापुरात स्थापन केलेली 'महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी' ही द. महाराष्ट्रातील अग्रेसर इतिहास संस्था असून, तिच्या माध्यमातून त्यांचे इतिहाससंशोधन व समाजप्रबोधन हे कार्य सातत्याने चालू असते. त्यातून सामान्यांतही इतिहासाची जाण व रुची निर्माण करण्यात ते यशस्वी झाले आहेत. प्रस्तुतचा ग्रंथ म्हणजे शाहू महाराजांसारख्या थोर समाजउद्धारकाच्या चरित्रास नवा आयाम देणाऱ्या लेखांचा संग्रह आहे.

# असेन मी नसेन मी, तरी असेल गीत हे...

स्त्री-मन टिपणाऱ्या शान्ताबाईंच्या काही भावगीतांचा आस्वाद आपण मागच्या भागात घेतला. या वेळच्या भागातून शान्ताबाईंच्या भावगीतांतून डोकावणाऱ्या विविध भावछटा आपण टिपणार आहोत. या भावछटा टिपताना शान्ताबाईंचं एक पाऊसगीत मनात रिमझिमायला लागलं. पुष्पा पागधरे यांच्या मधाळ आवाजतल्या या गीताचे शब्द आहेत-

*आला पाऊस मातीच्या वासात ग*
*मोती गुंफीत मोकळ्या केसात ग*
*आभाळात आले काळे काळे ढग*
*धारा कोसळल्या निवे तगमग*
*धुंद दरवळ धरणीच्या श्वासात ग*

या गीताचे हे शब्द एक उत्फुल्ल अनुभव देऊन जातात. पावसाचं आणि निसर्गाचं एक मनोरम शब्दचित्र रेखाटून जातात आणि मातीचा सुवास मनात दरवळायला लागतो. पावसाच्या आगमनाने भावविभोर झालेल्या मनाचं दर्शन या गीतातून होतं.

माणसाचं मन सुखातही भावविभोर होतं आणि दु:खातही भावविभोर होतं. प्रेमिकांना एकमेकांच्या सहवासात आनंद मिळत असतो; पण काही गोष्टी अशा घडतात, की एकमेकांच्या समीप असूनही पूर्वीसारखा आनंद त्यांना लाभत नाही आणि मग तो म्हणतो-

*त्या पहिल्या प्रीतीच्या आज लोपल्या खुणा*

*वाळल्या फुलांत व्यर्थ गंध शोधतो पुन्हा*
*गीत ये न ते जुळून भंगल्या सुरातूनी*

शान्ताबाईंच्या अर्थगर्भ, भावगर्भ शब्दकळेचं दर्शन घडविणारं हे गीत आहे. प्रेमभावनेतील रितेपणाची उदास करणारी भावना या गीतातून परिणामकारकतेने अधोरेखित होते आणि बाबूजींच्या भावपूर्ण स्वरातून हे रितेपण अंत:करणाला जाऊन भिडतं.

असंच रितेपण शान्ताबाईंच्या आणखी एका गीतातून व्यक्त झालंय. माणिक वर्मा यांनी गायलेल्या गीताचे शब्द आहेत-

*चांदण्या रात्रीतले ते स्वप्न तू विसरून जा*
*मी कधी होते तुझी ते सर्व तू विसरून जा*
*प्रीतीचे हितगूज ते, कुजबुज ती, रुसवेही ते*
*ते हसू अन् आसवे ती आज तू विसरून जा*

प्रेम म्हणजे चांदण्या रात्रीतलं स्वप्न. ते स्वप्न विसरून जायला ती त्याला सांगते. प्रीतीचं हितगूज, कुजबुज, रुसवे, भेटीतील आनंदाचे क्षण आणि प्रेमात ढाळलेली आसवे...सगळं काही विसरून जा. प्रेमातील पूर्वीची उत्कटता आणि आता मनात दाटलेली निराशा याचं विरोधाभासी भावात्म चित्र शान्ताबाईंनी या गीतातून रेखाटलं आहे.

जरी तिने त्याला सगळं विसरायला सांगितलं तरी त्याच्यापासून दूर राहताना तिचं मन विकल होतं आणि ती म्हणते-

*तू नसता मजसंगे वाट ही उन्हाची*
*संगतीस एकाकी वेदना मनाची*
*क्षण यावे जवळ जरा, फिरून दूर जावे*
*अर्ध्यावर तुटून सूर, गीत ओघळावे*
*देव म्हणू, दैव म्हणू, योजना कुणाची*

तो बरोबर नसताना फक्त वेदना तिची सोबत करते. क्षणभरच आपण जवळ येतो, परत दूर जातो. सूर अर्ध्यावर तुटून गीत ओघळतं. देवाने, दैवाने किंवा कुठल्या तरी अज्ञात शक्तीने केलेली ही ताटातुटीची योजना समजावी का? या गीतातील विरहार्त भाव मनाला विषण्ण करून जातो.

खरं तर परस्परांपासून दूर होण्याची कारणं केवळ नकारात्मक असतात, असं नाही, तर काही वेळेला ती उदात्तही असतात. प्रेमापेक्षाही उदात्त अशी काही कर्तव्यं असतात आणि त्यासाठी त्यांना परस्परांपासून दूर व्हावं लागतं; पण तिच्या मनाला हा प्रश्न सतावत असतोच, की फक्त मीच का उदात्त व्हायचं? त्यावर तिची समजूत घालताना तो म्हणतो-

*दूर कुठे चंदनाचे बन जळते*
*तुला कळते ग मला कळते*
*तुला-मला चंदनाचा जन्म लाभला*
*अशा चंदनपणाला जीव लोभला*
*उगाळता, जळताही दरवळते*

तुला-मला चंदनाचा जन्म लाभला, हे आपलं भाग्य आहे. तुझ्या-माझ्या चंदनीपणाने आपल्याला जवळ आणलं; पण उगाळल्यावर आणि जाळल्यावरही चंदन दरवळतं, त्याप्रमाणे कर्तव्यासाठी आपणही चंदनासारखं जळलं पाहिजे. त्यासाठी मोहाचा त्याग आपण केला पाहिजे.


तर असा त्याग करायला लागतो; पण माणसाचं मन ओढाळ असतं; ते मोहमय होऊ पाहतं आणि मग आपल्या इच्छांची पूर्ती ते स्वप्नात करू पाहतं. मग ते मन म्हणतं-

*ही वाट दूर जाते स्वप्नामधील गावा*
*माझ्या मनातला का तेथे असेल रावा*
*स्वप्नामधील गावा स्वप्नामधून जावे*
*स्वप्नातल्या प्रियाला मनमुक्त गीत गावे*
*स्वप्नातल्या सुखाचा स्वप्नीच वेध घ्यावा*

स्वप्नातल्या या गावात माझ्या मनातला रावा मला भेटेल, म्हणजे माझ्या प्रेमातुर मनाच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतील आणि स्वप्नात तरी मला सुख लाभेल.

पण स्वप्नरंजनात माणूस किती वेळ रमणार? सुख-दुःखाचं गाठोडं घेऊन चालताना जीवनात असा एक क्षण येतो की जीवनाचं

**२ री आवृत्ती**




# राजर्षी शाहू
# कर्मवीर भाऊराव पाटील
आणि
# प्रबोधनकार ठाकरे

**डॉ. जयसिंगराव पवार**

**किंमत : ९०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

शाहू छत्रपती, प्रबोधनकार व कर्मवीर यांच्या परस्परांशी असणाऱ्या संबंधांचे स्वरूप प्रथम जाणून घ्यायला हवे. प्रबोधनकारांकडे बघण्याचा महाराजांचा दृष्टिकोन ब्राह्मणशाहीच्या विरोधात पुकारलेल्या लढाईतील आपला एक बिनीचा सहकारी हा होता. ते ब्राह्मणशाहीशी लढणारे एकांडे शिलेदार होते. त्यांना उत्तेजन देणे, पाठबळ देणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे, असे महाराजांना वाटत होते. त्यातूनच प्रबोधनकारांचे व महाराजांचे जे संबंध निर्माण झाले ते मित्रत्वाचे, प्रेमाचे व सहकार्याचे होते. बहुजनांचा उद्धारकर्ता, दीनदुबळ्यांचा तारणहार म्हणून महाराजांकडे प्रबोधनकार पाहत होते. असे असले तरी ते त्यांचे अनुयायी झालेले नव्हते.

कर्मवीर भाऊराव पाटलांची गोष्ट वेगळी होती. ते आपल्या वाटचालीत शाहू महाराज व प्रबोधनकार या दोघांनाही गुरू मानत होते. कर्मवीरांच्या शिक्षण प्रसाराच्या कार्यात मनापासून साथ देणारे प्रबोधनकार हे खरे म्हणजे, त्यांचे ज्येष्ठ स्नेही. एक हितचिंतक आणि मार्गदर्शक सहकारी; परंतु भाऊरावांनी त्यांना आपले 'गुरू' असे संबोधून आपल्या हृदयातील त्यांचे आदराचे स्थान स्पष्ट केले होते.

ओझं वाटायला लागतं म्हणा किंवा दु:ख सहन करायची ताकद कमी होते म्हणा, मग मन त्या परमेश्वराला साद घालतं आणि म्हणतं-

*जिवलगा, राहिले रे दूर घर माझे*
*पाऊल थकले, माथ्यावरचे जड झाले ओझे*
*निराधार मी, मी वनवासी*
*घेशील केव्हा मज हृदयाशी*
*तूच एकला नाथ अनाथा*
*महिमा तव गाजे*

आता थकलेल्या पावलांनी ही जीवनाची वाट चालणं कठीण झालंय, आता तूच या निराधार, वनवासी जीवाला हृदयाशी घे! तू एकटाच अनाथांचा नाथ आहेस. तुझा महिमा सदैव गाजत असतो. परमेश्वराला घातलेली अतिशय आर्त अशी ही साद अंत:करणाला जाऊन भिडते. हृदयनाथ मंगेशकरांचं संगीत, आशाबाईंचा स्वर, जिवलगा या शब्दापाशी त्यांनी घेतलेली आलापाची आवर्तनं या गीताला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवतात आणि त्या गीतातील आर्तता अत्युत्कटतेने अधोरेखित होते.

तर विविधरंगी भावनांचा आविष्कार असलेल्या अनेक भावगीतांची भेट शान्ताबाईंनी रसिकांना दिली. ६ जून २००२ या दिवशी शान्ताबाईंनी या जगाचा निरोप घेतला; पण प्रतिभावंत लौकिकार्थाने मरण पावले तरी त्यांच्या प्रतिभेचा सुगंध मृत्यूनंतरही दरवळत राहतो. अशाच अर्थाचं एक गीत शान्ताबाईंनी लिहिलं आहे. शब्द आहेत-

*असेन मी नसेन मी तरी असेल गीत हे*
*फुलाफुलांत येथल्या उद्या हसेल गीत हे*
*हवेत ऊन भोवती, सुवास धुंद दाटले*
*तसेच काहीसे मनी तुला बघून वाटले*
*तृणांत फूलपाखरू तसे बसेल गीत हे*

शान्ताबाईंचा स्वत:च्या प्रतिभेवरचा विश्वास या गीतातून व्यक्त झाला आहे. मी असेन, नसेन, पण माझी गीतं रसिकांच्या मनात सदैव

असतील. थोडंसं ऊन पडावं आणि भोवती धुंद सुगंध दाटावा, अशी काहीशी स्थिती या गीताच्या मनात उमलण्याने झाली आहे, असं त्या म्हणतात. तृणांत जसं फुलपाखरू बसतं तितक्या हळुवारपणे माझी गीतं रसिकांच्या मनात प्रवेश करतील, असं त्या म्हणातात. शान्ताबाईंच्या गीताच्या या ओळी अतिशय सार्थ आहेत. त्या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या गीतांचा सुगंध आजही रसिकांच्या मनात दरवळतो आहे आणि चिरंतन दरवळत राहणार आहे. पुढच्या भागात आपण शान्ताबाईंच्या बालगीतांचा आस्वाद घेणार आहोत.

**-अंजली पटवर्धन**



## आवाहन

पुस्तक वाचताना वाचक त्या पुस्तकाशी एकरूप झालेला असतो. काही वेळेला तर तुमच्या जीवनाला कलाटणी देण्याचं सामर्थ्य एखाद्या पुस्तकामध्ये असतं. आम्ही नेहमीच वाचकांना दर्जेदार पुस्तकं वाचण्याचा आनंद दिला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचं असंच एखादं तुम्हाला आवडलेलं, भावलेलं पुस्तक असेल तर त्या पुस्तकाबद्दलचा अभिप्राय आम्हाला साधारण ५०० ते ८००शब्दांत लिहून कळवा. अभिप्रायाबरोबर आपला संपूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर देण्यास विसरू नये. ते पुस्तक आपल्याला का आवडलं ते लिहायचं आहे. आपल्या अभिप्रायाचं स्वागत असेल. यासाठी मानधनही दिलं जाईल. अभिप्राय छापण्याबाबतचा अधिकार संपादकांच्या अधीन राहील. त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि अस्वीकृत अभिप्राय परत पाठवला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात दूरध्वनी-वरून कोणीही संपर्क साधू नये. आपला अभिप्राय आमच्या या ई-मेलवर mmgj@mehtapublishinghouse.com किंवा खालील पत्त्यावर पोस्टाने/कुरियरने पाठवावा.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०.**

## स्मरण

# व. पु. काळे



तुमच्या आमच्या मध्यमवर्गीय आयुष्य जगणाऱ्या माणसांच्या आयुष्यातील छोटी-मोठी दुःखे, निर्णय घ्यायला काहीसे कठीण वाटणारे कसोटीचे क्षण, अवघडलेले प्रसंग, मानअपमानांना जोजवत राहणारी मानसिक कोंडी, तसेच भावना आणि वासनांचे उद्रेक आपल्या प्रवाही संवादी भाषेत प्रकट करणारी प्रभावी कथा लिहिणारे व. पु. काळे आणि त्यांचे एकूणच कथाविश्व हा वाचकांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. जवळ जवळ पन्नास वर्षे 'वपु'च्या एकूणच कथाविश्वाने समृद्ध मराठी कथेला समर्थपणे फुलवत ठेवले. त्यांच्या अत्यंत प्रभावी कथाकथनाने मध्यमवर्गीयांच्या जाणिवा जिवंत केल्या. जेव्हा अभिजात मराठी कथाविश्वात, साध्यासुध्या भावविश्वात रमणाऱ्या वाचकाला काहीशी बुचकळ्यात टाकणारी नवकथा ऐन बहरात होती, ग्रामीण कथेने नव्याने मराठी साहित्य विश्वात प्रवेश केला होता, त्या १९५०-६०च्या दशकात नवकथेनंतरची नव्या कथाकारांची नवी पिढी उदयाला येत होती, त्यात व.पु.काळे यांची 'घरोघरी' ही कथा १९५५मध्ये 'प्रसाद' या मासिकात पहिल्यांदा प्रसिद्ध झाली, तेव्हा 'वपुं'नी तारुण्यात नुकताच प्रवेश केला होता. त्यानंतर 'वपुं'नी अखंडपणे केवळ कथालेखनच प्रामुख्याने केले ते अगदी शेवटच्या क्षणापर्यंत.

रोजच्या जीवनातल्या घटनांवर भाष्य करीत, माणसांवर आणि माणुसकीवर विलक्षण प्रेम करणारी 'वपुं'ची कथा सर्वदूर पोहोचली ती केवळ त्यांच्या अत्यंत प्रभावी अशा निवेदनात्मक शैलीमुळे.

जीवनानुभवी कथेचा हा अनभिषिक्त सम्राट आपले आयुष्य रसिकतेने आणि विलक्षण चोखंदळपणे जगला. आयुष्यभर प्रामाणिकपणे सत्याधिष्ठित अनुभवांना आपल्या कथेमधून गुंफत जीवननिष्ठा जपत जगला. त्यामुळे कदाचित असेल, परंतु 'वपुं'च्या एकूणच कथाविश्वाला सर्व थरांतल्या वाचकांनी आपलेसे केले होते. इतके की, आपण त्या कथेचा एक भाग होऊन जातो. आपल्या आवडीचा गायक आपण जसा वारंवार ऐकतो, नेमके तसेच 'वपुं'च्या कथेच्या बाबतीत घडते. शास्त्रीय संगीतात जसे भीमसेन जोशी, कुमार गंधर्व यांच्यासारखे श्रेष्ठ गायक, भावगीतांत जसे सुधीर फडके, अभिनयात जसे श्रीराम लागू तसेच कथाकथनात 'वपुं'चे स्थान अनन्य होते. अनेकांनी कथाकथनाचे यशस्वी प्रयोग केले; परंतु 'वपुं'ची कथनाची शैलीच विलक्षण अनोखी होती. कुठल्याही स्वरूपातल्या वर्णनाचा पसारा नसलेली, केवळ संवादी भाषेतून प्रकट होणारी 'वपु'कथा आणि कथनशैली हे त्यांचे वैशिष्ट्य होते. 'वपुं'च्या एकूणच कथांमधून जो संवादी स्वर उमटायचा, त्यामुळे 'वपुं'ची कथा वाचकांच्या ध्यासाचा विषय झाली.

अन्यायाच्या जाणिवेतून व.पु. काळे ह्यांनी 'घरोघरी' ही पहिली कथा लिहिली तेव्हा ते गजबजलेल्या चाळीत राहात होते. त्यांच्याच मजल्यावर समोरासमोर जी दोन बिऱ्हाडे राहात होती, त्यातल्या एका बिऱ्हाडातील बाई वचावचा बडबड करणारी होती आणि आपल्या वैयक्तिक दुःखाचा चार लोकांत शंख करणारी होती. तर दुसऱ्या बिऱ्हाडातील बाई तिच्या स्वभावाच्या विरुद्ध होती. म्हणजे ही दुसरी बाई विलक्षण शांत आणि समजूतदार स्वभावाची, सहनशील वृत्तीची होती. हा विरोधाभास 'वपुं'नी टिपला आणि 'घरोघरी' ही त्यांची पहिली कुटुंबकथा प्रकट झाली. 'वपुं'चे परम भाग्य असे की, ज्यांनी मराठी कथेला देवघरातले स्थान दिले त्या य.गो.जोशी ह्यांनीच 'वपुं'च्या कथेचे प्रथम संवर्धन करीत आपल्या 'प्रसाद' मासिकामधून त्यांच्या सुरवातीच्या आठ-दहा कथांना प्रसिद्धी दिली आणि 'वपु' कथाकार म्हणून कथाविश्वात दाखल झाले. य.गो.जोशी ह्यांचे आशीर्वाद लाभलेले व.पु.काळे पुढे समृद्ध कथा लिहीत राहिले. एक लेखणी समर्थपणे आपले कथाविश्व फुलवत राहिली. 'वपुं'नी आपल्या

सुरुवातीच्या आयुष्यात य.गो.जोशी ह्यांच्या अप्रतिम कथांचा सखोल वेध घेतला आणि नेमक्या शब्दांमध्ये जबरदस्त आशय प्रकट करणाऱ्या दीर्घकथासुद्धा लिहिल्या. त्यांच्या 'तप्तपदी' ह्या कथासंग्रहातल्या सर्वच स्त्री व्यक्तिरेखा त्याची साक्ष आहेत.


एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात म्हणजे १८९०च्या सुमारास गुजगोष्टींची सुरुवात झाली. आधुनिक कथा जन्माला आली आणि तेव्हापासून मराठी कथेने अनेक वळणे घेतली. आजपर्यंत मराठी कथेचा सव्वाशे वर्षांचा प्रवास झाला. ह्या पार्श्वभूमीवर व.पु.काळे ह्या कथाजादूगाराचे स्थान निश्चित करायचे झाले तर, 'वपुं'च्या एकूणच कुटुंबकथांचा धांडोळा घ्यावा लागेल. असा धांडोळा घेताना प्रामुख्याने लक्षात येते, की प्रापंचिक आयुष्यात सुखदुःखाचे येणारे सर्व प्रकारचे प्रसंग आपल्या बहुतांश कथांमधून खूप तरल आणि प्रवाही पातळीवर वाचकांच्या हृदयाला स्पर्श करीत उलगडलेले आहेत. तुमच्या-आमच्या मध्यमवर्गीय आयुष्यातील सर्व कढसहन करणारी दुखरी नस 'वपुं'नी नेमकेपणाने पकडलेली आहे. जीवनाच्या वाहत्या प्रवाहात 'वपु' स्वत: सन्मुख उभे राहून त्यांनीच प्रकट केलेल्या अक्षरसृष्टीला सामोरे गेलेले आहेत. इतकेच काय, परंतु निर्मितीच्या सर्व क्षणांना 'वपुं'नी आपले सर्व प्रांजळ अनुभव अर्पण केलेले आहेत. सुंदर विचारांचे अमोल धन 'वपुं'च्या कथेतल्या काही पात्रांनी भरभरून दिलेले आहे. मुख्य म्हणजे आकलनाच्या परिघातले क्षण 'वपुं'ची कथा सहजपणे व्यक्त करीत जाते, हे 'वपुं'च्या एकूणच वाङ्मयाचे प्रधान वैशिष्ट्य आहे. मध्यमवर्गीय आकलनाच्या परिघाला आपल्या कथेतून जाणीवपूर्वक स्पर्श करीत प्रसन्न शैलीला वश करून घेतलेले आहे. मूलत: 'वपुं'वर ओशोंच्या तत्त्वचिंतनाचा जो प्रभाव होता, एक आध्यात्मिक चिंतनाची खोली जी 'वपुं'पाशी होती, त्याची ऐश्वर्यजोड त्यांच्या कथेला सहजपणे प्राप्त झाली.

कुठल्याही श्रेष्ठ कलाकृतीला समीक्षेच्या अंगाने तोलायचे झाले तर, ती वाङ्मयीन कलाकृती शाश्वत मूल्यांच्या कसोटीवर उतरते आहे ना, ह्याचा धांडोळा घ्यावा लागतो. 'वपुं'चे अक्षरवाङ्मय ह्या कसोटीवर उतरते, असे म्हणायला हरकत नसावी. संदर्भ बदलतात; परंतु सामूहिक

**३ री आवृत्ती**

# राजर्षी शाहू छत्रपती
## एक अभ्यास

**वसुधा पवार**




**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

तसे पाहिले, तर अगदी सर्वसाधारण माणसाच्या व्यक्तिमत्त्वालाही असंख्य पैलू असतात. मग शाहूंसारख्या क्रियाशील राजाच्या व्यक्तिमत्त्वाला विविध पैलू होते, यात आश्चर्य नाही. वसुधा पवार यांनी आपल्या पुस्तकाच्या वेगवेगळ्या प्रकरणांतून या पैलूंचे दर्शन घडविले आहे. अस्पृश्यतानिवारण, सक्तीचे प्राथमिक शिक्षण, वसतिगृहांची स्थापना, दुष्काळावर आणि साथीच्या रोगांवर केलेली मात, आरक्षण, मुलींचे शिक्षण, आंतरजातीय विवाहास मान्यता देण्याचा कायदा, फासेपारधी वगैरेंचे पुनर्वसन, जलसंधारण, चहा-कॉफी लागवड इ. प्रकारे सामाजिक जीवनाच्या असंख्य क्षेत्रांमध्ये 'राजर्षी शाहूंनी' काळाच्या पुढे पावले टाकली असे दिसते. काळ राजाला घडवतो की राजा काळाला घडवतो, याचे 'राजा कालस्य कारणम्' हे प्राचीन काळी देण्यात आलेले उत्तर भारताच्या इतिहासातील ज्या मोजक्या राजांना यथार्थतेने लागू पडते, त्यांमध्ये शाहू महाराजांचे स्थान फार वरचे आहे, यात शंका नाही. वसुधा पवार यांच्या प्रस्तुत पुस्तकातून हे सर्व उत्तम रीतीने व्यक्त झाले आहे.

मन मात्र तसेच राहते. ‘वपुं’चे चिंतनशील मन ह्या संदर्भात एक अप्रतिम विचार देते, ‘‘मी आजपर्यंत ज्या कथा लिहिल्या त्याला तुम्ही कुटुंबकथा म्हणता, त्यालाच मी माणसांच्या कथा म्हणतो. पूर्वीची कुटुंबे ही समाजमनाच्या कोंदणात घट्ट बसलेली होती. ज्याप्रमाणे हिऱ्याचे प्रतिबिंब कोंदणावर पडत असते, तसे कोंदणाचेही हिऱ्यावर पडत असते. सामाजिक संकेत आणि कुटुंबव्यवस्थेचे संकेत यात फारसे अंतर नव्हते. त्यामुळे मोठे सणवार, म्हणजेच दिवाळी, दसरा, गुढीपाडवा आणि गणेशोत्सव हे समाजाचे एकत्रित आनंद लुटण्याचे भाग्यशाली क्षण होते; परंतु आज प्रत्येक कुटुंबाची स्वतःपुरती वेगळी समाजरचना झालेली आहे. घरापुरती संस्कृती निर्माण झालेली आहे आणि घर हाच त्यांचा समाज झालेला आहे. त्यामुळे प्रत्येकाला असुरक्षित वाटायला लागलेले आहे. घरात फक्त तीन-चार माणसेच वावरतात. त्यामुळे चॉईस राहिलेला नाही. संवाद पारखा झालेला आहे. पूर्वी कुटुंबात वीस-पंचवीस माणसे असायची. सर्व नातेसंबंध घरात वावरायचे. त्यामुळे बाहेर जायला लागायचे नाही. दुःख अथवा आनंद घरातच कोणाजवळ तरी बोलता येत होते. ही सारी कालची कुटुंबव्यवस्था होती, त्यामुळे प्रत्येक वळणावर कथेचे संदर्भ बदलत गेले. त्याचा धांडोळा माझी कथा घेते.’’

‘वपु’ हे एक अजब रसायन होते. इतके चिंतनशील मन क्वचितच भेटते. मूलतः ‘वपु’ हे तत्त्वज्ञच होते. त्यांच्या एकूणच जगण्याला प्रामाणिक विचारांची बैठक होती. ज्ञानेश्वरीचा त्यांचा अभ्यास होता. ‘तू भ्रमत आहासी वाया’ ही त्यांची कादंबरी त्यांची आध्यात्मिक विचारांची खोली ठळकपणे दर्शविते. आपल्या निर्मिती प्रक्रियेविषयी ‘वपु’ म्हणतात, ‘‘अनुभव घेतला रे घेतला की, लगेच निर्मितीची प्रक्रिया सुरू होते, हे त्रैराशिक मांडण्यात काहीच अर्थ नाही. माझ्याही छोट्या आयुष्यात, मर्यादित आयुष्यात अनेक घटना घडल्या; पण वाचकांना वाटतं की लेखन आणि धान्य दळण्याची गिरणी, सारखंच. वरून गहू टाकले की खाली पीठ तयार...लेखन हा प्रकार एवढा सोपा नाही. म्हणूनच आत्तापर्यंतच्या आयुष्यात, हादरवून टाकणाऱ्या अनेक घटना घडूनही ह्या प्रसंगांवर लेखन झाले नाही. मन कासावीस जरूर झाले,

हेलावूनही गेले; पण त्याची कथा झाली नाही.'' 'वपुं'च्या स्वगतासारख्या बोलण्यातून त्यांच्या सशक्त कथेचा प्रवास आपोआप कळत होता. प्रत्येकाचे जगणे-वागणे, सुख-दुःख, आनंद, समाधान वेगळे असते; परंतु हे सारे वैयक्तिक पातळीवरचे रेंगाळणे असते; मात्र काही माणसे पराकोटीची वेगळी असतात आणि त्यांच्या कथाही इतरांपेक्षा वेगळ्या असतात. जरी ती तुमच्या आमच्यासारखीच दिसत असली तरी त्यांचे जगणे विलक्षण असते. 'वपुं'च्या कथेतली माणसे ही तशी असतात.

'वपु' हे एक भन्नाट व्यक्तिमत्व होते. त्यांचे अनुभवविश्व व्यापक होते. त्यांना असंख्य माणसे भेटली. त्यांच्यातले वेगळेपण त्यांनी हेरले. त्यातून त्यांच्या अनेक कथांचा जन्म झाला. अनेक व्यक्तिचित्रे शब्दबद्ध झाली. त्यांच्यापाशी विलक्षण असे संवादकौशल्य होते. माणसाला बोलते करण्याची एक अजब शक्ती त्यांना प्राप्त झाली होती. घराघरांतले संबंध त्यांनी शोधक नजरेने टिपले आणि त्यांच्या अप्रतिम कथा झाल्या. त्यामुळे त्या एका अर्थाने कुटुंबकथा झाल्या. तसा विचार केला तर थोड्याफार फरकाने प्रत्येक कथा ही 'कुटुंबकथा'च असते. मग 'वपुं'च्या कथेचे वेगळे वैशिष्ट्य शोधू पाहता लक्षात येते की, त्यातले प्रसंग, त्यातले जबरदस्त संवाद आणि मानवी जीवनातल्या अंतिम सत्याकडे झुकणारी तत्त्वज्ञानभारली, सहज, सोपी तरीही वाचताना खळ्कन डोळ्यांत पाणी उभी करणारी त्यांची अप्रतिम भाषा. 'रंग मनाचे' ह्या कथासंग्रहातील 'पिकनिक स्पॉट' ही कथा एक उदाहरण म्हणून घेतली तर आपल्या लक्षात येते की, 'वपु' ही काय चीज आहे...विष्णूच्या वडिलांचा (मास्तरांचा) मृत्यू झालेला आहे. त्याच्या सांत्वनासाठी माणसे येऊ लागतात. विशेषतः खूप दूर राहणारे, मास्तरांच्या आजारपणाची किंचितही तोशिस न लागलेले लोक घरी ठिय्या मांडून बसतात आणि दिवस करायच्या निमित्ताने त्या घराचा 'पिकनिक स्पॉट' करतात, याचे वर्णन ह्या कथेत वपुंनी केलेले आहे. त्या वर्णनावरून लक्षात येते की हे सारे कमी-जास्त प्रमाणात घरोघरी चाललेले आहे. विष्णूची बायको कथेच्या शेवटी म्हणते, ''सगळ्या माणसांना जरा आऊटिंग हवे होते. मला मात्र ह्याचा बेदम त्रास होतोय.

खरंच आपलं घर पिकनिक...'' तिला मध्येच अडवत विष्णू काहीशा गंभीर स्वरात सांगतो, ''ऐकून ठेव, म्हणजे घराचा 'पिकनिक स्पॉट' झाल्याचे तुला दुःख होणार नाही. यमधर्माने धर्माला विचारले, 'तुला सर्वांत जास्त कधी हसायला येते?' तेव्हा धर्माने सांगितले होते, 'चार माणसे जेव्हा एकाला तिरडीवरून घेऊन जातात तेव्हा एक दिवस आपल्याला तिरडीवरच्या माणसाची भूमिका करायची आहे, हे विसरतात, तेव्हा मला मनसोक्त हसायला येते.'' ही खरी 'वपुं'च्या लेखनाची खासियत होती. प्रत्येक कथेतला त्यांचा 'पंच' वेगळाच आणि अनोखा असतो. चारपाचशे उत्तमोत्तम कथा लिहिणारे 'वपु' शेवटपर्यंत स्वतःच अनुभवलेले स्वतःचे चरित्र सांगत आहेत की काय, ही भावना त्यांची 'पार्टनर' कादंबरी वाचताना विशेषत्वाने होते. 'पार्टनर' वाचल्यावर 'वपु' सर्वार्थाने कळतात.


अतिशय आकर्षक शैलीत 'वपुं'नी आपल्या समग्र वाङ्मयातून तत्त्वज्ञानभारले सुंदर विचार दिले. आकलनाच्या परिघातले सार्वत्रिक अनुभवता येणारे अनुभवविश्व सहजपणे दिले. आपल्या प्रसन्नचित्त शब्दशैलीला सर्वस्पर्शी मुलायम स्पर्श दिला. सत्यच सांगायचे तर 'वपुं'ची एकूणच शैली ठुमरीसारखी आहे. दहा मिनिटांत संपणारी; परंतु संपूर्ण मैफल जिंकून घेणारी...

'वपु' नेहमीच आपल्या चटकदार, खिळवून ठेवणाऱ्या सहज, सोप्या भाषेतून सर्वसामान्य वाचकांची, विशेषतः श्रोत्यांची मने जिंकून घेत असत. इतर लोकमान्य लेखकांपेक्षा वाचकांना 'वपुं'चे लेखन अधिक जवळचे वाटायचे, ह्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, त्यांच्या लेखनातला स्वर इतरांपेक्षा वेगळा होता. त्यांचे नवरा-बायको संदर्भातले चिंतन तर अजबच होते. त्यांचे एक नवरा-बायको संघर्षावर मात करणारे तत्त्वज्ञान होते की संघर्ष कुणामुळेही झालेले असोत, दोघांनी रात्री एकमेकांना 'गुडनाईट' म्हणत त्या दिवसाचे संघर्ष त्याच दिवशी झोपण्यापूर्वी संपवायला हवेत आणि उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाचे स्वागत सूर्यकिरणांसारखे प्रकाशदायी करायला हवे. हे काहीसे अवघड धोरण नीटपणे सांभाळले की कित्येक अटळ निकराचे संघर्ष टळू शकतात. 'तप्तपदी' ह्या 'वपुं'च्या सर्वोत्तम कथासंग्रहात हे

२ री आवृत्ती

# राजर्षी शाहू छत्रपती पत्रव्यवहार आणि कायदे

**डॉ. जयसिंगराव पवार**




**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

राजर्षी शाहू छत्रपतींच्या समाजक्रांतीच्या बहुआयामी कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या या कागदपत्रांच्या संग्रहात महत्त्वाच्या पत्रव्यवहाराचा समावेश आहे. त्यात खुद्द शाहू छत्रपतींनी इतरांस लिहिलेली तसेच इतरांनी महाराजांना लिहिलेली अशी अनेक दुर्मिळ पत्रे समाविष्ट झालेली आहेत. विशेषतः यामधील शाहू-आंबेडकर पत्रव्यवहार तत्कालीन सामाजिक व राजकीय चळवळींवर प्रकाश टाकणारा आहे. या उभय महापुरुषांत परस्परांविषयी किती जिव्हाळा होता, याचेही दर्शन ही पत्रे घडवितात. याच पत्रव्यवहारांत, शाहू छत्रपतींनी डॉ. बाबासाहेबांना 'लोकमान्य आंबेडकर' असे संबोधिले आहे; तर बाबासाहेबांनी छत्रपतींचे वर्णन करताना त्यांना 'The Pillar of Social Democracy in India' (भारतातील सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ) असे म्हटले आहे.


महत्त्वाचे, संसार सुखमय करण्याचे तत्त्वज्ञान अतिशय प्रभावीपणे प्रकट केले आहे. ह्या 'तप्तपदी' कथासंग्रहाची प्रत प्रत्येक लग्नात आपण वधूवरांना आहेर म्हणून द्यावी आणि त्यातला एक सुंदर विचार फ्रेम करून अर्पण करावा. तो विचार असा, 'वधूने शालू नेसलेला असतो, वराने उपरणं पांघरलेलं असतं. त्यामुळे ते उपरणं तो केव्हाही उतरवू शकतो. वधूला ते उपरणं गाठीसकट सांभाळावं लागतं. ते उपरण्याचं ओझं झटकून टाकायचं तिने ठरविलं, तर अजूनही तिला ह्या समाजात जबर किंमत मोजावी लागते. 'सखा सप्तपदी भव' एका ओळीच्या या अष्टाक्षरी कवितेतल्या 'सखा' ह्या शब्दाचा अर्थ ज्या ज्या पुरुषांना समजला, त्या त्या संसाराच्या बाबतीत सात पावलांनी स्वर्ग पृथ्वीवर अवतरतो. उरलेल्यांच्या संसारांची ती तप्तपदीच...'

'वपु' लिहीत होते, सतत संवाद साधत होते. त्यांच्याजवळ सतत एक उत्तम विचार देणारा अक्षय संदेश असतो, हे त्यांच्या एकूणच जिंदादिलीतून जाणवत असे. 'वपु' हे कदाचित मराठी भाषेतले पहिले साहित्यिक असतील की त्यांच्या साहित्यातील निवडक विचारांचा 'प्लेझर बॉक्स' त्यांनी आपल्या सर्व चाहत्यांना प्रेमपूर्वक देऊ केला. जर हा 'प्लेझर बॉक्स' आपण प्रत्यक्ष वाचनानंदातून अनुभवला तर 'वपु' नेमके किती श्रेष्ठ लेखक होते ह्याची जाणीव होईल. खूप वेळेला मनात विचार येतो की, 'वपु' जर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले असते तर रसिकांना खूप आनंद झाला असता. त्यांचा कालखंड आहे २५ मार्च १९३२ ते २६ जून २००१. त्यांच्याइतके आनंदी व्यक्तिमत्त्व साहित्यविश्वात क्वचितच अनुभवाला येणारे... प्रत्येक नव्या वर्षाचे स्वागत,'वपु' मुंबईतल्या सर्व ट्रॅफिक पोलिसांना शुभेच्छापत्र देऊन करायचे, त्यांचा मान राखायचे. हे एक दुर्मिळ उदाहरण होते. शेवटपर्यंत त्यांनी सर्वांना केवळ आनंद दिला. जगण्याची उमेद दिली. आपल्या साहित्यातून जगण्याची निश्चित दिशा दाखवली आणि सर्वांवर कृपावंत होऊन, शांत, शीतल चांदण्याची बरसात केली. असा 'वपु' पुन्हा होणे नाही!

**-वामन देशपांडे**
**९३२४६१५०७७**

**२ री आवृत्ती**

# ||राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे||




**डॉ. जयसिंगराव पवार**

**किंमत : १७०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

राजर्षी शाहू छत्रपतींच्या संस्थानातील त्यांनी काढलेल्या जाहीरनाम्यांचा व हुकूमनाम्यांचा हा निवडक संग्रह त्यांच्या समाजपरिवर्तनाच्या कार्यावर प्रकाश टाकणारा आहे. त्यातून महाराजांची आपल्या प्रजेच्या कल्याणाविषयीची तळमळ व्यक्त होते. तसेच त्यांची पुरोगामी दृष्टी व समाजसुधारणेविषयीची कल्पकता दिसून येते.

हे जाहीरनामे व हुकूमनामे कोल्हापूर पुरालेखागारातून घेतलेले असून, ते संपादकीय टिपणांसह येथे दिले आहेत. ते शाहूप्रेमी वाचकांना, तसेच अभ्यासकांना उद्‌बोधक व मार्गदर्शक ठरतील, यात शंका नाही.

# श्रद्धांजली

## ♦ डॉ. गंगाधर पानतावणे

मराठी साहित्याचे अभ्यासक, अस्मितादर्श चळवळीचे जनक आणि पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. गंगाधर पानतावणे (वय ८०) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना भारत सरकारतर्फे नुकताच पद्मश्री सन्मान जाहीर झाला होता.

नागपूर येथे जन्मलेले डॉ. पानतावणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून मराठी विभाग प्रमुख पदावरून निवृत्त झाले. 'अस्मितादर्श' नियतकालिकाचे संपादक म्हणून त्यांनी दलित लेखक, कवींना पाठबळ देणारी चळवळ चालवली. त्यांचे 'मूल्यवेध', 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे', 'दलितांचे प्रबोधन', 'वादळाचे वंशज' इ. ग्रंथ प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रंथ पुरस्कार, पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार (लंडन), अखिल भारतीय दलित साहित्य अकादमीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार आदी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते.


## ♦ डॉ. के. रं. शिरवाडकर

ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. केशव रंगनाथ शिरवाडकर (वय ९२) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. दिवंगत साहित्यिक वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचे ते कनिष्ठ बंधू होत. 'इंडियन नॉव्हेल इन इंग्लिश ॲण्ड सोशल चेंज' या विषयात त्यांनी पीएच.डी. संपादन केली होती. मराठी व इंग्रजी नियतकालिके, तसेच 'शोधापत्रिका'मधून त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले. 'तो प्रवास सुंदर होता - कुसुमाग्रज वि. वा. शिरवाडकर - जीवन आणि साहित्य आदी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. २०१२मध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेने भरविलेल्या पहिल्या साहित्य समीक्षकांच्या संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. राज्य शासनाकडून तत्त्वज्ञान व मानसशास्त्र विषयावरील पुस्तकासाठीचा ना. गो. नांदापूरकर पुरस्कार त्यांच्या 'संस्कृती, समाज आणि साहित्य' पुस्तकाला मिळाला होता.

❖

**नवं कोरं**

# ब्रह्मकन्या




**लेखक**
झोया फन आणि
डेमियन लुईस

**अनुवाद**
श्रद्धा भोवड


**किंमत : ३५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

वयाच्या चौदाव्या वर्षी झोयाचं बालपण अचानकच संपून जातं. तिच्या गावावर बर्मी सैनिक हल्ला करतात आणि जीव वाचवण्यासाठी झोयाला आणि तिच्या कुटुंबीयांना पळ काढावा लागतो. आगीच्या ज्वाळांनी वेढलेलं आपले घर डोळ्यांत साठवून त्याकडे पाठ फिरवल्यानंतर त्यांच्या भाळी लिहिलेली असते ती जंगलांमधून अर्धपोटी केलेली वणवण आणि सदैव पाठलागावर असणाऱ्या बर्मी सैन्याची भीती. घरादाराला पारखे झालेल्या हजारो करेन लोकांसारखंच हे कुटुंबदेखील जंगलाचा आसरा घेतं. लपतछपत थायलंडमधील एका सैनिकी छावणीत आसरा घेतं. जन्मजात हुशार झोया शिष्यवृत्ती मिळवून थायलंडमध्ये आणि त्यानंतर इंग्लंडमध्ये शिक्षणाकरिता प्रवास करते आणि तिथे आश्रयासाठी अर्ज करते.

पुढच्याच वर्षी फ्री बर्मा मोर्च्याच्या गर्दीतून तिलाच निवडून बोलण्याकरिता उभं केलं जातं, त्यानिमित्ताने ती तिच्या आयुष्यातील पहिलीवहिली मुलाखत थेट बीबीसीवर देते आणि बघताबघता ती बर्माच्या स्वातंत्र्यलढ्याचा आंतरराष्ट्रीय आवाज बनते. त्यानिमित्ताने झोया अनेक मुरब्बी राजकारण्यांच्या भेटीगाठी घेते, अभिनेत्यांना सोबतीला घेऊन, व्यासपीठावरून मदतीचे आवाहन करते; पण तिच्या प्रत्येक हालचालीवर बर्मी जुंत्याचे लक्ष आहे. तिच्या प्रयत्नांनी तिला प्रसिद्ध तर केले आहेच; पण तिच्या जिवाला आता कायम धोका असणार आहे. झोयाला तिच्या मायदेशी परतायला मिळाले का? मिळेल का?

## अभिप्राय

# युगांतराच्या कालखंडाचा दस्तावेज...




**माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन (१९५२-१९८९)**

**लेखक :** राम प्रधान

**पृष्ठसंख्या :** ४७२

**किंमत :** ५००/- रु.

प्रशासन सेवेतील सर्वोच्च स्तरावर प्रदीर्घ काळ सेवा बजावलेले अधिकारी बहुधा प्रसिद्धीच्या प्रकाशझोतात नसतात. किंबहुना, त्यांनी आपली कामे पडद्याआड राहूनच करावी असे लोकशाही प्रशासनाचे सर्वमान्य संकेत आहेत. कित्येकदा ऐतिहासिक स्वरूपाची कामगिरी हे अधिकारी बजावतात. अशा काही मोजक्या प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये राम प्रधान यांचा समावेश होतो. पंडित नेहरू, इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, राजीव गांधी यांच्यासारख्या नेत्यांचा गाढा विश्वास त्यांनी संपादन केला होता, तो त्यांच्या अंगभूत गुणांच्या बळावर! त्यांची प्रखर बुद्धिमत्ता, अभ्यासू कार्यशैली आणि चातुर्य या बाबी निर्विवाद होत्या. त्याचप्रमाणे त्यांच्या नि:पक्षपाती ध्येयनिष्ठेविषयीही कधीच शंका उपस्थित झाल्या नाहीत. त्यांनी लिहिलेल्या 'वादळमाथा ते १९६५ भारत-पाक युद्ध' या पुस्तकात त्यांच्या आत्मचरित्राचा काही अंश ओघाने येऊन गेला आहे. तथापि ते पुस्तक प्रामुख्याने यशवंतराव चव्हाण यांच्या संरक्षणमंत्रिपदावरील कामगिरीविषयी आहे. ज्याला खऱ्या अर्थाने आत्मकथन म्हणता येईल असे त्यांचे नवे पुस्तक म्हणजे 'माझी वाटचाल - मेटकॉफ हाऊस ते राजभवन (१९५२-१९८९)'!

राम प्रधान यांनी स्पर्धा परीक्षेद्वारे १९५२ मध्ये भारतीय प्रशासन सेवेत प्रवेश केला. तेव्हापासून सेवानिवृत्तीपश्चात १९८९ मध्ये त्यांची अरुणाचल प्रदेशचे राज्यपाल म्हणून नेमणूक झाली, तोपर्यंतचा विस्तृत अनुभवपट त्यांनी या आत्मचरित्रात उलगडला आहे.

सर्वसाधारणपणे महाराष्ट्राचे गृहसचिव आणि मुख्य सचिव, तसेच केंद्र शासनाचे गृहसचिव या पदांवरील त्यांची नेत्रदीपक कामगिरी मराठीजनांना परिचित आहे. १९६२ मधील चीन युद्धानंतर यशवंतराव चव्हाण यांची देशाच्या संरक्षणमंत्रिपदी निवड झाली. तेव्हा आपल्यासमवेत काम करण्यासाठी ते प्रधानांना दिल्लीला घेऊन गेले. प्रधानांच्या संरक्षण मंत्रालयातील कार्यकाळविषयीही थोडीफार माहिती महाराष्ट्राला आहे. तथापि अन्य काही महत्त्वाच्या पदांवरही त्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. ज्यात सुमारे दहा वर्षे त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर वाणिज्यविषयक काम केले, त्याचा समावेश होतो. 'माझी वाटचाल' या पुस्तकात त्यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवांचे विवेचन आले आहे. युनो किंवा

युएनसीटीडी यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांचे कामकाज कसे चालते, आणि तेथे जाऊन एखाद्या देशाच्या प्रतिनिधीला कोणकोणत्या जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात याची माहिती या पुस्तकात मिळते. तीच बाब नौकानयन विभागांसंबधी. सामान्यत: भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्याला अशा भूमिका निभावण्याचे पूर्वप्रशिक्षण नसते. अगदी नवे, महत्त्वाचे आणि काहीशा तांत्रिक स्वरूपाचे विषय समर्थपणे हाताळून तेथेही आपल्या कर्तृत्वाची मोहोर उमटवताना लेखकाने किती परिश्रमपूर्वक अभ्यास केला असेल याची कल्पना हे पुस्तक वाचल्यावर वाचक करू शकतो.

राज्यात आणि केंद्रात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना भिवंडीची दंगल असो, दत्ता सामंतप्रणीत गिरणी कामगार संप असो किंवा पंजाब, आसाम आणि मिझोरामविषयक ऐतिहासिक करार असोत; अशा अनेकविध प्रसंगांत उद्‌भवलेली आव्हाने आणि आलेले अनुभव आदी कित्येक घडामोडींचा तपशील प्रधान यांनी तटस्थपणे मांडला आहे. या सर्व प्रसंगांतील त्यांची कामगिरी नेत्रदीपक होती. तरीही विवेचनात आत्मप्रौढीचा वास कोठेही येणार नाही याची पुरेपूर काळजी त्यांनी घेतली आहे. त्यामुळे या पुस्तकाची वाचनीयकता आणि विश्वासार्हता कित्येक पटीने वाढली आहे.

प्रधान यांचा प्रशासन सेवेतील सुरुवातीचा प्रशिक्षण कालावधी आणि (आताच्या) गुजरात प्रांतातला कार्यकाळ ही प्रकरणे वाचताना वाचक नकळतपणे इतिहासात काही दशके मागे जातो. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुरुवातीच्या काळात प्रशासनाची कार्यपद्धती बव्हंशी ब्रिटिश पठडीतलीच होती. परंतु नव्या जमान्यातील वास्तवाला समोरे जाताना अधिकाऱ्यांना किती जाणीवपूर्वक पावले उचलावी लागत होती. याचे मनोज्ञ चित्र लेखकाने सहजगत्या रेखाटले आहे. प्रशासन सेवेच्या दृष्टीने पाहता हे एक युगांतर होते. अशा कसोटीच्या काळात नवे मापदंड निर्माण करण्याची जबाबदारी प्रशासन सेवेत नव्याने प्रवेश केलेल्या अधिकाऱ्यांवर येऊन पडली होती. त्यांची प्रगल्भता, विकासविषयक मानसिकता स्वीकारण्याची तयारी आणि तारतम्य या सर्वांची ती परीक्षा होती. या संक्रमणावस्थेत लेखकाने आपली जडणघडण कशी केली, हे वाचताना आपण थक्क होऊन जातो. आजच्या पिढीतल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना हे सर्व उद्‌बोधक वाटावे. आपल्या भूमिका बदलत्या काळानुसार कशा सतत तपासून पाहाव्या

लागतात आणि नवी कौशल्ये कशी आत्मसात करावी लागतात, याचा एक वस्तुपाठ नव्या प्रशासकांसमोर या आत्मकथनातून मांडला गेला आहे.

कोल्हापूरच्या बाजार समितीची स्थापना किंवा राजा दिनकर केळकर संग्रहालयाची पुनर्रचना असो, लेखकाच्या उपक्रमशीलतेची अशी कित्येक उदाहरणे जागोजागी आपल्यासमोर येतात. आपल्या कार्यसूचित समाविष्ट नसलेली जनहिताची अनेक कामे सहजगत्या करणे कुशल प्रशासकाला शक्य असते. मात्र त्यासाठी पुढाकार घेणे आणि सर्वसंबंधितांची मने विधायक कार्यासाठी वळवून घेणे महत्त्वाचे असते याची प्रचीती लेखक आणून देतो.

प्रशासन हा विषय तसे पाहू गेल्यास काहीस क्लिष्ट असला तरी तो सोपा आणि रंजक करून मांडण्याची हातोटी लेखकाकडे आहे. पुस्तकाची भाषा अत्यंत ओघवती आहे. त्यामुळेच हे आत्मकथन अत्यंत वाचनीय झाले आहे. आपल्या व्यक्तिगत जीवनातील ताणतणाव किंवा चढउतारांविषयी लेखकाने हात काहीस आखडता घेतला आहे, असे मात्र जाणवते. विशेषत: कटु अनुभवांविषयी विस्ताराने न लिहिणे हेही अपघाताने घडलेले नाही, तर सहेतुकपणे आहे.


देशाच्या इतिहासातील काही अत्यंत महत्त्वाच्या घडामोडींचा दस्तावेज, असे अनन्यसाधारण महत्त्व प्रधान यांच्या या आत्मकथनाला आहे. भावी काळातील संशोधक- वाचकांना हे अमोल साधन यानिमित्ताने त्यांनी उपलब्ध करून दिले आहे यात शंका नाही.

अरुणाचल प्रदेशचे राज्यपाल, महाराष्ट्राच्या विधान परिषदेचे सदस्य किंवा मुंबईत झालेल्या अतिरकी हल्ल्यांच्या चौकशी समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांना आलेले अनुभवही कुतूहलजनक आहेत. त्याविषयी त्यांनी आत्मचरित्राच्या दुसऱ्या खंडात अधिक मोकळेपणाने लिहावे अशीच अपेक्षा वाचक ठेवतील. त्यानिमित्ताने सद्य:स्थितीतील राजकारण, प्रशासन आणि सामाजिक उलाढाली यांबाबबतचे त्यांचे परिपक्व चिंतर आणि भाष्य वाचकाच्या हाती पडावे अशी अपेक्षा आहे.

***दैनिक लोकसत्ता : २१ जानेवारी २०१८***

*- प्रभाकर (बापू) करंदीकर*

# सुधा मूर्तींच्या आठवणींची कथामाला





**तीन हजार टाके**
**लेखक :** सुधा मूर्ती
**अनुवाद :** लीना सोहोनी
**पृष्ठसंख्या :** १५२
**किंमत :** १६०/- रु.

आयुष्य म्हणजे विविध प्रसंगांचा, अनुभवांचा संचयच खरेतर. अशाच एका संध्याकाळी निवांत चांदण्यांच्या प्रकाशात बसल्यावर मनाला भिडलेले आणि जीवनाला खऱ्या अर्थाने नवे वळण देऊन गेलेले अनेक प्रसंग डोळ्यांसमोरून झर्रकन सरकतात. यात वेळ कसा जातो ते कळतच नाही. म्हणूनच वर्तमान, भविष्याकडे लक्ष द्यायला हवे, असे सांगितले जात असले तरी आठवणींची दुनिया निराळीच. अक्षरशः आयुष्याचा पट या आठवणींत दडलेला असतो. लेखिका सुधा मूर्ती यांचे 'तीन हजार टाके' हे पुस्तक म्हणजे त्यांच्या आयुष्यातील अशाच आठवणींची, प्रसंगांची कथामालाच.

त्यांच्या सोप्या, सरळ लेखनशैलीमुळे त्या कथा अधिक खुलल्या आहेत. म्हणूनच त्या थेट मनाला भिडतात. यातील काही कथा अगदी सामान्य, किंबहुना समाजाच्या दृष्टीने दुर्लक्षित व्यक्तींभोवती फिरतात; परंतु त्याचबरोबर त्यांचे असामान्य जीवनही उलगडतात. माणसाचं माणूसपण दाखवताना त्याच्यातील दुष्ट प्रवृत्तीही समोर आणतात. थोडक्यात, मानवी जीवनाचे विविध पैलू या कथांद्वारे समोर येतात.

लेखिका 'इन्फोसिस फाउंडेशन'मध्ये काम करत असताना विविध प्रकारच्या घटकांशी त्यांचा संपर्क आला. यातून त्यांना दुर्लक्षित घटकांचे जगणे समजून घेता आले आणि त्या माणसांच्या प्रेमाची पुंजी जमा होत गेली. या प्रवासात आलेले खाचखळगेही लेखिकेने मांडले आहेत. तीन हजार टाके या कथेत देवदासींसाठी काम करण्याचा लेखिकेचा अनुभव समोर येतो. सुरुवातीला हा प्रवास खडतर होता; पण मदत करण्याचा लेखिकेचा निर्धार इतका पक्का होत गेला, की हळूहळू त्यांचा मार्ग मोकळा झाला आणि देवदासींना सन्मानाने जगणे शक्य झाले. आणखी एका कथेत लेखिकेने आपला इंजिनिअरिंगच्या शिक्षणाचा प्रवास मांडला आहे. हे आव्हानही सोपे नव्हते. संपूर्ण कॉलेजमध्ये एकटीच मुलगी असल्याने क्षणोक्षणी त्यांच्यासमोर प्रश्न उभे राहत होते; पण शिक्षकांची साथ आणि शिक्षणाचे ध्येय या जोरावर त्यांनी असंख्य मुलींना इंजिनिअरिंग कॉलेजची कवाडे खुली करून दिली. मुलींसाठी स्वच्छतागृह नसल्यासारख्या प्राथमिक अडचणींनाही त्या सामोऱ्या गेल्या. हा प्रवास थक्क करतो. लेखिकेचे चित्रपटाचे प्रेम, बॉलिवूडसंदर्भात आलेले अनुभव, त्यांच्या नातींनी आजच्या काळाची सांगड घालून सांगितलेल्या पौराणिक गोष्टी, विविध भाज्यांविषयी माहिती, या कथा गंमत आणतात. यात लेखिकेने आपल्या वडिलांच्या आयुष्यातील एक कथाही मांडली आहे. एका चित्रपटात शोभेल अशी कथा त्यांच्या वडिलांच्या मनाचा मोठेपणा अधोरेखित करते. आपल्या मदतीची समोरचा जाणीव ठेवत नाही, असे आजकाल सर्रास म्हटले जात असले तरी लेखिकेच्या वडिलांनी त्यांच्याही नकळत एका तरुणीला केलेल्या मदतीने तिचे सारे आयुष्य कसे पालटले, हे वाचून अक्षरशः अवाक् व्हायला होते. काही हलक्याफुलक्या, काही माणसांच्या वेदना सांगणाऱ्या, तर काही त्यांचा संघर्ष सांगणाऱ्या या कथा म्हणजे एक परिपाठच आहे.

## महाभारतातील कथांचा रोचक संग्रह




**सर्पाचा सूड**
**लेखक :** सुधा मूर्ती
**अनुवाद :** लीना सोहोनी
**पृष्ठसंख्या :** १७६
**किंमत :** २००/- रु.

सुधा मूर्ती यांचे आणखी एक असे रोचक पुस्तक म्हणजे ‘सर्पाचा सूड’. महाभारतात कुरुक्षेत्री जे घनघोर युद्ध झाले, त्याविषयी तशी बरीच माहिती सर्वत्र मिळते किंवा लहानपणापासून ते आपण ऐकत, बघत आलेलो आहोत; परंतु युद्धाच्या आधी, युद्धादरम्यान असे अनेक प्रसंग घडले, ज्यामुळे महाभारत रंगत गेले. या कथा विस्मयकारक आहेत. एकमेकांमध्ये गुंतलेली नाती, आपापसातील वैर, चांगुलपणा या कथांमधून समोर येतो. अगदी लहान लहान अशा सुमारे ३३ कथा यामध्ये गुंफल्या गेल्या आहेत. यामध्ये अर्जुनाची नानाविध नावे कोणती, यमाला शाप का मिळाला, मुंगसाने युधिष्ठिराला कसा धडा शिकवला, युद्धाचा शेवट नेमका कसा झाला, या अशा लहान पण कुतूहल जागृत करणाऱ्या प्रश्नांची उत्तरे यातून मिळतात. अर्जुनाला आपल्याच मुलाकडून मृत्यूला कसे सामोरे जावे लागले, याचेही

वर्णन यामध्ये आहे. कृष्णाच्या मुत्सद्दीपणाची चर्चा नेहमीच होते; पण लहान लहान प्रसंगांतून त्याचा हा मुत्सद्दीपणा अधोरेखित होतो. प्रत्यक्ष युद्धकाळादरम्यान सुरू असलेली रणनीती अक्षरशः खिळवून ठेवते. कृष्णाचे धोरण पांडवांच्या यशास कारणीभूत कसे ठरले, हे टप्प्याटप्प्याने उलगडते. कौरव, पांडव यांच्या पलीकडे घटोत्कच, हिडिंबा, बार्बारिक, सुभद्रा, अभिमन्यू, बलरामाची मुलगी शशिरेखा यांच्या जीवनातील प्रसंगही यातून समोर येतात. पांडवांसमोर वनवासातील काळात अनेक आव्हाने समोर आली; परंतु त्यांनी ती समर्थपणे पेलली. यात काही जण दुखावलेही. या एकूणच कथा वरदान, शाप, उ:शाप या भोवती फिरताना आढळतात. सद्सदविवेकबुद्धीने विचार केला तर आजच्या पिढीला यातून अनेक प्रश्न पडतील; परंतु समाजातील दुष्ट प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी लोकांना शिक्षेचे, शापाचे भय दाखवणे गरजेचे आहे, असे आपल्या पूर्वजांना वाटत असेल, असे लेखिकेने म्हटले आहे. या कथा फारशा प्रचलित नाहीत; परंतु अत्यंत रोचक आहेत. या पुस्तकात जागोजागी सध्याच्या भारतातील घटनांचा उल्लेख करून वर्तमानाशी सांगड घालण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. महाभारतात आढळून येणारी स्थळे, गावे आणि सध्याच्या भारतातील ठिकाणे यांचा परस्परसंबंधसुद्धा सूचित केलेला आहे. कुंकरू येथील महामाया मंदिर किंवा राजस्थानातील खाटू श्यामची मंदिर, अशी उदाहरणे यात आहेत. दुष्यंत-शकुंतला यांची पुनर्भेट, भीष्माची ब्रह्मचर्यपालनाची शपथ आणि त्यातून त्यांचा उद्भवलेला मृत्यू या नाट्यमय घडामोडी यातून उलगडतात. ऋषींनी घेतलेला सूड या कथेतून द्रोणाचार्यांची वेगळी बाजू समोर येते. एकूणच सुडाचं राजकारण यापैकी बहुतांश कथांच्या मुळाशी आहे. या राजकारणातून अनेक नाती विलग झाली. अपरिमित हानी झाली. पांडवांचा वंशज जनमेजयाने हे सूडाचे राजकारण थांबवण्याचा निर्णय घेतला. या कथेने पुस्तकाचा शेवट होतो आणि महाभारतातील प्रत्येक प्रवृत्ती आजही कुठल्या ना कुठल्या रूपात आपल्या भोवतालीच आहे, असे क्षणभर वाटून जाते. या दोन्ही पुस्तकांचा अनुवाद लीना सोहोनी यांनी केला आहे.

***- महाराष्ट्र टाइम्स, १८ फेब्रुवारी २०१८***

# बुद्धभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**रा.वा. शेवडे गुरुजी**




भीमराव आंबेडकर आता कॉलेज विद्यार्थी झाले. प्राध्यापक मंडळी त्याना बी. आर. आंबेडकर असे म्हणत, तर त्यांचे वर्गबंधू त्यांना भीमराव आंबेडकर या आदरार्थी नावाने ओळखत.

मधूनमधून कॉलेज जीवनात अस्पृश्यतेचे चटके त्यांना बसत होते. उच्चवर्णीय विद्यार्थी त्यांच्याशी फटकून वागत होते. त्यांच्यापासून चार पावले ते दूर राहत होते. पण आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेने आणि अभ्यासू वृत्तीने त्यांची हुशारी त्यांच्या अन्य मित्रांच्या निदर्शनाला आली. भीमरावांनी काढलेली टिपणे त्यांच्या मित्रांच्या अतिशय उपयोगी पडू लागली. त्यामुळे परीक्षेत त्यांना अधिक गुण मिळू लागले. तेव्हा भीमराव हा एक अस्पृश्य जातीचा मुलगा आहे हे सारे जण विसरून गेले. या अनुभवाने भीमरावाने आपल्या मनाशी एक खूणगाठ बांधली, की अस्पृश्य मंडळी शिकतील, स्वच्छतेने राहतील आणि आपल्यातील ज्ञानविज्ञानादी गुणांनी इतरांचे नडते आहे हे सिद्ध

करून दाखवतील, तर अस्पृश्यता नष्ट होईल. त्यांना हेही कळून चुकले होते की हा मार्ग तसा सोपा नाही. अशक्य कोटीतला तो आहे.

प्रिव्हीयसची परीक्षा वरच्या श्रेणीमध्ये भीमराव आंबेडकर उत्तीर्ण झाले. ते इंटरच्या वर्गात गेले. इंटरला चार विषय नेमलेले असतात. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करावा लागतो. कित्येक जण तर या परीक्षेत नापास होतात आणि कॉलेज सोडून जातात. आंबेडकरांना मात्र अभ्यासाची खरी गोडी इंटरच्या वर्गातच लागली. ते इंटर चांगल्या तऱ्हेने पास झाले. मे महिन्याची सुट्टी त्यांनी मजेत घालविली.

जून महिना उजाडला. कॉलेजची प्रवेश फी भरण्याची वेळ आली. त्यांनी वडिलांकडे पैसे मागितले. कपाळाला आठ्या घालीत मोठ्या कष्टांनी रामजीबाबा म्हणाले,

''बेटा, तुला काय सांगावं?''

''बोला बाबा, कितीही कडू आणि कटू असलं तरी ते ऐकून घेण्याची आणि सहन करण्याची माझ्या मनाची तयारी आहे. बाबा, एक गोष्ट ध्यानी घ्या–''

''ती कोणती?''

''मी आता अल्लड, पोरकट भीमा राहिलो नाही. बी. ए.च्या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणारा एक हुशार भीमराव आंबेडकर नावाचा विद्याव्यासंगी विद्यार्थी आहे.''

''मग सांगून टाकतोच तर. हे बघ, आपली आर्थिक स्थिती आता इतकी बिघडलीय की तुला कॉलेजात नाव घालायला देण्याइतके पैसे मजजवळ नाहीत. एखादं वर्ष तुला तुझं शिक्षण थांबवावं लागेल.''

''मग त्यात काय मोठंसं? गरिबी हे पाप नाही, गुन्हा तर नाहीच नाही. बाबा, एक वर्ष या मुंबईत शिकवण्या करीन तर दोन वर्षांचा कॉलेजचा खर्चच काय पण घरखर्चालासुद्धा मदत करीन!''

''पोरा, आता दादासाहेब केळुसकर गुरुजींच्याकडे जाऊन येऊ. ते काय म्हणतात ते बघू.''

दुसऱ्याच दिवशी भीमरावांना बरोबर घेऊन रामजीबाबा केळुसकर

गुरुजींकडे गेले. त्यांनी केळुसकर गुरुजींना सारी हकिगत निवेदन केली. जणू काहीच अडचण नसल्यासारखे दाखवीत सहजतेने केळुसकर गुरुजी म्हणाले,

''रामजीबाबा, काही काळजी करू नका. तुमचा मुलगा मला माझ्या मुलासारखाच. गरीब व होतकरू मुलांना बडोद्याचे महाराज विद्यावेतन देतात म्हणे–''

''तसं झालं तर मोठीच अडचण दूर होईल.''

भीमराव आंबेडकर केळुसकर गुरुजींचे पत्र घेऊन बडोद्यास गेले. तिथल्या मुलाखतीत केळुसकर गुरुजींच्या शिफारसीप्रमाणे आपण अत्यंत हुशार व होतकरू विद्यार्थी असल्याचे त्यांनी सिद्ध करून दाखविले. दरमहा पंचवीस रुपयांची शिष्यवृत्ती बडोदा संस्थानच्या वतीने भीमरावांना मंजूर झाली. आणि या शिष्यवृत्तीच्या जोरावर भीमराव दोन वर्षांत इंग्रजी आणि पर्शियन विषय घेऊन उत्तम रीतीने बी.ए. झाले. मिळणाऱ्या शिष्यवृत्तीतूनच बचत करून त्यांनी काही अभ्यासाच्या आवडीची पुस्तके खरेदी केली. मधूनमधून घरच्या भाजीपाल्यासाठीसुद्धा त्यांना हे विद्यावेतन उपयोगी पडले.

बी.ए. झाल्यानंतर आणखी पुढे खूप शिकावे अशी भीमरावांची इच्छा होती. परंतु घरची आर्थिक ओढाताण पाहून भीमरावांनी नोकरी करावी, चार पैसे कमवावेत, प्रपंचाला हातभार लावावा आणि मगच पुढील शिक्षणासाठी इंग्लंड-अमेरिकेला जावे, असा केळुसकर गुरुजींनी त्यांना सल्ला दिला.

बडोद्यामध्येच सरकारी कचेरीत एक कारकून म्हणून आंबेडकरांना नोकरी मिळण्यास फार वेळ लागला नाही. अत्यंत काटकसरीने राहून ते घरी पैसे पाठवीत. त्यांच्या या पैशामुळे घरच्या ओढाताणीला स्थिरतेचे स्वरूप आले. नोकरीतल्या हुशारीमुळे आंबेडकरांना प्रतिष्ठा मिळू लागली. पण नियती ही अशी एक शक्ती आहे की, तिला कुणाचे सुख म्हणून बघवतच नाही.

एके दिवशी नोकरीवर जाण्याच्या गडबडीत असता आंबेडकराना

तार आली त्या तारेत मजकूर होता, 'वडील अत्यवस्थ-ताबडतोब निघा.' ऑफिसात रजेचा अर्ज टाकून, लगेचच गाडीने ते मुंबईला जायला निघाले. लहानपणापासून आपल्या वडिलांनी आपण मोठे व्हावे, म्हणून किती खस्ता खाल्ल्या, किती संकटांना तोंड दिले, ते सारे प्रसंग त्यांच्या नजरेसमोरून जात होते.

विषण्ण मनाने व अत्यंत जड पावलांनी ते घरी आले. आसन्नमरणस्थितीत असलेल्या रामजीबाबांनी त्यांना 'भीमराव' म्हणून हाक मारल्यावर भीमरावाना फार फार बरे वाटले. भीमरावांनी त्या आजारपणात आपल्या वडिलांची मनापासून सेवा केली. त्यांना बरे वाटावे, म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा केली; पण अखेर जे दैवात असते ते माणसाला बदलता येत नाही हेच खरे.

त्या जीवघेण्या आजारातून रामजीबाबा उठू शकले नाहीत आणि भीमराव आंबेडकर पितृछायेला कायमचे पारखे झाले.

वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या उत्कट आठवणींनी भीमरावांना महिना-दोन महिने अस्वस्थ करून सोडले होते. त्या अवधीत केळुसकर गुरुजीनी मधूनमधून त्यांचे सांत्वन केले. अन्य कोणत्याही विषयावर त्यांनी बोलणे काढले नाही. परंतु अधिक काळ असे स्वस्थ बसणे योग्य नव्हते. एके दिवशी केळुसकर गुरुजींनी विषय काढला. ते म्हणाले,

''भीमराव, आता काय करायचं ठरवलंयस?''

''परत बडोद्याला जाऊन नोकरीवर हजर व्हावं, असं वाटतच नाही मला.''

''मग तुझ्या मनात काय आहे?''

''वडिलांची इच्छा पूर्ण करणं. मला खूप खूप शिकवून मोठ्ठं करायचं होतं त्यांना. मला जर अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, कायदा इत्यादींच्या अभ्यासासाठी इंग्लंडला जायला मिळेल तर–''

''बोल ना थांबलास का?''

''गरिबांचे मनोरथ मनात येतात आणि मनातच विरतात हेच खरं.''

''उघड उघड काय ते बोल.''

“मला इंग्लंड किंवा अमेरिकेला जावंसं वाटतं.”

“अरे, मग त्यात काय मोठंसं? करू ना आपण तशी खटपट.”

बडोद्याचे दानशूर सयाजीराव महाराज गायकवाड यांचा मुक्काम त्या वेळी मुंबईच्या वाड्यातच असल्याचे केळुसकर गुरुजींना कळले. त्यांनी महाराजांची गाठ घेतली आणि आंबेडकरांची इच्छा त्यांच्या कानी घातली. महाराज म्हणाले,

“जातिभेदाचा विचार न करता हुशार विद्यार्थ्यांना परदेशात पाठवून शिकून आणणं हे आमच्या संस्थानचं धोरण आहे आणि आम्ही आंबेडकरांना दोन वर्षांकरिता संस्थानच्या खर्चानं अमेरिकेला पाठवू.”

केळुसकर गुरुजींना आनंद झाला. ते नम्रतापूर्वक उत्तरले,

“महाराज, फार फार उपकार होतील त्या पोरावर. पोरगा तुमच्या पैशाचं चीज केल्याशिवाय राहणार नाही. याची मी खात्री देतो.”

पण मिस्कीलपणे गालातल्या गालात हसत सयाजीराव महाराज म्हणाले,


“हे पहा गुरुजी, शिकून आल्यानंतर तुमच्या त्या आंबेडकरानं आमच्या संस्थानची दहा वर्षे नोकरी करायला हवी.”


“करील ना! अहो, ही तर दुधात साखर. शिकायलाही मिळालं आणि नोकरीही मिळाली. शिकून आल्यावर नोकरीसाठी वणवण हिंडायला नको.”


केळुसकर गुरुजींनी सयाजीराव महाराजांच्याबरोबर झालेले बोलणे भीमरावांना सांगितले. बडोद्याला जाऊन तेथे त्यांनी रीतसर अर्ज केला. दोन वर्षांचा करार करून आणि पुढे दहा वर्षांच्या नोकरी करण्याच्या अटीला मान्यता देऊन ते मुंबईला परत आले.

१९१३ च्या जुलै महिन्यात आंबेडकरांनी न्यूयॉर्कला जाण्यासाठी मुंबई सोडली.

❖







सुधा मूर्ती लिखित आणि लीना सोहोनी अनुवादित 'गरुडजन्माची कथा', 'तीन हजार टाके' आणि 'सर्पाचा सूड' या पुस्तकांचं प्रकाशन नुकतंच कोल्हापूर येथील केशवराव भोसले नाट्यगृहात पार पडलं. या प्रसंगी लेखिका सुधा मूर्ती, अनुवादक लीना सोहोनी, ज्येष्ठ लेखक आणि समीक्षक सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता आणि सुनील मेहता उपस्थित होते.

**Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
**No. SDO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018**
Posting at Marketyard, PSO, Pune 411037.
Publication Date : 09/04/2018 Posting Date : 11/04/2018

## आवर्जून वाचावे

















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,
___________________
___________________
___________________
___________________